# पुणे महानगरपालिका

# सन २०२५-२६

# महानगरपालिका आयुक्त यांचे निवेदन

**मा. स्थायी समितीस सादर ...**

जगातील प्रत्येक देशास स्वत:ची अशी वैशिष्ट्यपूर्ण ओळख असते. आपल्या भारत देशाची ओळखही जगात विविध जाती, धर्म, परंपरा, भाषा अशा अनेक विविध पैलूंनी साकारलेली असल्याचे प्रकर्षाने दिसून येते. भारत देशातही प्रत्येक राज्य व राज्यातील प्रमुख शहरे हे भौगोलिक, ऐतिहासिक, पारंपारिक वारसा जतन करीत आपल्या औद्योगिक, शैक्षणिक, सामाजिक अशा अनेक क्षेत्रावर आपले राज्य व शहर आघाडीवर आणि प्रगतीपथावर नेण्यासाठी प्रयत्न करीत असतात.

स्थानिक स्वराज्य संस्था ही सामान्य नागरिक केंद्रस्थानी मानून नागरिकांना चांगल्या दर्जाच्या सेवासुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्नशील असते. प्रत्येक नागरिकास स्थानिक स्वराज्य संस्थेकडून प्रामुख्याने आरोग्य, स्वच्छता, पाणी, रस्ते, मलनि:सारण, दिवाबत्ती या सेवा प्राधान्याने मिळाव्यात अशी अपेक्षा असते. अंदाजपत्रक सादर करताना विद्यमान वित्तीय उपलब्धी व साधनसंपती यांची कार्यक्षम सांगड घालण्याची जबाबदारी ही प्रशासकीय यंत्रणेवर असते. मुलभूत सेवासुविधा देताना मुलभूत नागरी समस्यांचे समूळ उच्चाटन होण्याच्या दृष्टीकोनातून दर्जेदार कृती कार्यक्रम राबविणे अत्यावश्यक असून व ते परिणामकारक राबविल्यास अंदाजपत्रकातील विकास कामे पूर्णत्वास नेल्याचे समाधान नागरिकांना व अर्थात प्रशासनास मिळते. मात्र प्रशासन आपले कर्तव्य पार पाडीत असताना आदर्श नागरिक म्हणून प्रत्येक शहरवासियांचा शहराच्या विकासासाठी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभाग, मग तो स्वच्छतेसाठी असो किंवा शहरास लाभलेली नैसर्गिक साधने वृक्षवल्ली यांची जोपासना, उपलब्ध पाण्याचा सुयोग्य वापर असो या सर्वांची मालकी व जबाबदारी आपलीच आहे ही धारणा आपल्या मनाशी बाळगल्यास निश्चितच शहराचा चेहरामोहरा बदलण्यास वेळ लागणार नाही.

पुणे महानगरपालिकेचा महापालिका आयुक्त व प्रशासक या नात्याने सन २०२५-२०२६ चे माझे पहिले अंदाजपत्रक सादर करताना तो जास्तीत जास्त लोकाभिमुख व लोकोपयोगी होण्याच्या दृष्टीने स्वच्छता, आरोग्य, पायाभूत सुविधा या सर्व बाबी विचारात घेऊन अंदाजपत्रक तयार करण्यात येत आहे. त्यामध्ये खालील बाबींना प्राधान्य देणार असून त्याचा निश्चितच उपयोग सर्वसामान्य जनतेस होईल, असा मला विश्वास आहे.

१. नागरिकांच्या स्थानिक पातळीवरील व मुख्य खात्यांशी संबंधीत तक्रारींचे निवारण करण्यासाठी उपआयुक्त परिमंडळ १ ते ५ क्षेत्रीय कार्यालयीन स्तरावर समिती गठीत करण्यात येईल. या समितीमध्ये विविध खात्यातील अभियंता संवर्गातील अधिकारी व क्षेत्रीय स्तरावरील प्रशासकीय अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली नागरिकांच्या तक्रारीचे निराकरण करण्यात येईल.

२. पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या मनपा वसाहती विकसीत करण्यासाठी धोरण निश्चित करण्याबाबत लवकर निर्णय घेण्यात येणार आहे. यामध्ये खाजगी माध्यमातून किंवा बीओटी तत्वावर तेथील रहिवासी नागरिकांच्या संमतीने करण्याचे नियोजित आहे. या वसाहती विकसीत करताना कोणताही अनावश्यक आर्थिक भार महानगरपालिकेवर येणार नाही याबाबत विचार करण्यात येणार आहे.

३. पुणे महानगरपालिकेमध्ये आपत्कालीन कक्ष अस्तित्वात आहे. या कक्षाचे आधुनिकीकरण करण्यासाठी व अधिक सक्षम करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. पावसाळयातील पुराचा धोका किंवा नैसर्गिक आपत्तीच्या काळात व अन्य काळातही आपत्कालीन कक्ष सुसज्ज व आधुनिक करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

४. क्षेत्रीय कार्यालयनिहाय महिन्यातून एकदा संपूर्ण क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात स्वच्छता मोहिम सुरु करण्यात आलेली आहे. या मोहिमेमध्ये पथ विभाग, विद्युत विभाग, मलनि:स्सारण व इतर संबंधीत विभागाचे अधिकारी यांचा समावेश करण्यात आलेला आहे. स्वच्छता मोहिमेमध्ये शाळांचाही सहभाग घेण्यात येत आहे व लोकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती, सहभागासाठी आवाहन करण्यात येत आहे.

५. शहरी गरीब योजना - सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीने आरोग्य विषयक सोयी व सुविधा हा अत्यंत महत्वाचा व निकडीचा विषय आहे. आपल्या समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल वर्गासाठी आरोग्यविषयक सुविधा त्यांना शहरी गरीब योजने अंतर्गत देण्यात येतात. शहरी गरीब योजनेसाठी मनपा भवन याठिकाणी केंद्रीत पध्दतीने या सुविधेचे पत्रे नागरिकांना देण्यात येतात. अनेक नागरिकांना यासाठी दूरवरुन शहरी गरीब योजनेचे पत्र किंवा कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी यावे लागते. याचा विचार करुन प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयामध्येच या योजनेचे विकेंद्रीकरण करण्याचे नियोजित आहे. यापुढे शहरी गरीब योजने संदर्भात कामकाज क्षेत्रीय कार्यालयात नागरिकांच्या सोयीसाठी सुरु करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

मेट्रोपॉलिटन सर्व्हेलन्स युनीट (एम.एस.यु.) - देशात किंवा शहरात साथरोग उद्रेकांची परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने शहरातील सर्व्हेक्षण यंत्रणा सक्षम करणेसाठी मेट्रोपॉलिटन सर्व्हेलन्स युनीट (एम.एस.यु.) स्थापन करणेबाबत प्रसृत केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही सुरु केली असून साथरोगांचा प्रसार रोखणे कामी अद्ययावत प्रयोगशाळा, कुशल मनुष्यबळ या बाबी उपलब्ध करण्यात येणार आहेत. महानगरपालिका परिक्षेत्रातही मेट्रोपॉलिटन सर्व्हेलन्स युनीट (एम.एस.यु.) स्थापन करण्यात येणार आहे.

६. **डिजीटायझेशन-**

(अ) ई-ऑफिस - पुणे महानगरपालिकेच्या सर्व विभागांचे कामकाज डिजीटाईज करण्याचा व नागरिकांना जास्तीत जास्त सेवा ऑनलाईन पध्दतीने देण्याची संगणक प्रणाली विकसीत करुन त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन पेपरलेस कामकाज पध्दती करण्यात येणार आहे.

(ब) इंटेलिजंट वर्क्स मॅनेजमेंट सिस्टीम (IWMS)- Intelligent Works Management System या संगणक प्रणालीचा वापर Engineering Project संबंधीत सर्व निविदा प्रक्रियांचे इस्टीमेट, कार्यादेश, बिले तयार करणे इ. प्रकारचे कामकाज ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहे.

(क) मिळकत कर आकारणी संगणकीकरण - यापुढे मिळकत कराची आकारणी करण्यासाठी बांधकाम परवाना व कर आकारणी विभागाकडील संगणकीय प्रणालीव्दारे एकत्रीकरण करण्यात येत आहे. या प्रणालीव्दारे बांधकाम विभागाकडे प्रकरण दाखल झाल्यानंतर बांधकाम विभागाकडील सर्व बाबींची पूर्तता झाल्यानंतर संबंधीत मिळकतीची माहिती संगणक ऑटो डिसीआर माध्यमातून मालमत्ता कर एकत्रीकरण कर आकारणी विभागाकडे प्राप्त होवून मिळकतीचा ए फॉर्म ऑनलाईन जनरेट होणार आहे. या प्रणालीमुळे मिळकतीची कर आकारणी सत्वर होवून मिळकतधारकांस मिळकतीचे कराचे पहिले बिल सत्वर मिळण्यास मदत होणार असून पुणे महानगरपालिकेच्या महसूलात निश्चितच वाढ होणार आहे.

(ड) रिव्हर फ्रंट डेव्हलपमेंट (River Front Development) - पुणे शहरातून वाहणाऱ्या मुळा, मुठा व मुठा-मुळा या नद्यांची एकुण लांबी ४४.४० किमी आहे. या नद्यांचा एकात्मिकरित्या विचार करुन नदीकाठ विकसनाच्या दृष्टीने नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे काम लवकरच कार्यान्वित होणार आहे.

७. एकता नगरी येथे कल्स्टर तयार करणे, पुणे पेठ वडगाव येथील एकतानगरी, विठ्ठलनगर, निंबजनगर येथील पुराने बाधित होणाऱ्या निळया पुररेषेमधील १३८३ सदनिका व ६७ दुकाने यांचे युडीसीपीआर चे कलम 14.8 अन्वये नागरी पुर्ननिर्माण योजने अंतर्गत लगतच्या हिंगणेखुर्द स.नं.१९ येथील मनपाच्या ताब्यात आलेल्या निळया पुररेषेवरील क्षेत्रावर पुर्नवसन करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. त्यामुळे सद्यस्थितीतील इमारतींना पुराचा धोका भविष्यामध्ये कायमस्वरुपी दूर होणार आहे.

८. **स्मशानभूमी अपग्रेडेशन व सुशोभिकरण करणे -** १५ व्या वित्त आयोगाच्या तरतूदीमधुन किमान १० ठिकाणी विद्युत दाहिनी बसविण्याचे काम करण्यात येणार आहे. नदी सुधारणा प्रकल्पांतर्गत बाधित स्मशानभूमीच्या सुधारणा करण्याची कामे करण्यात येणार आहेत. वैकुंठ स्मशानभूमी येथे अंत्यविधीसाठी अतिरिक्त होणारा ताण कमी करण्यासाठी शहरातील इतरही स्मशानभूमीमध्ये विविध सुधारणा व विकास कामे करण्याचे नियोजित आहे. शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या वैकुंठ स्मशानभूमीचा सुधारित आराखडा तयार करण्यात येत असून त्या अंतर्गत स्थापत्य विषयक, सेवा व सुविधा विषयक कामे करण्यात येणार आहेत.

९. **पुणे मनपा मालकीच्या जागा -** पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या अनेक जागांवर भवन विभागाकडून मिळकतीचे बांधकाम करण्यात येत असते. यामध्ये समाज मंदिर, दफनभूमी, अग्निशमन केंद्र, दवाखाना, प्रशिक्षण केंद्र, पोस्ट ऑफिस, पोलीस चौकी, क्रीडा संकुल, मंडई व इतरही मिळकतींचा समावेश असतो. मात्र यातील सर्व कामे एकाच आर्थिक वर्षात पूर्ण होत नाहीत. अशावेळी इमारतीचा जो भाग पूर्ण झाला आहे व त्या वापरायोग्य आहेत. त्या वापरायोग्य इमारतीचे प्रमाणपत्र भवन विभागाकडून प्राप्त करुन त्यानंतर बांधकाम विकास विभागाकडून अंशत: भोगवटापत्र घेऊन संबंधित विभागाने सदरचा भाग ताब्यात घेणेबाबत व त्याचा वापर सुरु करणेबाबत नियोजित आहे. तसेच पुणे महानगरपालिकेच्या सर्व विभागांच्या ताब्यातील मात्र वापरात नसलेल्या इमारतींची माहिती संकलीत करुन मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडे संकलीत करण्यात येत आहे. अशाप्रकारे संकलीत केलेल्या मिळकती आवश्यकतेनुसार पुणे महानगरपालिकेच्या विभागांना किंवा त्यांना या मिळकतींची आवश्यकता नसल्यास खाजगी संस्था/व्यक्ती यांना मिळकत वाटप नियमावली स्थावर मालमत्तेचे भाडेपट्ट्याने हस्तांतरण आणि भाडेपट्ट्याचे नूतनीकरण नियम २०२३ नुसार प्रचलित पध्दतीने कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच जागांचा अधिक किफायतशीर वापर करून मनपा उत्पन्न वाढविणेसाठी कार्यवाही करणेत येणार आहे.

१०. **राष्ट्रीय नदी संवर्धन योजना -** राष्ट्रीय नदी संवर्धन योजने अंतर्गत पुणे शहरातील मुळा मुठा नदीचे प्रदूषण नियंत्रण करणे या प्रकल्पांतर्गत एकूण ११ मैलापाणी शुद्धीकरण केंद्रे (क्षमता ३९६ द.ल.लि.) व ५३.५ कि.मी. लांबीच्या मुख्य मलवाहिन्या टाकणे या कामाचा समावेश आहे. यामधील ९ मैलापाणी शुद्धीकरण केंद्रांचे व मलवाहिन्या टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे. यापैकी खराडी, वारजे, वडगांव, मुंढवा व मत्स्यबीज केंद्र येथील मैलापाणी शुद्धीकरण केंद्रांचे (क्षमता १११ द.ल.लि.) काम अंदाजे ६५% पूर्ण झाले असून सन २०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

११. **सांस्कृतिक विभाग –**

- सांस्कृतिक केंद्रे विभागाकडील १५ नाट्यगृहाच्या देखभाल दुरुस्तीकरीता र.रु ३ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केलेली आहे.
- भवन रचना विभागामार्फत करणेत येणारी कामे :

१) श्री छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह, सिंहगड रोड येथील स्थापत्य विषयक कामे करण्यासाठी अंदाजपत्रकामध्ये र.रु. १७.५० कोटी अक्षरी रक्कम रुपये सतरा कोटी पन्नास लाख इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

२) बाळासाहेब ठाकरे नाट्यगृह, कोथरूड येथील स्थापत्य विषयक कामे करण्यासाठी अंदाजपत्रकामध्ये र.रु. ३ कोटी अक्षरी रक्कम रुपये तीन कोटी इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

**१२. वाहतूक नियोजन -**

१. पुणे महानगरपालिकेचा वाहतुक नियोजन विभाग व पथ विभाग तसेच पुणे वाहतूक पोलिसांशी समन्वय साधून पुणे मनपा हद्दींमधील विविध रस्त्यांवरील वाहतुक कोंडी कमी करण्याचे अनुषंगाने विविध उपाययोजना हाती घेण्यात येणार आहेत.

२. मागील अनेक वर्षांपासून अथक प्रयत्न करून देखील सातारा रस्त्यावरील कात्रज चौक येथील ३९६८ चौ.मी. क्षेत्राची जागा पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात येत नव्हती. मात्र आता ती जागा ताब्यात आली आहे. त्यामुळे त्या चौकात प्रचंड प्रमाणात होणारी वाहतुकीची कोंडी दूर होण्यास मदत होणार आहे.

३. कर्वेनगर येथील पानंद रस्ता रुंद करण्याच्या प्रयत्नांना या वर्षी यश आले असून रस्ता रुंदीकरणात येणारी रस्त्याच्या दोन्ही बाजुची बांधकामे निष्कासित करण्यात आली असून रस्त्याच्या रुंदीकरणाची कार्यवाही हाती घेण्यात आली आहे.

४. शहरातील सुमारे ८० टक्के वाहतूक असलेले ३३ मुख्य रस्ते (Arterial Roads) निश्चित करण्यात आले असून त्यापैकी १५ रस्त्यांचे काम पूर्ण केले आहे. उर्वरित रस्त्यांचे काम येत्या काही महिन्यांमध्ये पूर्ण करण्यात येणार आहे.

५. पुणे शहरातील कात्रज कोंढवा रस्ता व इतर रस्त्यांवरील मिसिंग लिंक्स ताब्यात घेण्याचे दृष्टीने आगामी बजेट मध्ये भूसंपादनासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे.

**१३. अनधिकृत बांधकामावरील कारवाई –**

पुणे शहरातील पक्क्या स्वरूपाच्या बहुमजली अनधिकृत बांधकामावर कारवाई करणेकरिता कायम स्वरुपी हायड्रोलिक डीमोलीशन मशीन (जाँ क्रशर) पुणे महानगरपालिकेने खरेदी केले आहे. सदरच्या जाँ- क्रशर मशिनच्या कारवायांमुळे अनधिकृत बांधकामांना आळा बसायला सुरुवात झाली आहे. सन २०२५-२६ अंदाजपत्रकात नव्याने जाँ कटर मशिन खरेदी करण्याचे नियोजित करण्यात आले आहे.

**१४. समान पाणीपुरवठा योजना –**

समान पाणी वाटप योजने अंतर्गत प्रकल्पीय कामे ७५% पूर्ण झाली आहेत. सदर कामांमध्ये भांडवली कामे पूर्ण करून, पुढील १० वर्षांसाठी देखभाल दुरुस्ती करण्याचे नियोजित आहे. त्यानुसार र. रु. २०४८ कोटी रकमेच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यापैकी र. रु. १४७१ कोटी खर्च झालेला आहे. सुमारे ७५% कामे पूर्ण झाली असून माहे डिसेंबर, २०२५ अखेर उर्वरित कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट्य ठरविण्यात आलेले आहे. शहराच्या काही भागांमध्ये मीटर बसविण्याची कामे प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पांतर्गत एकूण १४१ पाणीपुरवठा झोन असून, त्यापैकी ६२ झोनचे काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित झोनचे काम प्रगती पथावर आहे.

तसेच नव्याने समाविष्ट झालेल्या गावात स्वच्छ पाणीपुरवठा करणेच्या दृष्टीने जलशुद्धीकरण केंद्र बांधणे करिता शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. शासनाकडून निधी उपलब्ध करणेसाठी प्रयत्नशील राहू.

पुणे शहरामध्ये पाण्याची गळती होत असून, समान पाणी वाटप योजनेअंतर्गत देखभाल दुरुस्ती मध्ये सदर गळती शोधणे व दुरुस्त करण्याचे काम करण्यात येत आहे. सदर गळती शोधण्यासाठी Acoustic तंत्रज्ञानाद्वारे (जमिनीखालील गळतीमध्ये होणाऱ्या पाण्याच्या आवाजानुसार) गळती शोधण्याचे काम करण्यात येत आहे. सन २०२५-२६ अंदाजपत्रकात रोबोट मशीनद्वारे पाण्याच्या पाईपलाईनच्या आतील तपासणी करून गळती आणि बेकायदेशीर नळजोड शोधण्यासाठी प्रात्यक्षिक घेण्यात आले असून, त्याकरिता र.रु.५० लक्ष तरतूद सुचविण्यात आली आहे.

**१५. समाज कल्याण विभाग –**

१. पुणे मनपाच्या वतीने स्पर्धा परीक्षा केंद्र उभारण्याचे काम नियोजित आहे.

२. महिला बचतगट विक्री केंद्र परिमंडळनिहाय करणे नियोजित आहे.

**३. दिव्यांग कल्याणकारी योजना –**

दिव्यांगाना मोफत पीएमपीएमएल बसपास, कृत्रिम अवयव घेणे, स्वयंरोजगार, उच्च शिक्षण, प्रशिक्षणासाठी अर्थसहाय्य, महापालिका क्षेत्रातील १८ वर्षापुढील मतिमंद व्यक्तींचा सांभाळ करणाऱ्या महापालिका हद्दीतील नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस अथवा मतिमंद व्यक्तीच्या पालकांस अर्थसहाय्य, दिव्यांग-दिव्यांग, दिव्यांग-अव्यंग व्यक्तींच्या विवाहासाठी अर्थसहाय्य, दिव्यांग व्यक्तींनी स्थापित केलेल्या कला पथकास वाद्य खरेदीसाठी अर्थसहाय्य, दिव्यांग व्यवसाय गटांनी सुरु केलेल्या व्यवसायाच्या वृद्धीकरिता अर्थसहाय्य, दृष्टीहीनांसोबत मदतनीसाला पी.एम.पी.एम.एल. तिकिटात ५०% सवलत देणे, दिव्यांग व्यक्तींना वार्षिक अर्थसहाय्य दिले जाते तसेच दिव्यांग व्यक्तींसाठी थेरपी सेंटर नियोजित आहेत. तसेच दिव्यांगांसाठी मेळावे आयोजित करणेत येतील.

## मागील चार वर्षाच्या महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकाचा संक्षिप्त आढावा

(आकडे कोटीमध्ये )

| जमा बाजू | जानेवारी २०२२ अखेर | जानेवारी २०२३ अखेर | जानेवारी २०२४ अखेर | जानेवारी २०२५ अखेर |
|---|---|---|---|---|
| स्थानिक संस्था कर | १३०.३६ | ३४६.६२ | ३३९.८२ | १८९.१३ |
| वस्तू आणि सेवा कर (GST) | १७३१.५२ | १७८७.३० | १९३०.३० | २०८१.९७ |
| मिळकत कर | ११५४.२८ | १२५९.५७ | १५२३.८३ | १६२५.९१ |
| पाणीपट्टी | २३५.६७ | २३८.४५ | २९४.०४ | २७६.६९ |
| बांधकाम परवानगी व विकास शुल्क | १५७१.५० | ११०२.३० | १४२३.३२ | १३१२.१३ |
| इतर जमा | ४२७.२९ | ६८६.१५ | ४७२.९८ | ६०६.३२ |
| Jnnurm स्मार्ट सिटी व अमृत अभियान | - | ०.८० | - | - |
| शासकीय अनुदान | १४७.९३ | २६३.३७ | १२८.०८ | ३१३.४२ |
| कर्जरोखे | - | - | - | - |
| प्रधानमंत्री आवास योजना | ४५.११ | ६४.८६ | ९१.०८ | २९.३५ |
| **एकूण रक्कम रुपये** | **५४४३.६६** | **५७४९.४२** | **६२०३.४५** | **६४३४.९२** |

(आकडे कोटीमध्ये )

| खर्च बाजू | जानेवारी २०२२ अखेर | जानेवारी २०२३ अखेर | जानेवारी २०२४ अखेर | जानेवारी २०२५ अखेर |
|---|---|---|---|---|
| सेवकवर्ग खर्च | १४९३.६४ | २२४२.६२ | २४१६.५४ | २५६५.३५ |
| वीजखर्च व दुरुस्ती | २१३.४४ | २५२.२० | २७२.०५ | ३०६.०० |
| पाणी खर्च | ३८.१५ | २८.४१ | ९७.३९ | १०८.८५ |
| कर्जपरत फेड, व्याज व घसारा | ३२.६४ | ५९.०९ | २०.३९ | २१.१८ |
| औषधे, पेट्रोल व डिझेल | १२६.६६ | १४९.८३ | १६२.२५ | १५३.६१ |
| देखभाल दुरुस्ती व इतर खर्च | ७८२.८१ | ७४१.८० | ७८५.५१ | ९३५.१५ |
| वार्डस्तरीय कामे | १०.२६ | - | - | - |
| क्षेत्रिय कार्यालयाने करवयाची कामे (नॉन प्लान) | ०.३३ | ८.०४ | २०.२५ | २३.२७ |
| भांडवली व विकासाची कामे | ५५२.२६ | ७५२.७८ | १२३४.७९ | १५८४.५८ |
| Jnnurm स्मार्ट सिटी व अमृत अभियान | ८०.५४ | ३४.१३ | ५.०१ | ५८.९४ |
| **एकूण रक्कम रुपये** | **३३३०.७३** | **४२६८.९३** | **५०१४.१८** | **५७५६.९३** |

# विकास योजना प्रगती आढावा :-

## (१) <u>पाणीपुरवठा (भांडवली तरतुद र.रु. ६६१.३५ कोटी + महसुली तरतुद र.रु. १००४.४३ कोटी= र.रु. १६६५.७८ कोटी)</u>

**सन २०२४ - २५ मधील महत्वाच्या पुर्णत्वास / सुरु असलेल्या नाविन्यपुर्ण योजना / प्रकल्पांची नावे ठळक बाबी**

पुणे शहरासाठी सर्व भागात समांतर व पुरेशा पाणीपुरवठा करणेसाठी ८२ साठवण टाक्या उभारणे प्रस्तावित असून सध्या ६६ साठवण टाक्यांची कामे पुर्ण झाली असुन, माहे मार्च २०२५ पर्यंत एकूण ७९ साठवण टाक्यांची कामे पुर्ण होणे अपेक्षित आहे. या अंतर्गत सुमारे १०६० कि.मी. लांबीची जलवाहिनी माहे मार्च २०२५ पर्यंत पुर्ण करणे व दोन लाख मीटर बसविणेचे काम पुर्ण करण्यात येणार आहे. पाणीपुरवठा प्रकल्प अंतर्गत गणेशनगर तसेच भिमनगर, म्हस्केवस्ती, सिंहगड रोड, हिंगणे बुद्रक, संचेती परिसर, कात्रज येथील राजस सोसायटी, सुखसागरनगर बाणेर बालेवाडी या भागामध्ये ९०% पेक्षा जास्त मीटर बसविण्याचे काम व संपुर्ण शहरात ७०% पर्यंत मीटर बसविणे काम पूर्ण झालेले आहे. शहरामध्ये नियोजित १४१ झोन पैकी मार्च २०२५ अखेर ७२ झोन कार्यान्वित होणार आहेत. पुणे शहरासाठी महत्वाकांक्षी असलेला दुसरा प्रकल्प भामा आसखेड धरणातुन पाणी आणण्याची योजना सन २०२०-२१ मध्ये कार्यान्वित करण्यात आली आहे. यामुळे पुणे शहराच्या पुर्व भागातील वडगांवशेरी, खराडी, चंदननगर, विमाननगर, कळस, धानोरी इत्यादी भागाची पाणी समस्या पुर्णपणे सोडविणे शक्य झाले आहे.

मीटरद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्याची पाणीपट्टी दरवर्षी सरासरी अंदाजे १२५ कोटी इतकी जमा होते. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये र.रु. १३०.९८ कोटी इतकी रक्कम जमा झाली आहे. सन २०२४- २५ या आर्थिक वर्षामध्ये दि. ३१/०१/२०२५ अखेर र.रु. १०२.४५ कोटी इतकी जमा झालेली आहे.

| अ.क्र. | वर्ष | वसुली (कोटी मध्ये) |
|---|---|---|
| १ | २०२२-२३ | १३४.९६ |
| २ | २०२३-२४ | १३०.९८ |
| ३ | २०२४-२५ | दि.३१.०१.२०२५ अखेर १०२.४५ |

### पाणीपट्टी – सन २०२३-२४

- मीटर वरील दि. ३१/०१/२०२५ अखेर एकुण नळजोड संख्या ४७,०७० इतकी असुन, थकबाकी सुमारे र.रु. ७२७.९६ कोटी आहे. दुबार पाणीपट्टी, नादुरुस्त मीटर, नळजोड बंद घोषित झोपडपट्टी मधील पाणीपट्टी, रस्ता रुंदीकरणामधील नळजोड इ. कारणांमुळे मीटर पाणीपट्टीची अवाजवी थकबाकी आलेली आहे. सध्याचे पाण्याचे मीटर बसविण्याची जबाबदारी संबंधित ग्राहकांची आहे. नादुरुस्तीच्या काळात सरासरी वापरापेक्षा जादा वापर गृहीत धरुन बिलाची आकारणी करण्यात येते व मीटर दुरुस्त केल्यानंतर नंतर वसुली होणारी रक्कम ही २०% ते २५% इतकी असुन, अवाजवी थकबाकी निरस्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.
- सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये तीन वेळेस लोक अदालत राबविण्यात येऊन सुमारे र.रु.१.१३ कोटी इतकी थकबाकी वसुल करण्यात आली आहे व भविष्यात वेळोवेळी लोक अदालत भरविण्यात येणार असुन थकबाकी वसूल करण्यात येणार आहे.

**सन २०२४-२५ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रकातील संक्षिप्त माहिती.**

- सदर अंदाजपत्रकात पुणे शहरासाठी महत्वाकांक्षी समान पाणीपुरवठा योजना राबविण्याकरीता अनुषंगाने ९६० कि.मी. लांबीच्या जलवाहिन्या विकसित करण्यात आल्या आहेत व सुमारे १,६५,००० जलमापक बसविण्यात आले आहेत. सदर योजने अंतर्गत ७७ साठवण टाक्या बांधणे, १८०० कि.मी. लांबीची जलवाहिनी टाकणे व ३.१५ लक्ष जलमापक बसविणे अंतर्भुत आहे.

**सन २०२४-२५ चे दृष्टीक्षेपातील जमा अंदाजपत्रक (उद्दीष्ट र.रु. १७०.१८ कोटी)**

- सन २०२४-२५ याकरीता टप्पेनिहाय (टेलीस्कोपिक) पाणीपट्टी दरास मा. मुख्य सभेची मान्यता मिळालेली आहे. यामुळे पाण्याचा कमी वापर करणाऱ्या नळजोडधारकांना कमी दराने बिल व पाण्याचा जास्त वापर करणाऱ्या नळजोडधारकांना जादा दराने बिलांची आकारणी करण्यात येत आहे. यामुळे पाणी वाया जाण्याचे प्रमाण कमी होणे अपेक्षित आहे.
- सन २०२४-२५ पासुन मुदतीमध्ये बिल रक्कम जमा न करणाऱ्या ग्राहकांना थकबाकीवर दरमहा १% प्रमाणे दंडात्मक व्याज आकारणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे मुदतीत बिल रक्कम जमा होईल तसेच उत्पन्नामध्ये वाढ होणार आहे.

## सन २०२५-२६ मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना.

- पुणे शहरासाठी महत्वाकांक्षी पाणीपुरवठा प्रकल्प अंतर्गत सन २०२५-२६ मध्ये एकुण ७९ साठवण टाक्या कार्यान्वित करणे अपेक्षित आहे. या व्यतिरिक्त सुमारे ३०० कि.मी. लांबीची नवीन वितरण व्यवस्था विकसित करणे व अंदाजे १.० लक्ष जलमापक बसविण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आलेले आहे. पुणे शहरामध्ये पाणीपुरवठा करणेसाठी नियोजित १४१ झोन पैकी १४१ झोन मार्च २०२६ अखेर कार्यान्वित करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे.
- पुणे शहरामध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या ३४ गावांमध्ये समान पाणीपुरवठा योजना राबविण्यासाठी कन्सल्टंट मे. प्रायमुव्ह यांची नेमणुक करण्यात आली असुन, त्यांचेकडुन सदर योजनेचा डी.पी.आर. तयार करण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात बावधान बु॥ व सुस व म्हाळुंगे व लोहगाव वाघोली या गावांसाठी योजनेचे पुर्वगणनपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर गावांपैकी बावधन बु॥ येथे एकुण ५ टाक्यांचे बांधकाम व सुमारे ३५ कि.मी. पाण्याची लाईन विकसित करण्यात येणार आहे. तसेच सुस व म्हाळुंगे येथे एकुण ६ टाक्यांचे बांधकाम व सुमारे ७७ कि.मी. पाण्याची लाईन विकसित करण्यात येणार आहे. लोहगाव वाघोली येथे सुमारे ४५० कि.मी. पाण्याची लाईन व १३ टाक्यांचे बांधकाम नियोजित आहे.

# (२) मलनिःसारण प्रकल्पीय कामासह (भांडवली तरतुद र.रु. १०४६.७७ कोटी + महसुली तरतुद र.रु. ३८४.८६ कोटी एकूण र.रु १४३१.६३ कोटी)

**सन २०२४-२०२५**

- सन २०२४-२०२५ चे अंदाजपत्रकामध्ये मलनिःसारण देखभाल दुरुस्ती विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या सिव्हरेज मास्टरप्लॅननुसार सन २०१७ पासून अपुऱ्या पडणाऱ्या विविध व्यासाच्या मलवाहिन्या बदलणेसाठी व गेट बदलणे व अन्य कामांसाठी र.रु. ४३१.३८ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे, त्यामधून जवळपास ८० कि. मी लांबीच्या विविध व्यासाच्या मलवाहिनीचे काम प्रगती पथावर आहे.
- सन २०२४-२०२५ मध्ये मलनिःसारण देखभाल दुरुस्ती, नाले सफाई, पावसाळी लाईन साफसफाई करणेकरीता र.रु. ६०.४० कोटी इतकी तरतूद करण्यात आली होती. मदर कामांपैकी पावसाळयापूर्वी करावयाची कामे पूर्ण झालेली आहेत.
- सन २०२४-२५ मध्ये राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत पुणे शहरासाठी शहरी पुर जोखिम व्यवस्थापना अंतर्गत पुणे शहरातील वारंवार पुर परिस्थिती निर्माण होणाऱ्या ठिकाणांसाठी कामे करणे यासाठी र.रु. २५०.०० कोटी पैकी र.रु. ७५.०० कोटी इतकी तरतुद पुणे महानगरपालिकेस प्राप्त झाली असून सदर कामासाठी निविदा प्रक्रिया राबवून काम सुरु करण्यात आलेले आहे व सन २०२५-२६ साठीही ही कामे सुरु ठेवण्यात येणार आहेत.
- पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांमध्ये ड्रेनेज लाईन टाकणेबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल मलनिःसारण देखभाल व दुरुस्ती (प्रकल्प) विभागामार्फत तयार करण्याचे काम सुरु असून सन २०२४-२५ मध्ये मलवाहिन्यांचे अत्यावश्यक नेटवर्क करणेकरिता र.रु. ८०.०० कोटी इतकी तरतूद उपलब्ध झाली. सदर कामे प्रगती पथावर आहेत.

**सन २०२५-२०२६**

- सन २०२५-२०२६ चे अंदाजपत्रकामध्ये मलनिःसारण देखभाल दुरुस्ती विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या सिव्हरेज मास्टरप्लॅननुसार विविध व्यासाच्या मलवाहिन्या बदलणेसाठी व गेट बदलणे व अन्य कामांसाठी र.रु. ३७८.२७ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. त्यामधून जवळपास ६० कि.मी. लांबीच्या विविध व्यासाच्या मलवाहिनीचे काम करण्याचे नियोजन आहे.
- सन २०२५-२०२६ मध्ये मलनिःसारण वाहिनीची देखभाल दुरुस्ती, नाले सफाई, पावसाळी लाईन साफसफाई करणे, बॅन्डीक्लेट, रिसायक्लर मशिन, सायफन करीता र.रु. ७७.५० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- पावसाळी पाणी साचणाऱ्या ठिकाणी उपाय योजनेकरिता र.रु. ४२.९५ कोटी व नाल्यालगत सीमाभिंत बांधण्यासाठी र.रु. २२.५० कोटी तरतूद सुचविण्यात आलेली आहे.
- पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांमध्ये ड्रेनेज लाईन टाकणेबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल मलनिःसारण देखभाल व दुरुस्ती (प्रकल्प) विभागामार्फत तयार करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने सन २०२५-२६ मध्ये मलवाहिन्यांचे अत्यावश्यक नेटवर्क करणेकरिता र.रु. ९५.२० कोटी इतकी तरतूद उपलब्ध झाली आहे.
- पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांमध्ये ड्रेनेज लाईन टाकणेबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल मलनिःसारण देखभाल व दुरुस्ती (प्रकल्प) विभागामार्फत तयार करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने सन २०२५-२६ मध्ये मलवाहिन्यांचे अत्यावश्यक नेटवर्क करणेकरिता र.रु. ७५.०० कोटी इतकी तरतूद उपलब्ध झाली आहे.

## राष्ट्रीय नदी संवर्धन योजने अंतर्गत पुणे शहरातील मुळा-मुठा नदीचे प्रदुषण नियंत्रण करणे

**सन २०२४-२५**

- प्रकल्पातील एकूण ११ मैलापाणी शुद्धीकरण केंद्रांपैकी ०९ मैलापाणी शुद्धीकरण केंद्रांची कामे जागेवर सुरु असून सुमारे ५०% कामे पूर्ण झाली आहेत.
- यापैकी ०५ मैलापाणी शुद्धीकरण केंद्रांची कामे मार्च २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.
- १० एमएलडी बोटॅनिकल गार्डन, औंध येथील मैलापाणी शुद्धीकरण केंद्राकरीता जागा हस्तांतरण अंतिम टप्प्यात आहे.
- मुख्य मलवाहिन्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.
- प्रकल्पातील पॅकेज सी - जनजागृती, लोकसहभागाचे काम चालू आहेत.
- प्रकल्पाकरीता आजपर्यंत केंद्र शासनाकडून र.रु. ३५०.४५ कोटी अनुदान प्राप्त झाले आहेत.
- मार्च २०२५ पर्यंत र.रु. २०० कोटी अनुदान प्राप्त होणे अपेक्षिते आहे.

**सन २०२५-२६**

- प्रकल्पातील एकूण ११ मैलापाणी शुद्धीकरण केंद्रांची कामे पूर्ण करणेचे उद्दिष्ट आहे.
- ५३.५ कि.मी. लांबीच्या मुख्य मलवाहिन्यांची कामे पूर्ण करणेचे उद्दिष्ट आहे.
- सदर प्रकल्पामध्ये अंतर्भूत असलेल्या सेंट्रल स्काडा सिस्टीम, जी.आय.एस., एम.आय.एस. प्रणालीबाबत निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामे करणेत येणार आहेत.
- सदर प्रकल्पाकरीता सन २०२५-२६ साठी र.रु. ५४०.५० कोटी इतक्या अंदाजपत्रकीय रकमेची तरतूद प्रस्तावित आहे.

# (३) <u>घनकचरा व्यवस्थापन (भांडवली तरतूद र.रु. १४२.३५ कोटी)</u>

**सन २०२४-२५ मधील दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- <u>उरुळी - फुरसुंगी **येथे २०० मे. टन क्षमतेचा कचरा प्रकल्प**</u> **-**
  उरुळी-फुरसुंगी कचरा डेपो येथील जागेत सुमारे २ एकर क्षेत्रात २०० मे. टन क्षमतेचा मिश्र कचरा प्रक्रिया प्रकल्प असून माहे एप्रिल, २०२१ पासून या प्रकल्पामध्ये २०० ते २५० मे. टन क्षमतेने कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे. या प्रकल्पाची क्षमता ३५० मे. टन प्रति दिन पर्यंत वाढविलेली आहे.

- **<u>शास्त्रोक्त भू-भराव विकसित करणे</u> -**

  उरुळी-फुरसुंगी कचरा डेपो येथील मोकळया करण्यात आलेल्या जागेपैंकी सुमारे ४ एकर क्षेत्रामध्ये शास्त्रोक्त भू-भराव उभारणेसाठी निविदा प्रक्रिया सुरु आहे. प्रकल्पावर पुणे महानगरपालिका व पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड यांचे संयुक्त प्रकल्पांतर्गत शास्त्रोक्त भू-भराव (SLF) सुमारे ८ एकर जागेवर उभारणेसाठी काम सुरु आहे. १५ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतील रक्कम यासाठी वापरण्यात येणार आहे.

- **<u>ISWM</u> -**

  ISWM अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन विभाग व मोटार वाहन विभागाकडील सर्व वाहने, कचरा प्रकल्प, मनुष्यबळ यांचे संगणकीय एकत्रीकरण करण्याचे कामकाज हाती घेण्यात आले आहे. या कामाचे कार्यादेश मे. एस सी एस टेक प्रायव्हेट लिमिटेड यांना देण्यात आले असून प्रत्यक्ष जागेवर कामकाज सुरु आहे.

- **<u>बायोमायनिंग</u> -**

  टप्पा क्रमांक २ मध्ये उरुळी-फुरसुंगी कचरा डेपो येथे साठलेल्या कचऱ्यापैंकी ८ लक्ष मे. टन कचऱ्यावर प्रक्रिया करणेसाठी २००० मे. टन क्षमतेचा प्रकल्प DBOO (Design, Build, Own and Operate) तत्वावर उभारला आहे. सदर प्रकल्पामध्ये सरासरी २००० मे. टन प्रतिदिन क्षमतेणे प्रक्रिया करण्यात येतो. सध्य:स्थितीत टप्पा क्रमांक २ मध्ये सुमारे ६ एकर क्षेत्र रिकामे करण्यात आले आहे.

- **<u>वेस्ट टू एनर्जी</u> -**

  पुणे बायो एनर्जी यांचेमार्फत सुमारे ७५० मे. टन क्षमतेचा वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील देखभाल दुरुस्तीचे (Operation and Maintenance) चे काम सुरु झाले आहे. या अंतर्गत सुमारे ३०० मे. टन प्रतिदिन क्षमतेने कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे. तसेच या प्रकल्पातील अन्य स्थापत्यविषयक कामाचे बांधकाम देखील मोठ्या प्रमाणात सुरु आहे. येणाऱ्या आर्थिक वर्षात सदर प्रकल्प ७५० मे. टन क्षमतेने कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

**सन २०२५-२६ मधील प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प व योजना**

- **<u>ओला कचरा प्रक्रिया प्रकल्प</u> -**

  DBO तत्वावर ओल्या कचऱ्याचे प्रकल्प उभारण्यासाठी EOI मागविण्यात आले असून कार्यादेश देण्यात आले आहेत. शहराच्या २ ठिकाणच्या बायोगॅसच्या जागी ओल्या कचऱ्यापासून ब्रीक्रेटस बनविण्याचा प्रकल्प उभारण्याचे कामकाज सुरु आहे. तसेच कात्रज येथे उभारलेला १०० मे. टन क्षमतेचा ओला कचरा प्रक्रिया प्रकल्प लवकरच कार्यान्वित केला जाणार आहे.

- **<u>नवीन समाविष्ट गावे</u> -**

  नवीन २३ गावांचा समावेश पुणे मनपामध्ये झाला असून या गांवासाठी अतिरिक्त स्वच्छता कर्मचारी यांची मागणी करण्यात येत आहे. तसेच कचरा RAMP वरुन सुका कचरा सुमारे १५० मे. टन प्रतिदिन क्षमतेने सिमेंट कंपन्यामध्ये इंधनासाठी वापरण्याबाबत निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. देवाची उरुळी कचरा डेपो येथील जागेत कार्यरत असलेल्या ३५० मे. टन क्षमतेच्या प्रकल्पाची ५०० मे. टनापर्यंत क्षमता वाढविण्यात आली आहे.

- **<u>गार्डन वेस्ट</u> -**

  सद्यस्थितीत सुमारे १५० मे. टन गार्डन वेस्ट कचरा संकलन व वाहतूक करुन अशा कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे. शहरातील सर्व प्रभागातून सर्व प्रकारचे गार्डन वेस्ट ठेकेदारामार्फत संकलन करणे, वाहतूक करणे व प्रक्रिया करणे या कामासाठी मे. युनिटी ग्रीन सोलुशन्स यांना कार्यादेश देण्यात आले असून त्यानुसार प्रत्यक्ष कामकाज सुरु आहे.

- **<u>RAMP आधुनिकीकरण</u> -**

  कात्रज हस्तांतरण केंद्र येथे Mechanized Transfer Station उभारण्यात आले असून त्या धर्तीवर उर्वरित दोन ठिकाणी नव्याने अशा प्रकारचे Mechanized Transfer Station उभारण्यात येणार आहे.

- **Waste to Energy प्रकल्प** -
  रामटेकडी इंडस्ट्रीयल इस्टेट येथे कचऱ्यापासून उर्जा निर्मितीकरिता भारतातील एकमेव ३५० मे. टन क्षमतेचा नाविन्यपूर्ण प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे.

- **चिकन मटण वेस्ट प्रक्रिया प्रकल्प** -
  सदर प्रकल्पाच्या प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही पूर्ण झाली असून २५ मे. टन प्रतिदिन क्षमतेचा प्रकल्प पुढील सहा महिन्यात कार्यान्वित होणार आहे.

- **रिजेक्ट वेस्ट प्रक्रिया प्रकल्प** -
  २० मे. टन प्रतिदिन क्षमतेचा सदर प्रकल्प पुढील तीन महिन्यात कार्यान्वित होणार आहे.

- **ओल्या कच-यावरील प्रक्रिया प्रकल्प** -
  ३०० मे टन क्षमतेचा सदर प्रकल्प उभारण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

- **फर्निचर, टेक्स्टाईल वेस्ट, गाद्या, उशा इ. वेस्ट प्रक्रिया प्रकल्प** -
  यासाठी स्वतंत्र ७५ मे. टन क्षमतेचा प्रकल्प उभारण्याचे प्रस्तावित आहे.

- **रस्ते स्वच्छ करणे** -
  शहरातील प्रमुख रस्ते यांत्रिकी पद्धतीने स्वच्छ करण्याचे नियोजन आहे. तसेच शहराच्या प्रमुख प्रवेश ठिकाणांवर Smart Toilet, Bathroom, विश्रांती कक्ष (स्त्री-पुरुष) उभारण्यात येणार आहे.

- **पुणे बायोएनर्जी यांचेमार्फत ७५० मे. टन क्षमतेच्या प्रकल्पामधून १३.९० मेगावॅट क्षमतेची वीजनिर्मिती होणार आहे.**

# (४) आरोग्य (महसुली तरतूद र.रु. ५६९.८९ कोटी)

**सन २०२४-२५ अंदाजपत्रकातील प्रस्तावित योजना/प्रकल्प**

**स्व.राजीव गांधी रुग्णालय येरवडा**

पुणे महानगरपालिकेच्या या स्व.राजीव गांधी रुग्णालय येरवडा येथे जागेमध्ये बायोजेनिक लॅब प्रा.ली. यांना पी.पी.पी तत्वावर अल्प दरामध्ये डायग्नोस्टिक सेंटर सुविधा १० वर्षे कालावधी करीता सी.जी.एच.एस दराच्या १०% कमी दराने रुग्णांना सवलत देण्यात येत आहे.

**पशुवैद्यकीय विभाग**

१) रेबीज फ्री पुणे करण्यासाठी विशेष लसीकरण मोहीम राबविण्यासाठी र.रु.२ कोटींची निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे.
२) रस्त्यावरील भटक्या व मोकाट कुत्र्यांवर/मांजरीवर उपचारासाठी यंत्रणा सज्ज करण्यात आलेली असून नसबंदी शस्त्रक्रिया व लसीकरण करण्यात येते.
३) नवीन समाविष्ठ गावांमधील भटक्या कुत्र्यांची गणना करण्यात आलेली आहे.
४) स्मार्ट प्रोजेक्ट अंतर्गत शेळी/मेंढी कत्तलखाने आधुनिकीकरण/नूतनीकरण करणेस वर्ल्ड बँक यांचेकडून अंदाजे र.रु. ७ कोटीचे अनुदान प्राप्त होणार असून मिटकॉन प्रा. लि. यांची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

**राष्ट्रीय आरोग्य अभियान -**

सदर योजने अंतर्गत ९६ आरोग्यवर्धिनी केंद्र पूर्ण कार्यक्षमतेने कार्यान्वित करण्यात येईल. तसेच ५८ "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" मनपा जागेवर कार्यान्वित करण्यात येणार आहे.

**सन २०२५-२६ अंदाजपत्रकातील प्रस्तावित योजना/प्रकल्प**

- अमृत महोत्सवी आरोग्य अभियान अंतर्गत झोपडपट्ट्यांमध्ये शिबिराचे आयोजन, दवाखाने आधुनिकीकरण, ताणतणाव नियोजन इ. साठी तरतूद करण्यात आलेली आहे.

- पुणे मनपा व खाजगी वैद्यकीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कर्करोग निदाना करिता पेट स्कॅन प्रकल्प सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात कार्यान्वित होणार आहे.

- पुणे महानगरपालिकेच्या शाळामध्ये शिकणाऱ्या ९ ते १४ वयोगटातील मुलीना गर्भाशयाच्या मुखाचा कॅन्सर होऊ नये याकरिता लसीची २ मात्रा देणेकामी लसीची खरेदी करणे आवश्यक असून एका लसीची किमंत १५०० रुपये असून सुमारे पुणे महानगरपालिकेच्या शाळांमधील १५००० मुलीना डोस देण्यासाठी १.०० कोटी रुपयांची तरतूद करणे आवश्यक आहे. काही स्वयंसेवी संस्था CSR फंडामधून परस्पर लसीची खरेदी करुन पुणे महानगरपालिकेस उपरोक्त मोहिमेत सहभागी होणेस इच्छुक आहेत.

**साथरोग नियंत्रण विभाग :-**

केंद्र शासनाने महाराष्ट्रातील चार शहरापैकी पुणे शहराची निवड केली आहे. Metropolitan Surveillance Unit (MSU) स्थापित करण्यात येणार आहे. मुख्य उद्देश साथरोग प्रसार रोखणे कामी अद्ययावत प्रयोगशाळा कुशल मनुष्यबळ शास्त्रीय सर्वेक्षण इ. बाबी उपलब्ध होणार असून भविष्यात विविध प्रकारच्या साथरोगावर तातडीने उपाययोजना, कार्यवाही व सविस्तर अभ्यास करुन सोयीचे होणार आहे.

**राष्ट्रीय आरोग्य अभियान :-**

- पुणे शहरातील नव्याने स्थापन झालेल्या ५२ आरोग्यवर्धिनी केंद्रे तसेच उर्वरित ७३ आरोग्यवर्धिनी केंद्रेव १० पॉलिक्लीनिक आणि २५ "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" कार्यान्वित होणार असून सदर ठिकाणी १९० सुरक्षा रक्षकांची आवश्यक आहे. पुणे मनपा प्रसुतीगृहांमध्ये २४x७ सिझेरियन सेक्शन करणेकामी लॅप्रोस्कोप व ॲनेस्थेशिया मशीन खरेदी करण्याचे प्रयोजन आहे.

**पुणे महानगरपालिका वैद्यकीय शिक्षण ट्रस्ट, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय –**

**<u>सन २०२४ -२५ मधील पूर्ण झालेली महत्त्वाची कामे</u> –**

- वैद्यकीय महाविद्यालयाचे द्वितीय वर्षासाठी र. रु. ५ कोटी पर्यंतची आवश्यक यंत्र व यंत्रसामग्रीची निविदा प्रक्रिया राबवून खरेदी केली आहे.
- वैद्यकीय महाविद्यालयाचे विद्यार्थी यांचेसाठी र. रु.३५ लाख ची आवश्यक बुक्स खरेदी.
- वैद्यकीय महाविद्यालयाचे मुलांसाठी पुणे महानगरपालिकेच्या खराडी येथील इमारतीमध्ये वसतिगृह सुरू करणेत आले.
- नवीन 'C' Shape नायडू इमारतीचे चौथ्या मजल्याचे पर्यंतचे बांधकाम पूर्ण झालेले असून विद्यार्थी यांचेसाठी Exam हॉल, लेक्चर हॉल तयार करणेत आलेला आहे व सुसज्ज इमारतीमध्ये जून २०२५ पर्यंत वैद्यकीय महाविद्यालय सुरू करणे नियोजित आहे.
- भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयाकडील श्री. अनिकेत काळे या विद्यार्थ्यांने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, क्रीडा महोत्सव-२०२४ विद्यापीठाच्या १५० पथकाचे नेतृत्व केले.
- वैद्यकीय महाविद्यालयाकडून पुणे महानगरपलिका कमला नेहरू रुग्णालय येथे १०४ इंटर्न्स डॉक्टर उपलब्ध झाले आहेत.
- वैद्यकीय महाविद्यालयाकडून RURAL HEALTH TRAINING CENTRE, वाडेबोलाई व URBAN HEALTH TRANING CENTER, दळवी हॉस्पिटल येथे सेंटर स्थापन करून दररोज ५ डॉक्टर यांचेकडून सेवा दिली जाते.
- वैद्यकीय महाविद्यालयाकडून वैद्यकीय कॅम्प करून या वर्षात ७६३ लोकांची तपासणी करण्यात आली आहे.
- वैद्यकीय महाविद्यालयाकडून सन २०२४-२५ मध्ये एकूण ५७ शिक्षक पदांची भरती करण्यात आली.

**सन २०२५-२६ मध्ये करणेत येणारी कामे**

- सन २०२५-२६ मध्ये वैद्यकीय महाविद्यालयाचे तृतीय वर्षासाठी र. रु. ७ कोटीचे आवश्यक यंत्र व यंत्रसामग्री खरेदी करणेत येणार आहे.
- नायडू कॅम्पस येथे भव्य १४ मजली विद्यार्थी वसतिगृह व कर्मचारी सदनिकेचे बांधकाम करण्यात येत आहे.
- वैद्यकीय महाविद्यालयास आवश्यक असणारी नियमित शिक्षक (८१ पदे) व शिक्षकेत्तर कर्मचारी (६२ पदे) पदभरती करणेत येणार आहे.

**सन २०२५-२६ अंदाजपत्रक व संक्षिप्त माहिती**

- वैद्यकीय महाविद्यालयाला सन २०२५-२६ या वर्षात र. रु. ४९.४९ (साधारण ५० कोटी) आवश्यकता आहे.
- वैद्यकीय महाविद्यालयाचे सन २०२५-२६ मधील एकूण विद्यार्थी मधून येणारे अंदाजित उत्पन्न र.रु. ३९.६५ कोटी आहे.

# (५) नगररचना नियोजन (महसुली तरतूद र.रु. १०७.९८ कोटी)

**शहर अभियंता कार्यालय (नगररचना व नगर नियोजन विभाग)**

- पुणे महानगरपालिकेच्या हददीत नव्याने समाविष्ट ११ गावापैकी उरुळी देवाची या गावातील नगररचना परियोजना (TPS-6) व फुरसुंगी गावातील नगररचना परियोजना (TPS-9 व TPS-10) याप्रमाणे एकूण ३ परियोजनेस महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ६० (१) अन्वये पुणे महानगरपालिकेच्या मा. मुख्य सभेने दि. ०१/०३/२०१९ रोजी मान्यता दिलेली आहे.
- तीन टि.पी. स्कीम पैकी उरुळी देवाची (TPS-6) साठी १०९.७८ हेक्टर क्षेत्र, फुरसुंगी (TPS-9) साठी २६०.६७ हेक्टर व फुरसुंगी (TPS-10) साठी २३८.५० हेक्टर याप्रमाणे एकूण ६०८.९५ हेक्टर क्षेत्रावर प्रारुप नगररचना परियोजना प्रसिध्द करणेस मा. मुख्य सभेने मान्यता दिलेली आहे.
- शासन निर्णय क. टि.पी.एस १८२२/९८७/प्र.क्र. १४०/२०२२/नवि १३ दि.३०/९/२०२२ अन्वये प्रारुप नगररचना योजना फुरसुंगी क्र. ९ व शासन निर्णय क्र. टि.पी.एस १८२२/९८७/प्र.क्र. १४१/२०२२/नवि १३ दि. ३०/९/२०२२ अन्वये प्रारुप नगररचना योजना उरुळी देवाची क्र. ६ या योजनांना कलम ६८ (२) अन्वये मंजुरी देण्यात आली तसेच लवाद यांची नियुक्ती देखील करण्यात आली.
- लवाद यांनी कलम ७२ अन्वये नगररचना उरुळी देवाची क्र. ६ व फुरसुंगी गावातील नगररचना परियोजना क्र. ९ या नगररचना योजना अंतिम मंजुरीसाठी शासनास सादर केल्या आहेत.
- नगररचना योजनेच्या अंमलबजावणीमुळे पुणे महानगरपालिकेला एकूण क्षेत्राच्या सुमारे ४०% म्हणजेच २४३.५८ हेक्टर क्षेत्र विनामोबदला व विनाविलंब ताब्यात येणार आहे.
- आता महानगरपालिकेने नगररचना योजना ६ उरुळी देवाची २४ मी. रस्ता विकसित करण्यासाठी हाती घेतला असून सदर कामासाठी दि. ०१/०३/२०२४ अन्वये वर्क ऑर्डर देण्यात आलेली आहे.
- नगररचना योजना ६ उरुळी देवाची या योजनेमधील २४ मी. रस्ता विकसित करण्यासाठी र.रु. ३२ कोटी इतकी आवश्यकता आहे. सदर काम हे किमान दोन वर्ष चालणार असल्याने दर वर्षी बजेटमध्ये तरतुद उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७२ ब अन्वये सदर कामाचे दायीत्व स्वीकारुन दर वर्षी बजेट कोड मध्ये आर्थिक तरतुद उपलब्ध करुन मिळणेसाठी मा. मुख्य सभेची मान्यता घेण्यात आलेली आहे.
- परंतु शासन निर्णय क्र. एमयुएन-२०२३/प्रक्र१८/नवी-१८ दि.११/०९/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार उरुळी देवाची व फुरसुंगी ही गावे मनपा हद्दीतून वगळण्यात आलेली आहेत.
- आता सदर नगररचना योजना यांची पुणे महानगरपालिकेमार्फत अंमलबजावणी करणेबाबत शासनाकडे पत्रव्यवहार सुरु आहे.
- सदर नगररचना योजना क्र. ६ व ९ यांची अंमलबजावणी पुणे महानगरपालिकेमार्फत करणेबाबत शासनामार्फत मान्यता आलेनंतर सदर कामे करणेसाठी तरतुदींची आवश्यकता आहे.

## शहर अभियंता कार्यालय, विकास योजना कक्ष

**सन २०२४-२५ दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक संक्षिप्त माहिती**

**शहर अभियंता कार्यालय डि.पी. मार्कींग व इतर योजना**

- पुणे शहराचा (जुनी हद्द) व यापुर्वी समाविष्ट २३ गावांचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर आराखड्यामध्ये विविध रस्ते व आरक्षणे नियोजित करण्यात आलेली आहे.
- मान्य विकास आराखड्यामधील रस्त्यांचे (डी.पी. रोड) विकसन महानगरपालिकेच्या पथ विभागामार्फत करणेत येत आहे. तसेच सार्वजनिक हितासाठीचे आरक्षणे विकसन करुन नागरीकांकारीता उपलब्ध करणे ही पुणे महानगरपालिकेची जबाबदारी आहे.
- सदर विकास योजनेतील रस्त्यांची हद्द व आरक्षणे यांच्या आखणी निश्चित करणेबाबत तसेच प्रत्यक्ष जागेवर डि.पी. रस्त्यांचे मार्कींग करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. अशा रितीने आरक्षणाची हद्द निश्चित झाल्यास तेथे अतिक्रमण होऊ शकणार नाही, तसेच रस्त्याचे व आरक्षणांचा ताबा घेणे व विकसन करणेही पुणे महानगरपालिकेस सुलभ होणार आहे.

**पुणे मनपा हद्दीमध्ये सन २०१७ मध्ये समाविष्ट झालेल्या ११ गावांचा प्रारुप विकास आराखडा**

- पुणे मनपा हद्दीमध्ये सन २०१७ साली समाविष्ट झालेल्या ११ गावांचा विकास योजना आराखडा तयार करणेचे काम शासनाचे आदेशानुसार मा.सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे विभागाकडे देण्यात आलेले आहे. तथापि, त्याबाबतचा येणारा सर्व खर्च हा पुणे महानगरपालिकेने करावयाचे आदेश आहेत. सबब नगररचना विभागाकडून याबाबत वेळोवेळी मागणी केल्यानुसार संबंधित कामाचा खर्चाची रक्कम पुणे मनपाकडून अदा करण्यात येणार आहे.

**पुणे मनपा हद्दीमध्ये सन २०२१ मध्ये समाविष्ट झालेल्या २३ गावांचा प्रारुप विकास आराखडा**

- शासन निर्णय क्र.पीएमसी-२०२०/प्र.क्र.३२२/नवि-२२, दि.३०/०६/२०२१ अन्वये पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने २३ गावांचा समावेश करण्यात आला. सदर २३ गावांकरता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४० (१)(घ) नुसार पुणे महानगर प्रदेश विकास प्रधिकरणाची विशेष नियोजन प्रधिकरण म्हणून शासन अधिसुचना क्र. टीपीएस -१८२१/११६७/प्र.क्र.-९८/२०२९/नवि-१३, दि. १४/०७/२०२१ अन्वये नेमणूक करण्यात आलेली आहे.

- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ (१) अन्वये दि.०२/०८/२०२१ रोजी प्रसिध्द केला आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३० अन्वये पुणे महानगर प्रदेश विकास प्रधिकरण यांचेकडून प्रारुप विकास आराखडा शासनास मंजुरीसाठी सादर करण्यात येईल.

**सन २०२४-२५ मधील महत्वाच्या पूर्णत्वास/सुरु असलेल्या नाविन्यपूर्ण योजना / प्रकल्पांची नावे, ठळक बाबी**

- समाविष्ट ११ गावांचे हद्दी दर्शविणारा नकाशा जाहीर प्रकटनासह ४ ऑक्टोबर २०१९ रोजी प्रसिध्द करणेत आलेला आहे.

- पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांचा प्रारुप विकास योजना आराखडा तयार करण्याच्या दृष्टीने विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करण्यात आला आहे.

- भविष्यकालीन लोकसंख्येचा आढावा, सामाजिक, आर्थिक विश्लेषण याकरिता गोखले इन्स्टिट्युट्स ऑफ पॉलिटिक्स ॲण्ड इकॉनॉमिक्स या संस्थेमार्फत ११ गावांमध्ये नमुना सर्व्हेक्षण करण्यात आले आहे.

- विद्यमान जमीन वापर सर्वेक्षण व अन्य वैधानिक प्रक्रीयेअंतर्गत कागदपत्रे इ. माहिती तसेच सहायक संचालक, नगररचना, पुणे शाखा, पुणे यांनी मागणी केलेली अन्य माहिती सहायक संचालक, नगररचना, पुणे शाखा, पुणे यांना सादर केलेली आहे. त्यांचेकडून या गावांचा प्रारुप विकास आराखड्याचे काम सुरु आहे.

**प्रधानमंत्री आवास योजना**

- पुणे महानगरपालिकेमार्फत प्रधानमंत्री आवास योजने "सर्वासाठी घरे २०२२" अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमधील नागरिकांसाठी "परवडणारी घरे घटक क्र. ३" या घटकाअंतर्गत वडगाव खु., खराडी येथे प्रत्येकी एक व हडपसर येथे तीन असे एकूण पाच गृह प्रकल्पांमध्ये एकूण २६५८ सदनिकांच्या बांधकाम पूर्ण झाले आहे. प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या सदनिकांचे सोसायटी नोंदणी पूर्ण झालेली आहे.
- मा. पंतप्रधान महोदय यांनी दि. १७.०९.२०२४ रोजी प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० ची घोषणा केली असून त्यास अनुसरुन संदर्भ क्र. ०१ अन्वये महाराष्ट्र शासनाने सर्वांसाठी घरे संकल्पनेवर आधारित "प्रधानमंत्री आवास योजनेची (शहरी) २.०" राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत दि.१५.१०.२०२४ रोजी शासन निर्णय जारी केला आहे.
- पुणे महानगरपालिके मार्फत घटक क्र. ०२ अंतर्गत भागीदारी तत्वावरील परवडणारी घरे (Affordable Housing in Partnership) (AHP) या तत्वावर परवडणारी घरांची निर्मिती करण्यात येणार आहे. त्यास अनुसरुन पुणे महानगरपालिका हद्दीतील एच.डी.एच. व ई.डब्लू.एस. आरक्षणाने बाधित मिळकतीवर सदर योजना राबविण्यात येणार आहे.

**नियोजित प्रकल्प व प्रस्तावित घरे**

- पुणे महानगरपालिकाच्या वतीने एच.डी.एच. व ई.डब्लू.एस. आरक्षणाने बाधित बालेवाडी, धानोरी, कोंढवा, हडपसर व वडगाव या भागात एकूण ५ प्रकल्पांचे नियोजन करीत असून त्याद्वारे साधारण ४१७३ घरे बांधकाम करण्याचे उद्दिष्ट आहे.
- सदर योजने अंतर्गत पुणे महानगरपालिकेमार्फत जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्याने कमी किमतीमध्ये घरे उपलब्ध होणार आहेत.
- प्रधान मंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत नवीन गृह प्रकल्प राबविण्याकरिता र.रु. ७६.५० कोटी तरतूद सन २०२५-२६ उपलब्ध करण्यात आली आहे.

**(Intelligent Works Management System)**

- पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकानुसार मान्य निधीमधून पुणे शहरामध्ये विविध विकासकामे करण्यात येतात. यामध्ये आर्थिक वर्ष सन २०२३-२४ मध्ये मुख्य विभागामार्फत म्हणजेच पथ विभाग, पाणी पुरवठा, भवन रचना, मलनिःसारण, प्रकल्प, मलनिःसारण विभाग इ. मार्फत सुमारे २३९१ पूर्वगणकपत्रक तयार करुन निविदा मागविण्यात आलेले आहेत. तसेच परिमंडळ अंतर्गत १५ क्षेत्रिय कार्यालयानुसार सुमारे ४८६३ पूर्वगणकपत्रक तयार करुन निविदा मागविण्यात आलेले आहेत. पुणे महानगरपालिकेमध्ये यापूर्वी Works Management System वापरात होते. परंतु सदर प्रणाली काळानुरुप अद्यावत करणे आवश्यक असल्याने, नव्याने Intelligent Works Management System विकसित करण्यात आलेली आहे.

**या सुधारीत संगणक प्रणालीमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.**

१) सदर संगणक प्रणाली G.I.S. Base संगणक नकाशाशी संलग्न करण्यात आलेली आहे.
२) सदर संगणक प्रणालीद्वारे खात्यानुसार, खाते प्रमुखांनुसार एकत्रितरित्या माहिती उपलब्ध होईल.
३) सदर संगणक प्रणालीद्वारे खात्याअंतर्गत होणाऱ्या विविध प्रकारच्या कामांची वर्गवारी करणे व त्यावरील होणार खर्च याची माहिती प्राप्त होईल.
४) कामाच्या विविध टप्प्यांची माहिती उपलब्ध होऊन कामाची गती तपासणे शक्य होईल.
५) पुणे महानगरपालिकेकडे सध्या अस्तित्वातील विविध संगणक प्रणालीशी सदर संगणक प्रणाली सुसंगत राहणार आहे.
६) G.I.S. संगणक प्रणालीद्वारे तयार करण्यात आलेल्या नकाशांशी सदर प्रणाली जोडण्यात आल्याने, मागील वर्षी करण्यात आलेल्या कामाबाबतचा आढावा घेणे सुलभ झाल्याने, आगामी अंदाजपत्रक तयार करणेस सुलभता येईल.
७) सदर संगणक प्रणालीमध्ये ठेकेदार व तज्ञ सल्लागार यांना लॉगिन देण्यात आलेले आहे.
८) सदर संगणक प्रणालीमध्ये प्रकल्प सल्लागार व ठेकेदार या संगणक प्रणालीद्वारे त्यांचे सुचना नोंदविणे, गुणवत्ता तपासणी अहवाल सादर करणे, पूर्वगणकपत्रक सादर करणे, कामांची बिले सादर करणे व बिलांची तपासणी करणे इत्यादी सुविधा देण्यात आलेल्या आहेत.
९) सदर संगणक प्रणालीस SAP System द्वारे मुख्य लेखा व वित्त विभागाशी जोडण्यात आलेले आहे.

**सदर संगणक प्रणालीचे फायदे :**

१) अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार पूर्वगणकपत्रक ते अंतिम देयक पर्यंत सर्व कामे ऑनलाईन करुन सर्व कामे पेपर लेस ऑफीस होत आहेत.
२) सदर संगणक प्रणालीमधील माहितीमुळे कामाचा Defect Liability Period एकाच स्क्रीनमध्ये प्राप्त होईल.
३) सदर संगणक प्रणाली मोबाईल ॲपद्वारे संचलित असल्याने संबंधित अभियंता साईटवर सर्व माहिती अपडेट करु शकेल.
४) भविष्यात उद्भवणा-या विविध गरजा, कामाची गुणवत्ता व दर्जा अबाधित राखणेकरिता उपाययोजना इ. बाबी संगणक प्रणालीद्वारे करणे शक्य होईल.
५) एखाद्या प्रकल्पामुळे दुस-या प्रकल्पावर होणारे संभाव्य परिणाम इत्यादी बाबत महत्वाचे निर्णय घेणे शक्य होईल.
६) सदर संगणक प्रणालीमधील कामे काही ठराविक अप्लिकेशनद्वारे नागरिकांना पाहणेस उपलब्ध होणार आहे.

**UDCPR-2020 नुसार TOD व LAP या प्रकल्पाबाबत**

- यु डी सी पी आर २०२० मधील कलम १४.२.१.२.२ मध्ये विनियमामध्ये मेट्रो स्टेशन परिसराचा लोकल एरिया प्लॅन (LAP) तयार करणेबाबतची तरतूद आहे. सदरील लोकल एरिया प्लॅन (LAP) स्थानिक रहिवाशांच्या सहभागासह तयार करावयाचे असून यामध्ये प्रमाणात घनता (optimum densification) संपूर्ण पादचारी सुनिश्चित करण्यासाठी संपूर्ण स्ट्रीट डिझाईन इत्यादी कामे करावयाचे आहे. पुणे शहराकरिता मेट्रो स्टेशनच्या ५०० मी. परीक्षेत्रामध्ये वाढीव एफएसआय देणे बाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे ५०० मी. परिक्षेत्रामध्ये लोकसंख्या घनता वाढणार आहे. सबब त्याकरिता लागणाऱ्या सोयी सुविधा उदा. गार्डन, पार्किंग स्पेस, हॉस्पिटल इ. जीवनावश्यक सुविधा देणेकरिता मेट्रो स्टेशन पासून १००० मी. परिघ क्षेत्राकरिता लोकल एरिया प्लॅन तयार करुन त्यानुसार अंमलबजावणी करायची आहे.

- सद्यस्थितीत पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये LAP प्रकल्पाअंतर्गत पॅकेज -१ अंतर्गत स्वारगेट मेट्रो स्टेशन व रामनगर (बाणेर) मेट्रो स्टेशन अंतर्गत प्रकल्पाचे काम Design Point Consult Pvt. Ltd या कंपनीस कार्यादेश दिला आहे. तसेच पॅकेज -२ अंतर्गत पुणे रेल्वे स्टेशन व वनाज मेट्रो स्टेशन या प्रकल्पांचे काम IBI Group India Pvt. Ltd. या कंपनीस वर्क ऑर्डर दिलेले आहे व त्या अनुषंगाने काम सुरु केलेले आहे. सदर पॅकेज -१ अंतर्गत १ कोटी १२ लाख इतक्या रक्कमेचे काम सुरु असून व पॅकेज-२ अंतर्गत १ कोटी ३४ लाख ७५ हजार इतक्या रक्कमेचे काम सुरु आहे. तसेच पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रस्तावित मेट्रो स्टेशन अंतर्गत TOD व LAP झोन प्रकल्पाच्या अनुषंगाने सन २०२५ ते २०२६ या आर्थिक वर्षात **र.रु. ५ कोटी** इतकी तरतूद उपलब्ध होणे आवश्यक आहे.

**अनधिकृत बांधकामावरील कारवाई**

- पुणे शहरातील पक्क्या स्वरुपाच्या बहुमजली अनधिकृत बांधकामावर कारवाई करणेकरिता कायम स्वरुपी हायड्रोलिक डीमोलीशन मशीन (जॉ क्रशर) पुणे महानगरपालिकेने मार्च २०२२ मध्ये खरेदी केलेले आहे. सदरच्या हायड्रोलिक मशीनने बहुमजली अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात येत आहे. सदर मशिनने एप्रिल २०२३ पासुन ते डिसेंबर २०२४ पर्यंत सुमारे ३०,६५०० चौ. फुट इतके अनधिकृत बांधकामांवर कारवाई केलेली आहे. सदरच्या जॉ-क्रशर मशिनच्या कारवाईमुळे अनधिकृत बांधकामांना आळा बसायला सुरुवात झाली आहे. सन २०२५-२६ अंदाजपत्रकात नव्याने जॉ-कटर मशिन खरेदी करण्याचे नियोजित करण्यात आलेले आहे.

## (६) <u>वाहतूक नियोजन व प्रकल्प (भांडवली तरतूद र.रु. २७९.६५ कोटी)</u>

**<u>सन २०२४-२५ मधील महत्वाच्या पूर्णत्वास / सुरु असलेल्या नाविन्यपूर्ण योजना / प्रकल्प</u> –**

- घोरपडी येथील पुणे - सोलापूर रेल्वे लाईनवरील उड्डाणपुलाचे बांधकाम (ROB-II गेट नं. ६८) पूर्ण झाले असून तो वाहतुकीस खुला करण्यात आला आहे. त्यामुळे पुणे कॅन्टोन्मेंट आणि कोरेगाव पार्क भागामधील वाहतुकीमध्ये सुधारणा झाली असून रेल्वे गेट येथे होणारी वाहतुकीची कोंडी संपुष्टात आली आहे. नॉर्थ मेन रोड, मुंढवा परिसर ते हडपसर या प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणावर वाचला आहे.
- सिंहगड रस्त्यावरील राजाराम पूल चौकातील उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण झाले असून तो वाहतुकीस खुला झाला आहे. त्या व्यतिरिक्त विठ्ठलवाडी ते फनटाईम सिनेमा व इंडियन ह्यूम पाईप कंपनीचे गेट ते इमानदार चौक या दरम्यानच्या उड्डाणपुलाचे काम सुमारे ८६% पूर्ण झाले आहे. स्वारगेट कडून फनटाईमकडे जाणाऱ्या उड्डाणपुलाची बाजू फेब्रुवारी २०२५ पर्यंत वापरासाठी खुली होणार असून फनटाईम सिनेमा कडून इनामदार चौकाकडे येणारी बाजू मे २०२५ पर्यंत वापरासाठी खुली होणार आहे. त्यामुळे सिंहगड रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी संपुष्टात येऊन नागरिकांचा प्रवासाचा वेळ वाचणार आहे. तसेच वायू प्रदूषणात मोठ्या प्रमाणावर घट होणार आहे.
- सिंहगड रस्ता, सनसिटी ते कर्वेनगर या दरम्यान नदीवर उड्डाणपुलाची उभारणी सुरु असून जागेवर सुमारे ४०% काम पूर्ण झाले आहे. जुलै २०२५ अखेर पर्यंत या पुलाचे बांधकाम पूर्ण होऊन तो वाहतुकीस खुला होणार आहे. त्यामुळे कर्वेनगर आणि सिंहगड रस्ता एकमेकांस जोडला जाणार असून या भागातील वाहतुकीचा वेग वाढून प्रवासाच्या वेळेत बचत होणार आहे.
- कोरेगाव पार्क ते कल्याणीनगर या दरम्यानच्या, नदीवरील आगाखान पुलाची रुंदी १० मी. ने वाढविण्याचे काम जागेवर सुरु असून नॉर्थ मेनरोड बाजूकडील चॅम्फरचे काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे कल्याणीनगरकडे जाणाऱ्या वाहतुकीमध्ये सुधारणा झाली आहे व तेथील सिग्नलवर होणारी वाहतूक कोंडी कमी झाली आहे. सदरच्या पुलाचे बांधकाम सन २०२५ अखेरीस पूर्ण होणार आहे.
- नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबविणे - पुणे शहरामधून वाहणाऱ्या मुळा, मुठा व मुळा - मुठा नदीची लांबी ४५ कि. मी. आहे. या प्रकल्पासाठी र.रु. ४७२७ कोटींच्या डी. पी. आर. करीता मा. मुख्य सभेची मान्यता प्राप्त आहे. सदरच्या प्रकल्पाची एकूण ११ टप्प्यात विभागणी केलेली असून, त्यापैकी संगमवाडी पूल ते बंडगार्डन पूल (स्ट्रेच-९) निविदा र.रु. २६५ कोटी इतकी असून ठेकेदार यांचेमार्फत जागेवर ७४% काम पूर्ण झाले आहे. तसेच बंडगार्डन पूल ते मुंढवा पूल (स्ट्रेच-१० व ११) साठी निविदा र.रु. ६०५ कोटी इतकी आहे. हे काम पी.पी.पी. धर्तीवर करण्यात येत असून त्या अंतर्गत नदीकाठचा रस्ता क्रेडीट नोट मोबदल्याच्या स्वरुपात विकसित करणेचे काम जागेवर काम सुरु असून, त्यापैकी २३% काम पूर्ण झालेले आहे. उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत.
- कोरेगाव पार्क येथील साधू वासवानी रेल्वे उड्डाणपुलाचे पुनर्निर्माण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. या रेल्वे पुलाचे काम डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सदरचा रेल्वे पूल हा पूर्वीच्या पुलापेक्षा दुप्पट रुंदीचा उभारण्यात येत असल्याने कोरेगाव पार्क आणि पुणे छावणी परिषद हे परिसर एकमेकांस जोडले जाणार आहेत. त्यामुळे वाहतूक गतिमान होणार असून प्रवासाचा वेळ आणि इंधन या

दोहोंची बचत होणार आहे. त्याचप्रमाणे या नवीन पूलामुळे जड वाहनांची वाहतूक देखील सुरळीतपणे व सुरक्षितपणे करणे शक्य होणार आहे.

- विश्रांतवाडी येथे ग्रेड सेपरेटर / उड्डाणपूल बांधणेचे काम प्रगतीपथावर असून सुमारे २३% पूर्ण झाले आहे. मार्च २०२६ अखेरपर्यंत हे काम पूर्ण करुन ग्रेड सेपरेटर आणि उड्डाणपूल वाहतुकीस खुला करण्याचे नियोजन आहे.
- घोरपडी रेल्वे गेट क्र. ५८६ (ROB- I, पुणे मिरज रेल्वे लाईन) येथे उड्डाणपूल बांधणे हे काम प्रगतीपथावर असून सुमारे २७% पूर्ण झाले आहे. मार्च २०२६ अखेरपर्यंत हे काम पूर्ण करुन सदरचा रेल्वे उड्डाणपूल वाहतुकीस खुला करण्याचे नियोजन आहे. त्या व्यतिरिक्त या नवीन पूलामुळे जड वाहनांची वाहतूक देखील सुरळीतपणे व सुरक्षितपणे करणे शक्य होणार आहे. घोरपडी बाजार परिसरातील दररोजची वाहतूक कोंडी संपुष्टात येवून नागरिकांना आणि दुकानदार यांना मोठ्या प्रमाणावर दिलासा मिळणार आहे.
- पुणे नगर रस्ता, येरवडा, शास्त्रीनगर चौक येथे ग्रेड सेपरेटर / उड्डाणपूल बांधणे या कामाचा कार्यादेश देण्यात आला असून जागेवर कामास सुरुवात झाली आहे. सदर भुयारी मार्ग व उड्डाणपुलाचे बांधकाम मार्च २०२७ अखेरपर्यंत पूर्ण करुन वाहतुकीस खुला करण्याचे नियोजन आहे.
- पुणे शहरातील विविध पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट केले असून त्याअनुषंगाने ११ पुलांची दुरुस्ती कामे प्रस्तावित केली आहेत. त्यापैकी ७ पुलांची दुरुस्ती कामे पूर्ण केली आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने जुन्या पुलांचे बेअरींग्ज व एक्स्पांशन जॉईंट बदलणेचा समावेश आहे. सदर कामाची प्रगती सुमारे ४०% इतकी झाली आहे.

**सन २०२५-२६ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रकातील संक्षिप्त व महत्वाच्या / प्रस्तावित प्रकल्पांची माहिती**

- मुंढवा येथील महात्मा फुले चौक या ठिकाणी ग्रेड सेपरेटर बांधणेसाठी तज्ञ सल्लागार यांची नियुक्ती प्रक्रिया सुरु आहे. या कामामुळे केशवनगर मुंढवा आणि मगरपट्टा, हडपसर ते खराडी या दरम्यान होणारी वाहतुकीची कोंडी कमी होणार आहे.
- हडपसर रेल्वे गेट क्र. ७ येथे भुयारी मार्ग बांधणेसाठी तज्ञ सल्लागार यांची नियुक्ती केली असून पुढील प्रक्रिया सुरु आहे. या कामात वाहन भुयारी मार्ग बांधणे व त्या सोबतच पादचारी भुयारी मार्ग उभारण्याचे नियोजन केले आहे. या कामामुळे सदरचे रेल्वे गेट कायमस्वरुपी बंद होणार आहे.
- मान्यता प्राप्त विकास आराखड्यातील व ताब्यात आलेले ट्रक टर्मिनलचे विकसन करणे व PMPML च्या जागांवर बस डेपो विकसित करणे यासाठी र.रु. २ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे.
- पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी र.रु. ४० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे.
- पुणे नगर रस्त्यावरील खराडी बायपास येथे ग्रेड सेपरेटर बांधणे या कामासाठी र.रु. ८ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे. तसेच या कामासाठी सल्लागार नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदरचे काम मेट्रोचे समन्वयाने करण्याचे नियोजन आहे.
- गणेशखिंड रस्त्यावरील ४ ठिकाणी ग्रेड सेपरेटर / उड्डाणपूल बांधणे या कामासाठी र.रु. १५ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे. तसेच या कामासाठी सल्लागार नियुक्ती करण्यात आलेली आहे. मेट्रो उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर व आवश्यकतेनुसार, टप्याटप्याने या सर्व ठिकाणी काम सुरु करण्याचे नियोजन आहे.
- नदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठी एकूण र.रु. २७० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे. त्यामध्ये नदी / नदी काठ विकसित करणे व PPP धर्तीवर क्रेडीट नोटचे मोबदल्यात नदी / नदी काठ व रस्ता विकसित करणे यांचा समावेश आहे.
- येरवडा येथील बिंदू माधव बाळासाहेब ठाकरे चौकात ग्रेड सेपरेटर / उड्डाणपूल बांधणेसाठी र.रु. ८ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे. तसेच या कामासाठी सल्लागार नियुक्ती करण्यात आलेली आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर संगमवाडी रस्त्यावरील आणि पर्णकुटी चौक ते डेक्कन कॉलेज रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी कमी होणार आहे. त्यामुळे विमानतळाकडे जाण्यासाठी लागणाऱ्या प्रवासाचा वेळ कमी होणार आहे.
- खडकी छावणी परिषद हद्दीमधील, पुणे - मुंबई रेल्वे लाईन खालील अस्तित्वातील दोन भुयारी मार्गांचे रुंदीकरण रेल्वेमार्फत करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी प्रत्येकी र.रु. ४ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे. जुन्या पुणे - मुंबई राष्ट्रीय महामार्गावरील शासकीय अंडी उबवणी केंद्र आणि खडकी पोलीस स्टेशन जवळील दोन्ही अस्तित्वातील रेल्वे भुयारी मार्गांचे रुंदीकरण करण्यात येणार असून त्यामुळे गणेश खिंड रस्ता, रेंजहिल्स व जुना मुंबई - पुणे रस्ता, खडकी या दरम्यानच्या वाहतुकित मोठ्या प्रमाणावर सुधारणा होणार आहे. तसेच दोन्ही भुयारी मार्गामध्ये पावसाळ्यात पाणी साठून ते वाहतुकीस बंद होण्याची समस्या सुटणार आहे.
- पुणे शहरातील स्ट्रक्चरल ऑडीट केलेल्या विविध पुलांची दुरुस्ती विषयक कामे करणे यासाठी र.रु. १० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे.
- मुठा नदीवरील शिवणे ते नांदेड सिटीला जोडणारा नदीवरील पूल बांधणे यासाठी र.रु. ५ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे.

## (७) पथ विभाग, (भांडवली तरतूद र.रु. ११२६.३० कोटी + महसुली तरतूद र.रु. ५००.२७ कोटी = र.रु. १६२६.५७ कोटी)

**सन २०२४-२५**

पथ विभागामार्फत एमएनजीएल, विविध मोबाईल कंपन्याचे केबल्स, एमएसईबी केबल्स इ. खोदाईकरिता रस्ता दुरूस्तीचे शुल्क आकारण्यात येत असते, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात र.रु. २२.८४ कोटी डिसेंबर-२०२४ अखेर पर्यंत जमा झालेले असून मार्च २०२५ अखेर पर्यंत अंदाजित र.रु. ३५.०० कोटी महसुल जमा होण्याचा अंदाज आहे.

**सन २०२४-२५ मध्ये पुर्णत्वास येत असलेली कामे**

- शहरातील आंबील ओढयावरील अस्तित्वातील पुल कमी वहन क्षमतेचे होते ते जुने पुल पाडून पुरेश्या नाला वहन क्षमतेचे नवीन पुल बांधण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आलेला होता. या अंतर्गत आंबील ओढयावर पर्वती बेसिन व हिंगणे बेसिन असे २१ पुलापैकी मिळून एकूण १८ नवीन पुलांची कामे करण्यात आलेली असून या कामांमुळे आंबिल ओढयाचा पुराचा धोका टाळण्यास मोठी उपयुक्तता झालेली आहे.
- शहरातील मुख्य वाहतुकीचे व महत्वाचे रस्ते सुस्थितीत राहण्यासाठी रस्त्यांची रॅम्स या मशिनव्दारे तांत्रिक तपासणी करण्यात आलेली असून त्या अंतर्गत दुरूस्ती आवश्यक असलेल्या सुमारे १५५.६६ कि.मी. लांबीच्या रस्ते दुरूस्ती करिता स्वतंत्र ६ पॅकेजनुसार निविदा मागवून कामे करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत पॅकेज क्र.१ ते ५ मिळून १००.६८ कि.मी. लांबीच्या रस्त्याची कामे पुर्ण करण्यात आलेली आहेत. उर्वरित कामे पॅकेज ७ व ८ मधून चालू असून मार्च-२०२५ अखेर पर्यंत पुर्ण करण्यात येतील पुर्नःडांबरीकरणाच्या या कामामध्ये या रस्त्यावरील वाहतुक सुरळीत झालेली आहे. त्याचबरोबर मोठया प्रमाणात वाहतुक असलेले एकूण ८.५ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काँक्रीटीकरणाचे काम या पॅकेज १ अंतर्गत हाती घेण्यात आलेले आहे.

१) गणेशखिंड रस्त्यावर विद्यापीठ चौक ते आर.बी.आय. दरम्यान अस्तित्वातील ३६ मी. चा रस्ता रुंदी रुंदीकरण करून ४५ मी. पर्यंत रुंद करण्याचे काम युध्द पातळीवर हाती घेवून पुर्ण केले आहे. उर्वरित टप्पा २ चे कामही हाती घेतले आहे. पीएमआरडीए मार्फत प्रस्तावित मेट्रो व दुहेरी उड्डाणपुलाच्या कामासाठी सदर रुंदीकरण वाहतुक नियोजनाच्या दृष्टीकोनातुन उपयुक्त ठरणार आहे.

२) जुना मुंबई-पुणे रस्त्याचे अस्तित्वातील २१ मी. रस्त्याचे ४२ मी. रुंदीपर्यंत रुंदीकरणासह काँक्रीटीकरणाचे काम रेंजहिल्स ते बोपोडी चौक दरम्यान सुरु आहे. या कामामुळे जुना मुंबई-पुणे रस्त्यावरून पुणे शहरामध्ये येणारी / शहरातून जाणारी वाहतुक सुरळीत होणार आहे.

३) लोहगाव एअरपोर्ट परिसरातील विश्रांतवाडी ते ५०९ चौक व एअरपोर्ट गेट ते नागपुर चाळ या दोन्ही रस्त्यांची सुधारणा कामे हाती घेण्यात आलेली आहे.

४) एअरपोर्टकडे ये-जा करणारी वाहतुक सुरळीत होण्याकरीता स.नं. २२५ लोहगाव या भागामध्ये नवीन पर्यायी रस्त्याचे काम पुर्ण करण्यात आलेले आहे.

५) नगर रस्त्यावर गुंजन चौक ते खराडी दरम्यान साईड पट्ट्याची कामे पुर्ण करून वाहतुकीसाठी अतिरिक्त लेन निर्माण करण्यात आलेली आहे. त्यापुढेही वाघोलीपर्यंत वाहतुक कोंडी सोडविण्याचे काम पीएमआरडीए/एनएचएआय/वाहतुक पोलिस यांचे समन्वयाने हाती घेण्यात आले आहे.

६) मान्य विकास आराखडयातील बावधन येथील पीव्हीपीआयटी कॉलेज जवळील भुगांव मुख्य रस्त्यापासून पीव्हीपीआयटी कॉलेजकडे जाणारा २४ मी. डी.पी. रस्ता अंशतः विकसित करण्यात आलेला आहे व ह्या रस्त्यापासून १८ मी. डी.पी. रस्त्याचे काम अॅम्ब्रोसिया रिसोर्ट पर्यंत मुख्य भुगांव रस्त्यापर्यंत प्रस्तावित असून रस्ता विकसनाचे काम पुर्णत्वास आले आहे. यामुळे ३ कि.मी. लांबीची वाहतुकीसाठी नवीन लिंक उपलब्ध होणार आहे. उर्वरित कामाचाही या अंदाजपत्रकात समावेश आहे.

७) मुंढवा चौक येथील २४ मी. रुंदीचा संपादित डी.पी. रस्ता रुंदीतील अतिक्रमणे काढून रस्ता रुंदी करणेत आली आहे. तसेच मुंढवा चौक ते नदीवरील ब्रीज दरम्यान ३६ मी. रस्ता रुंदीतील बांधकामे काढून रस्ता रुंदी विकसनाचे काम चालू करण्यात येणार आहे. या कामामुळे वाहतुकीच्या दोन अतिरिक्त लेन निर्माण होवून वाहतुकीची कोंडी कमी झालेली आहे.

८) पुणे मनपाने कात्रज कोंढवा रस्त्याचे कात्रज चौक ते खडी मशीन चौक, पिसोळी हद्दीपर्यंत ३.५ कि.मी. लांबीचा व ८४ कि.मी. रुंदीचे रस्त्याचे काम हाती घेतलेले आहे. शासनाकडून सदर रस्त्याच्या भुसंपादनातील काही अडचणी विचारात घेता प्रथम टप्प्यात ५० मी. रुंदीपर्यंत काम करण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता. शासनाकडून रस्त्याच्या भुसंपादनाकरिता र.रु.१३९ कोटी प्राप्त झालेले असून

पुणे मनपाचे हिस्सासह ८४ मी. प्रमाणे रुंदीचे भुसंपादन चालू आहे. सद्यस्थितीत रस्त्याचे काम उपलब्ध जागेनुसार सुरू असून मार्च-२०२६ अखेर शत्रुजय मंदिर ते खडी मशिन चौक दरम्यान ग्रेड सेपरेटरसह रस्ता पुर्ण होवून अंशतः वाहतुकीस खुला करण्याचा इरादा आहे.

९) पुणे महानगरपालिकेने येरवडा हॉटमिक्स प्लॅन्ट परिसरात माल मटेरियल तपासणीसाठी अद्यावत प्रयोगशाळा उभारण्याचे काम हाती घेतले असून मार्च-२०२५ पर्यंत सदरची अद्यावत प्रयोगशाळा सुरू करणार आहोत.

१०) पुणे मनपा नवीन अदयावत हॉटमिक्स २ प्लॅन्टची उभारणी करणार आहे जेणेकरून शहराचे दक्षिण व उत्तर भागात डांबरी मालाचा पुरवठा सहजपणे करता येईल.

## <u>सन २०२५-२६ नव्याने प्रस्तावित कामे -</u>

- पुणे शहरातील वाहतुक कोंडी टाळण्यासाठी, नवीन पर्यायी मार्ग निर्माण करण्यासाठी मान्य विकास आराखडयातील रस्त्याची ३३ मिसिंग लिंक विकसित करण्याचा पुणे मनपाने हाती घेतलेला आहे. यामध्ये अस्तित्वातील डी.पी. रस्त्यानां जोडणारी मिसिंग लिंक विकसित करून एक मध्यवर्ती वर्तुळाकार मार्ग वाहतूकीसाठी उपलब्ध करणे आणि पर्यायी वाहतुकीसाठी ३० मिसिंग लिंक विकसित करणे व ३ मिसिंग लिंक ताब्यात आहेत या रस्त्यांच्या भुसंपादनासाठी तसेच तडजोडीने जागा ताब्यात घेण्यासाठी पाठपुरावा करण्यात आले आहे व टप्पे निहाय मिसिंगलिंकचे काम पुर्ण करण्यात येणार आहे.

- पुणे मनपाचे विविध रुंदीच्या डिपी रस्त्याची व सार्वजनिक वापराच्या रस्त्याची एकूण लांबी २०४२ कि.मी. आहे. या सर्व रस्त्याचे तांत्रिक विश्लेषण रोड अॅसेस मॅनेजमेंट सिस्टिम (Rams) व्दारे प्रतिवर्षी पथ विभागामार्फत करण्यात येत असून त्यानुसार रस्त्याची वहनक्षमता व करावयाच्या उपाययोजना याचा अहवाल तयार करण्यात येवून त्या अनुषंगाने आर्थिक तरतूद करून कामे टप्प्याटप्याने करण्यात येत आहेत.

- शहरातील मोठया प्रमाणात वाहतुक असलेले एकुण ३३ मुख्य रस्ते निश्चित करण्यात आलेले असून पहिल्या टप्प्यात १५ व दुसऱ्या टप्प्यात १८ रस्त्याचे नियोजन आहे. रस्त्यांसाठी मिशन-१५ ही संकल्पना प्रस्तावित केलेली आहे. या अंतर्गत या रस्त्यांवर वाहतुकीस योग्य अशा सर्व प्रकारच्या दुरूस्त्या, आवश्यक ते रुंदीकरण, पादचारी सुरक्षा व्यवस्था, दिशादर्शक फलक, लेन मार्क, डिव्हायडर पेंटीग इ. सर्व बाबींचा समावेश करून स्वतंत्र तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली असून रस्त्यावरील कामे प्राधान्य तत्वावर हाती घेण्यात आलेली आहे व बहुतांशी कामे पुर्ण करण्यात आलेली आहेत.

- **पीपीपी तत्वावर रस्ते व पुल विकसन -** विकास आराखडयातील डीपी रस्ते विकसित करताना आर्थिक नियोजनास मर्यादा असल्याने पीपीपी तत्वावर रस्ते विकसन करण्याचा निर्णय पुणे मनपाने यापुर्वीच घेण्यात आलेला आहे. रस्ते, उड्डाण पुल, नदीवरील पुल, ग्रेड सेपरेटर इ. कामे पीपीपी तत्वावर डेव्हलपमेंट क्रेडिट नोटच्या मोबदल्यामध्ये हाती घेण्यात आलेली आहे. सदर डेव्हलपमेंट क्रेडिट कामाचे ठेकेदारास देवून त्याव्दारे पुणे मनपास देयक असलेल्या बांधकाम शुल्क, मिळकतकर इ. विविध प्रकारच्या शुल्कामध्ये समायोजित करता येते. पीपीपी तत्वावर सदयस्थितीत सुमारे ३६ कि.मी. लांबीची रस्त्याची कामे हाती घेण्यात आलेली आहेत. यामध्ये रस्त्याची खराडी, बाणेर, महमंदवाडी, कोंढवा, मुंढवा या भागातील कामे असून त्यामध्ये गंगाधाम चौकातील बिबवेवाडी येथील उड्डाण पुलाचे व खराडी येथील नदीवरील पुलाच्या कामाचा समावेश आहे. सदर पीपीपी तत्वावर डेव्हलपमेंट क्रेडिट नोट मोबदल्यात विकसनास पुणे मनपास योग्य प्रतिसाद मिळालेला आहे. जागेवर सुमारे १९ कामे सुरु आहे.

### <u>पादचारी दिन</u>-

- पुणे मनपाने पादचारी सुरक्षा पुरक धोरण राबविलेले असून यासाठी प्रतिकात्मकरित्या नागरी सहभागासह ११ डिसेंबर रोजी पुणे मनपा दरवर्षी पादचारी दिन साजरा करीत आहे. या दिनामध्ये शहरातील विविध चौकांत रस्त्यावरील झेब्रा क्रॉसिंग, लेन मार्किंग इ. सुविधेसह स्वतंत्रपणे एक दिवस वाहनमुक्त पादचारी दिन साजरा करण्यात येत आहे. यावर्षीही लक्ष्मी रस्त्यावर पादचारी दिन साजरा करण्यात आला.

- शहरातील सर्व रस्त्यांच्या देखभाल दुरूस्तीसाठी, खड्डे बुजविण्यसाठी, फुटपाथ, डिव्हायडर दुरूस्ती करणे, रस्त्यावरील चेंबर दुरूस्ती करणे व बदलणे इ.साठी रोड मेंन्टनन्स व्हेईकल व्हॅनसह एक पथक प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयनिहाय तैनात असून त्या अंतर्गत विविध दुरूस्तीची कामे तातडीने करण्यात येत आहेत.

- पुणे शहरातील रस्त्यावरील पृष्ठभागाची दुरूस्ती तसेच पुर्नडांबरीकरण तसेच खड्डे दुरूस्तीची कामे पुणे मनपाच्या येरवडा येथील हॉटमिक्स प्लॅन्ट यंत्रणेमधून डांबर माल पुरवठा करून करण्यात येत असतात. शहराचे वाढते क्षेत्र व समाविष्ठ गावे लक्षात घेता अजून २ हॉटमिक्स प्लॅन्ट उभारणीचे कामाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
- रस्ता रुंदीकरणामध्ये जात असलेल्या वृक्षाचे पुर्नवसन तसेच रस्त्यांच्या कडेला झाडे लावणे याकरिता स्वतंत्र युनिट प्रस्तावित करण्यात आले आहे.
- शहरातील विविध रस्त्यांवर सेवावाहिन्या करिता होणा-या खोदाईकरिता सर्व क्षेत्रिय कार्यालयनिहाय तसेच नव्याने समाविष्ट गांवाकरिता देखील रिईस्टेटमेंट करिता तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे. त्याची आगाऊ निविदा प्रक्रिया चालू आहे.
- शहरातील वारंवार वाहतुकीमुळे नादुरूस्त होणारे रस्ते एफ.डी.आर व मायक्रोसर्फेसिंग टेक्नोलॉजी वापरुन दुरुस्त करण्याचा एक प्रस्ताव पुणे मनपाने सदर आर्थिक वर्षात घेतला होता त्यानुसार दत्तनगर ते भुमकर चौक हा आंबेगाव येथील रस्ता व बिबवेवाडी येथील अप्पर डेपो ते व्हि.आय.टी. चौक येथील रस्ता एफडीआर व मायक्रोसर्फेसिंग टेक्नोलॉजी वापरुन केलेला आहे.
- School Travel Improvement Plan प्रवास सुधार योजने अंतर्गत पथ विभागाने ही अभिनव संकल्पना सुरू केली. शहरातील ३ झोन मधील एकूण ९ शाळा निवडून तेथील रस्ते परिसर विद्यार्थी प्रवासासाठी सुरक्षित व स्वावलंबी करण्यासाठी प्रायोगिक पद्धतीने उपाय राबविले व त्याची मार्गदर्शन पुस्तिका प्रकाशित करून येत्या ५ वर्षात २० झोन या योजनेर्माफत करण्याचे नियोजन आहे.
- पुणे महापालिका गतिरोधक धोरण - पथ विभागाने समिती नेमून गतिरोधकधोरण व त्याची अंमलबजावणी पद्धत निश्चित केली व त्या प्रमाणे सर्व गतिरोधक शास्त्रीय पद्धतीने करण्याची सुरवात करण्यात आली आहे.
- पथ विभागाने गुणवत्ता सुधारणेकामी RDRMC कमिटी स्थापन केली असून त्या कमिटीचे सुचनांनुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे पथ विभागाचे नियोजन आहे.

## (८) पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड (र.रु. ६६५.८९ कोटी)

**सन २०२४-२५ मधील महत्वाचे पुर्णत्वास आलेले प्रकल्प –**

तपशिल :- भाडेतत्वावरील ३५० ई-बसेस पैकी १९० ई-बसेस महामंडळाच्या ताफ्यात दाखल झाल्या असून उर्वरित बसेस लवकरच दाखल होणार आहेत. पीएमपीएमएल ताफ्यात सद्यस्थितीत ४९० ई-बसेस आहेत. उर्वरित १६० बसेस ताफ्यात दाखल झाल्यास एकूण ६५० बसेस होतील.

**सन २०२५-२६ मधील दृष्टीक्षेपातील महत्वाचे प्रकल्प-**

- सन २०२५-२६ मध्ये पीएमपीएमएल बस ताफ्यात २०० स्वमालकीच्या नविन सीएनजी बसेस दाखल होतील व ४०० सीएनजी बसेस जीसीसी तत्वावर दाखल होतील.
- परिवहन महामंडळाच्या सुतारवाडी-पाषाण व निगडी भक्ती-शक्ती डेपो या दोन ठिकाणी बीओटी तत्वावर डेपोसह व्यापारी संकुलाचे बांधकामाचा प्रकल्प करुन त्याद्वारे आर्थिक उत्पन्न मिळविण्याचे नियोजन आहे.
- महामंडळाच्या डेपोंमध्ये व मिळकतींवर ई-चार्जिंग स्टेशन व सोलर पॅनेल उभारणे तसेच सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे नियोजन आहे.
- पुणे मनपा हद्दीतील बीआरटी स्थानकांना स्वयंचलित दरवाजे बसविणे व सुरक्षारक्षक नेमणे तसेच सर्व बीआरटी कॉरिडॉर व बसस्थानकांवर ए.आर.पी.एन. कॅमेरे व सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे.
- सन २०२५-२६ च्या अंदाजपत्रकात महामंडळाच्या संचलन तूटीकरिता र. रु.५३६.४१ कोटी तरतूद करण्यात आली आहे.

# (९) उद्यान विभाग (भांडवली र.रु. ९१.६० कोटी + महसुली र.रु. ७७.३९ कोटी = र.रु. १६८.९९ कोटी)

**अंदाजपत्रक सन २०२४-२५**

सन २०२४-२५ आर्थिक वर्ष सुरु असलेले प्रकल्प जसे की पिसोरी हरिण प्राण्यासाठी प्रदर्शनी सिंह पुंछ वानर (लायन टेल्ड मकाक)साठी प्रदर्शनी, नवीन सर्पोद्यान प्रकल्प पुर्ण करण्याबरोबरच एका वर्षात पुर्ण होऊन पर्यटकांच्या सार्वजनिक प्रदर्शनासाठी प्राणी खुले करता येतील असे आकर्षक प्राणी जसे की, कॉमन मॉरमोसेट, जॉफरी मॉरमोसेट, गोल्डन हँडेड टॅमरीन व कॉटन टॉप टॅमरीन या माकड वर्गीय विदेशी प्रजातील प्राण्यांच्या सार्वजनिक प्रदर्शनासाठी अद्यावत प्रदर्शनाची निर्मिती प्रस्तावित केलेली आहे. या प्रकल्पांच्या निर्मितीमुळे पर्यटकांसाठी नवनवीन आकर्षण निर्माण केल्यामुळे प्राणी संग्रहालयास भेट देणाऱ्या देशी विदेशी पर्यटकांची संख्या वृद्धी होऊन महानगरपालिकेचा महसुल वाढ होणेस उपयुक्त ठरणार आहे.

बृहत आराखड्यात समाविष्ट व आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये सुरु असलेले प्रकल्प खालीलप्रमाणे

| अनु क्र. | प्रकल्पाचे नाव | पूर्णत्व स्थिती |
|---|---|---|
| १ | लायन टेल मकाक प्रजातीसाठी पिंजरा निर्मिती | ९५ % |
| २ | पिसोटी हरण प्रजातीसाठी पिंजरा निर्मिती | ९५ % |
| ३ | ग्रँट झेब्रा प्रजातीसाठी खंदक निर्मिती | ९० % |
| ४ | अद्यावत सर्पोद्यान निर्मिती | ४० % |

वरील नमूद १ ते २ प्रकल्प सन २०२५-२६ च्या सुरवातीला पूर्ण होऊन तेथे नवीन प्रजाती दाखल करून त्यांचे संभाव्य प्रदर्शन करणेस सुरवात होणार आहे. प्राणीसांग्रहालयास भेट देणा-या पर्यटकांसाठी हि पर्वणी ठरणार आहे.

**सन २०२५-२६ मध्ये बृहत आराखड्यातील उद्दिष्टे**

१. सर्पोद्यान प्रकल्प पूर्ण करणे
२. माकडवर्गीय विदेशी प्रजातीतील प्राणी जसे की अ) कॉमन मॉरमोसेट ब) जॉफरी मॉरमोसेट क) कॉटन टॉप टॅमरीन ड) गोल्डन हँडेड टॅमरीन यांच्या सार्वजनिक प्रदर्शनासाठी अद्यावत प्रदर्शनाची निर्मती
३. रान कुत्रा (ढोल) प्रजातीच्या प्रदर्शन व संवर्धन या साठी नवीन प्रदर्शनाची निर्मिती.
४. निसर्ग निर्वचन केंद्रातील उर्वरित कामकाज करून वन्यजीव संवर्धन शिक्षण व प्रबोधन प्रकल्प कार्यान्वित करणे.
५. जागतिक स्तरावरील अद्यावत 'बर्ड पार्क' उभारणी प्रथम टप्पा प्रकल्प सुरवात करणे.

कात्रज येथील राजीव गांधी प्राणीसांग्रहालय मंजूर बृहत आराखड्यात समाविष्ट वरील प्रकल्पाच्या पूर्णत्वास सुमारे र. रु. ४८ कोटी रुपये एवढा खर्च अपेक्षित आहे.

# (१०) पर्यावरण विभाग (र.रु. ८.५२ कोटी)

**सन २०२४-२५ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

सन २०२४-२५ करिता पर्यावरण विभागास र. रु. ९.४३ कोटी एवढी रक्कम तरतूद उपलब्ध करुन दिली होती. पुणे महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाने सन २०२४-२५ या वर्षातील पूर्ण केलेली कामे खालीलप्रमाणे.

- **<u>जलपर्णी काढणे</u>**

  पुणे शहरातील मुळा मुठा नदी, पाषाण तलाव, कात्रज तलाव, जांभूळवाडी तला येथील जलपर्णी काढणेसाठी एकूण रक्कम रु. ५.७५ कोटी तरतूद उपलब्ध करण्यात आली होती. जलपर्णी मुळे स्थानिक पातळीवर डासांची उत्पत्ती होऊन नागरी आरोग्यास धोकादायक परिस्थिती निर्माण होत असते. जलपर्णी वाढीसाठी पोषक तत्व निर्माण झाल्याने जलपर्णीची झपाट्याने वाढ होते. सन २०२४ मध्ये शहरातील या महत्वाच्या पाणथळ भागातील जलपर्णीवर नियंत्रण ठेवण्यासाठी यांत्रिक पद्धतीचे मशिनरी वापरुन जलपर्णी काढण्यात आली आहे.

- **<u>प्रदूषण चाचणी व गुणवत तपासणी</u>**

  शहरातील नदी, नाले, तलाव, येथे पाण्याचे नमुने घेऊन NABL Accredited Lab कडून वर्षभर तपासणी केली जाते यामध्ये पाण्याचे विविध Parameters जसे कि pH, BOD, COD व DO या घटकांची मोजणी करुन याबाबतची माहिती पुणे महानगरपालिकेच्या वार्षिक पर्यावरण सद्यस्थिती अहवाल मध्ये मांडणी केली जाते तसेच शहरातील ध्वनी प्रदूषणाची मोजणी करुन सदर माहिती अहवालामध्ये दिली जाते. यासाठी र. रु. २५ लक्ष ची तरतूद उपलब्ध करण्यात आली होती.

- **<u>इंद्रधनुष्य पर्यावरण केंद्र</u>**

  म्हात्रे पुलाजवळील पुणे महानगरपालीकेचे इंद्रधनुष्य पर्यावरण केंद्र येथे नागरिकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी वर्षभर पर्यावरण जनजागृतीची कार्यक्रम केले जातात. सदर केंद्राची देखभाल दुरुस्ती साठी र. रु. १० लक्ष ची तरतूद उपलब्ध करण्यात आली होती.

- **<u>AWARD</u>**

  मे. महाराष्ट्र शासनाद्वारे माझी वसुंधरा अभियान ४.० जाहीर करण्यात आले होते. सदर अभियानामध्ये पृथ्वी जल वायू अग्नी आकाश या विषयांवर माहिती संकलित करुन माझी वसुंधरा अभियान MIS पोर्टलवर देण्यात आले होते. दि. २७ सप्टेंबर २०२४ रोजी विभागीय स्तरावर पुणे शहराला पहिले बक्षीस प्राप्त झाले आहे व यामध्ये र. रु. १.५ कोटी बक्षीस जाहीर करण्यात आले आहे.

## (११) <u>विद्युत विभाग (र.रु. ८०.७२ कोटी)</u>

**सन २०२४-२५**

- पुणे महानगरपालिकेच्या हडपसर येथील राजर्षी शाहु महाराज संकुलामधील कै. विठ्ठलराव तुपे नाट्यगृह येथील ऑडिटोरियम करीता साउंड सिस्टीम, स्टेज लाईटिंग, वातानुकुलित यंत्रणा, लिफ्ट इ. चे काम पूर्ण झाले असुन यासाठी अंदाजे र.रु.१५३.७५ लक्ष खर्च करण्यात आला आहे.

- MERC च्या निकषांनुसार पुणे मनपा विद्युत विभागाकडून ५० MW वीज खरेदी २.८१ प्रती युनिट दराने महाप्रित यांचेकडून खरेदी करणेसाठी SPV स्थापन करणेस मान्यता मिळणेचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे.

- पुणे मनपाच्या कार्यक्षेत्रातील स्ट्रीट लाईट तसेच विविध मैलापाणी शुदधीकरण केंद्र, जलशुद्धीकरण केंद्र, रुग्णालये, दवाखाने, सांस्कृतिक केंद्रे, नाटयगृहे, स्मशानभूमी, शाळा व क्षेत्रिय कार्यालय इत्यादी ठिकाणच्या वीज वापरामध्ये कमीत कमी १५% वीज बचत करण्यासाठी ESCO / BOT तत्वावर आवश्यक उपाययोजना व खरेदीसाठी १००% गुंतवणूक करुन त्या ठिकाणच्या म.रा.वि.वि. कंपनीच्या बिलात होणाऱ्या वीज बचतीपैकी ८०% बचतीची रकम (त्याठिकाणच्या वीज दरानुसार) ८ वर्ष कालावधीपर्यंत मे. महाप्रीत यांना अदा करण्यात येणार आहे. सदर कामामधून पुणे मनपा जुन्या हद्दीमधील कमी कार्यक्षमतेच्या अंदाजे ४०,००० LED फिटींग बदलून त्या ठिकाणी प्रत्येक पोलवर अधिक कार्यक्षम LED फिटींग महाप्रित यांचेकडून बसविण्यात येणार आहेत. सदर कामामधून अंदाजे ३०% बचत

होणार आहे. मे. महाप्रीत यांनी सादर केलेला सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालयाचा DPR मान्य झाला आहे. सद्यस्थितीत महाप्रीत यांचेकडून सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालय हद्दीमध्ये एकूण ८९५० LED फिटींग बसविण्यात आलेल्या आहेत. धनकवडी-सहकारनगर व वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय हद्दीमध्ये ट्रायल घेण्यात आली असून याबाबतचा DPR अंतिम करण्यात येत आहे. सदर ठिकाणच्या फिटिंग्ज बदलण्याचे काम प्रगती पथावर आहे.

- पुणे शहरातील पथ दिवे सक्षम व अद्ययावत करणेसाठी र.रु. ४७२ लक्ष तरतूद उपलब्ध झाली असुन कामे प्रगती पथावर आहेत.
- समाविष्ट गावांतील प्रकाश व्यवस्थेत सुधारणा करणेसाठी ३४ गावांमध्ये पोल व एल.ई.डी दिवे बसविणेची आवश्यकता असून त्यासाठी र.रु. ८६९ लक्ष तरतूद उपलब्ध झाली आहे. एकूण १६६६ स्ट्रीट लाईट पोल उभारण्यात येणार असून कामे प्रगती पथावर आहेत.
- पुणे शहरातील विविध स्मशानभूमी, मनपा शाळा, दवाखाने, इत्यादी ठिकाणी विद्युत विषयक कामे पुर्ण करणेसाठी (प्रकाश व्यवस्था, जनरेटर व्यवस्था, वायरिंग, सोलर हॉट वॉटर यंत्रणा) इत्यादी कामांसाठी र.रु. २३६ लक्ष तरतूद उपलब्ध झाली असुन कामे प्रगतीपथावर आहेत.
- पुणे महानगरपालिकेच्या विविध कार्यालयीन इमारती, वाहनतळ क्षेत्रे, उद्याने, संग्रहालये, सभागृहे, दवाखाने व स्मशानभूमी इ. येथे इलेक्ट्रिक व्हेईकल चार्जिंग स्टेशन PPP तत्वावर उभारण्यात येणार असुन एकुण ८२ ठिकाणांपैकी ४० ठिकाणी कार्यान्वित करण्यात आले असुन उर्वरित ठिकाणची कामे प्रगती पथावर आहेत.
- १५ व्या वित्त आयोगांतर्गत विविध स्मशानभूमीमध्ये पर्यावरण पूरक गॅस शवदाहीन्या बसविणे, चिमणी उभारणे, ए.पी.सी. यंत्रणा बसविणेसाठी र.रु. ५४० लक्ष तरतूद उपलब्ध झाली असुन कामे प्रगती पथावर आहेत.

**<u>सन २०२५-२६</u>**

- नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने निर्जनस्थळे व शहरातील नव्याने तयार करण्यात आलेल्या डी. पी. रोडवर व मिसिंग लिंक रोडवर प्रकाश व्यवस्था करणेकरिता तरतूद करणेत आली आहे.
- शहरातील महत्वाच्या रस्त्यांवरील तसेच समाविष्ट गावांतील प्रकाश व्यवस्थेत सुधारणा करणेसाठी ३४ गावांमध्ये पोल व एल.ई.डी दिवे बसविणेची आवश्यकता असून त्यासाठी र.रु. २०७४.०० लक्ष तरतूद करणेत आली आहे.
- पुणे महानगरपालिकेच्या विविध कार्यालयीन इमारती, वाहनतळ क्षेत्रे, संग्रहालये, सभागृहे, व्याखाने, शाळा इ. ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने अग्निशमन यंत्रणा बसविण्याकरिता तरतूद करणेत आली आहे.
- दवाखाने व हॉस्पिटल येथील विद्युत सुरक्षा अनुषंगाने पुणे महानगरपालिकेअंतर्गत असणारे विविध दवाखाने तसेच हॉस्पिटल यांचे फायर ऑडीट केलेनंतर सुरक्षा उपाय म्हणून सुचविण्यात येणारी विद्युतविषयक कामे करणे आवश्यक आहे. तसेच दवाखान्यांकरिता लागणारी विविध विद्युत उपकरणे जसे की ए.सी., फ्रीज इत्यादी बसविणे व देखभाल दुरुस्ती करणेकरिता तरतूद आवश्यक आहे. त्यानुषंगाने र.रु. २५० लक्ष तरतूद करणेत आली आहे.
- पुणे महानगरपालिकेमार्फत चालविण्यात येणाऱ्या विविध वाहनतळांमध्ये सुरक्षेच्या दृष्टीने सी.सी.टी.व्ही. बसविणे, नागरिकांच्या सोयीसाठी लिफ्ट बसविणे व त्यांची देखभाल दुरुस्ती करणे तसेच इतर विद्युत विषयक कामे करणेत आली आहे. पुणे शहरातील विविध स्मशानभूमीमध्ये सुरक्षेच्या दृष्टीने सी.सी.टी.व्ही. बसविणे, रात्रीच्या वेळी अंत्यविधी करिता येणाऱ्या नागरिकांच्या सोयीसाठी प्रकाश व्यवस्था करणे व त्याची देखभाल दुरुस्ती करणे तसेच इतर विद्युत विषयक कामे करण्याकरिता र.रु. २३६.२५ लक्ष तरतूद करणेत आली आहे.

- मे. म.रा.वि.वि.कं.लि. चे पोल, रोहित्र यांमुळे रस्ते, फुटपाथवर अडथळा निर्माण होऊन वाहतूक कोंडी होते. केवळ काही पोल किंवा रोहित्र काढल्याने वाहतूक सुरळीत होणार असेल तर अशा ठिकाणी बॉटलनेक पॉलिसी अंतर्गत भूमिगत विद्युत वाहिन्या टाकल्या जातात.

- पुणे शहराला ऐतिहासिक वारसा लाभला आहे. त्याची साक्ष देणाऱ्या लाल महाल, शनिवार वाडा, विश्रामबागवाडा, भिडे वाडा तसेच छत्रपती शिवाजी पूल ते शनिवारवाडा परिसर इत्यादी अनेक ऐतिहासिक वास्तू पुणे शहरात आहेत. पुणे शहराला भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी या वास्तू आकर्षण बिंदू ठरतात. सदर वास्तूंच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी विद्युत विभागामार्फत सदर ठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई केली जाते. तसेच राष्ट्रीय सण व इतर विशेष प्रसंगी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. छत्रपती शिवाजी पूल ते शनिवारवाडा परिसरात पर्यटकांची वर्दळ असते. त्याठिकाणी डेकोरेटिव्ह पोल बसवून प्रकाश व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे पुणे शहराच्या लौकिकात भर पडते व शहराचा सांस्कृतिक वारसा जपण्यास मदत होते. सदर कामे करण्याकरिता र.रु. १०० लक्ष तरतूद करणेत आली आहे.

## (१२) मलनिःसारण (विद्युत) अमृत २.०

- पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये निर्माण होणाऱ्या मैलापाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी पुणे महानगरपालिकेचे ०९ मैलापाणी शुद्धीकरण केंद्रे कार्यान्वित असुन त्याची स्थापित क्षमता ४७७ MLD एवढी आहे.
- या मधील ०६ मैलापाणी शुद्धीकरण प्रकल्पांसाठी राष्ट्रीय हरित लवाद प्रमाणे आउटलेट पॅरामीटर्स साध्य करण्यासाठी अमृत २.० मार्गदर्शक तत्वे ५.५ नुसार PPP - HAM मॉडेल अंतर्गत Concessionaire मार्फत निधी उभारणी करण्यात येणार आहे.
- यासाठी होणारा खर्च (Capex Amount) एकूण रक्कम रु. ८४२.८५ कोटी इतका आहे.
- सदर प्रकल्पाचे पूर्ततेनंतर अस्तित्वातील ०६ मैलापाणी शुद्धीकरण प्रकल्पांची क्षमता ८९ MLD ने वाढून एकूण ४५१ MLD एवढी होणार आहे.

## (१३) भवन रचना विभाग (भांडवली र.रु. ४९०.१० कोटी + महसुली र.रु. ८०.८६ कोटी = र.रु. ५७०.९६ कोटी)

**सन २०२४-२५**

- हडपसर येथील विठ्ठलराव तुपे नाट्यगृहाचे काम पूर्ण करण्यात आले असून त्याचे उद्घाटन करण्यात आले आहे. नाट्यगृहाची आसन क्षमता ८०० इतकी आहे.
- पुणे मनपाच्या पहिल्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयाचे काम प्रगतीपथावर आहे.
- पु.ल. देशपांडे उद्यान, सिंहगड रोड येथे कलाग्राम विकसित करणेचे उर्वरित कामात ६०० आसन क्षमता व्यवस्थेचे ॲम्पिथिएटर, फूड कोर्ट, प्रदर्शन/विक्रीसाठीचे ४० गाळे, ८० चार चाकी गाड्यांसाठी ५८५० चौमी क्षेत्राचे पार्किंग विकसित करणेचे काम पूर्ण झाले असून त्याचा वापर चालू आहे.
- नगररोड क्षेत्रीय कार्यालयाची इमारत बांधून पूर्णत्वास येत आहे.
- पुणे मनपाचे विविध मनपा वसाहती जुन्या व जीर्ण झाल्याने टप्या टप्याने पुनर्विकसन हाती घेण्यात येत आहे. यातील सानेगुरुजी नगर वसाहत, आंबील ओढा कॉलनी येथे चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांसाठी १५२ सदनिकांची ११ मजल्यांची इमारत बांधण्यात येत असून जागेवर ४ मजल्यांचे काम पूर्ण झाले आहे.

- बाणेर स.नं. ८८ येथील मागासवर्गीय आदिवासी विद्यार्थिनी, महिलांकरिता निवासी शिक्षण केंद्र बांधण्यात येत आहे. (पी + ४४ मजले, ४० रुम), जागेवर ९०% काम पूर्ण.
- वारजे स.नं. २४ येथे पुणे शहरातील पहिले कुस्ती संकुल ( इंनडोअर व आउटडोअर) बांधण्यात येत आहे. (आसन क्षमता १०००) जागेवर ७० % काम पूर्ण.
- कोथरुड स.नं. ७७/१ येथे अग्निशामक केंद्राचे ( बेसमेंट + तळ + १ला मजला व निवासी इमारत तळ+३) काम पूर्ण करण्यात आले आहे.

**<u>सन २०२५-२६ चे दृष्टीक्षेपातील अंदाज पत्रकातील संक्षिप्त व महत्वाची प्रस्तावित प्रकल्प योजना माहिती</u>**

- पुणे महानगरपालिकेच्या भवन विभागामार्फत आदर्श शाळा संकल्पना राबविण्यात येत आहे. या संकल्पनेमध्ये महानगरपालिकेमधील १५ शाळा विकसित करणेत येणार आहेत. यामध्ये प्राधान्याने शाळांचे स्ट्रक्चर, फायर ऑडीट विषयक कामे तसेच स्वच्छता विषयक दुरुस्ती, छताची गळती, मान्यताप्राप्त कंपनीचे सॅनिटरी फिटिंग, रंगकाम, बाला पेंटिंग, फरशी, मैदान विकसन, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था इ. शिक्षण मंडळ व भवन रचना विभागयांच्या संयुक्त कल्पनेमधून साकारण्याची योजना राबविण्यात येत आहे.
- महानगरपालिकेने या अंदाजपत्रकामध्ये वडगावशेरी, श्री. छत्रपती शिवाजीराजे भोसले नाट्यगृह (आसन क्षमता ८००) व श्री. बाळासाहेब ठाकरे नाट्यगृह (आसन क्षमता ४००) इ. नाट्यगृह प्रस्तावित केली आहे. याद्वारे सदर नाट्यगृहांमध्ये वाढीव आसन क्षमता उपलब्ध होणार आहे. तसेच ग. दि. मा. स्मारक, क्रांतीगुरु लहूजी वस्ताद साळवे स्मारक व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, भिडेवाडा या थोर व्यक्तींची स्मारके उभारण्यात येणार आहे. ही विकसने आधुनिक पद्धतीने करण्यात येणार असून यामध्ये दृकश्राव्य माध्यमातून त्यांचा जीवनपट उलगडण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच आधुनिक संसाधने वापरुन या मिळकतींचे विकसन करण्यात येणार आहे.
- पुणे महानगरपालिकेच्या नवीन समाविष्ट ३४ गावांमध्ये असणाऱ्या शाळा, स्मशानभूमी, दफनभूमी व दवाखाने या मिळकतींचे सर्वेक्षण करुन येथील धोकादायक सिमाभिंती, जुने व जीर्ण बांधकामे, स्वच्छतागृहे यांची दुरुस्ती प्रस्तावित करणेत येणार असून या मिळकतीतून सुधारणा विकसन कामे करणेत येणार आहे. या गावांमध्ये सदर सुविधा प्रकल्पांसाठी जागा उपलब्ध नसल्याने या परिसरातील ॲमेनिटी क्षेत्र निश्चित करुन या ठिकाणी नवीन शाळा तथा इतर सुविधा पुरविण्याचे प्रस्तावित आहे.
- पुणे महानगरपालिकेचे पहिले वैद्यकिय महाविद्यालयाचे काम अंतिम टप्प्यात असून याद्वारे सुमारे ४०० आसन क्षमतेचे वैद्यकिय महाविद्यालय, स्टाफ रुम विकसित होणार आहे. तसेच यामध्ये हॉस्टेलचे / कॅन्टीनचे काम नुकतेच सुरु करणेत आले असून मार्च २०२६ या आर्थिक वर्षात पूर्ण करणेत येणार आहे.
- शहरातील नागरिकांचे आरोग्य सुधारण्यासाठी क्रीडांगणे, जलतरण तलाव इ. संलग्न कामे हाती घेण्यात आले आहे.
- तसेच शहरातील नाट्यगृह, सांस्कृतिक केंद्र इत्यादीची सुधारणा कामे व दुरुस्तीची कामे प्रस्तावित असून त्याद्वारे सदरची नाट्यगृह सुस्थितीत ठेवणे व नवीन गरजांनुसार त्यामध्ये सुधारणा कामे करणे प्रस्तावित आहे.
- पुणे महानगरपालिकेच्या मिळकतींचे फायर ऑडीट करणेत आले असून या अंतर्गत फायर विषयक सुधारणा कामे अंदाजपत्रकात प्रस्तावित करणेत आले आहे, त्यायोगे महत्वाची अग्निप्रतिबंधक सुधारणा कामे करणेत येणार आहे.
- पुणे मनपा इमारती व पुतळे यांचे स्ट्रक्चरल ऑडीट करणेत येत आहे. त्यानुसार या मिळकतींची दुरुस्ती व सुधारणा करणेत येणार आहे.

## (१४) माहिती व तंत्रज्ञान (र. रु. ४८.५६ कोटी)

**सन २०२४-२५ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

मा. महापालिका आयुक्तांनी माहिती व तंत्रज्ञान विभागास र. रु. ४४.५८ कोटी एवढी रक्कम तरतूद उपलब्ध करुन दिली होती.

पुणे महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने सन २०२४-२५ या वर्षातील पूर्ण केलेली कामे खालीलप्रमाणे :-

- **PMC CARE (Citizen Assistance Response Engagement) PLATFORM व Call Center सुविधा :-**
  पुणे महानगरपालिकेच्या विविध उपक्रमांमध्ये नागरिकांचा सक्रीय सहभाग असावा व महानगरपालिकेकडून पुरवण्यात येणाऱ्या विविध सेवा-सुविधा मोबाईल ॲप्लिकेशन आणि वेबपोर्टल यांच्या माध्यमातून नागरिकांना उपलब्ध करुन देणे करिता PMC CARE प्लॅटफॉर्म नव्या स्वरुपात विकसित करण्यात आलेले आहे. नागरिकांना ब्लॉग्स लिहीणे, लेख, राबविण्यात येणारे उपक्रम, प्रकल्प, कार्यक्रमांची माहिती व आसपासच्या ठिकाणांची माहिती ही या प्लॅटफॉर्मवरुन उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच महापालिकेचे कर्मचारी आणि अधिकारी यांचेकरिता PMC CARE प्लॅटफॉर्मद्वारे परिपत्रके, नागरिकांमार्फत प्राप्त तक्रारींवर योग्य ती कार्यवाही करणे, तसेच तक्रार डॅशबोर्ड उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. पुणेकर नागरिकांना विविध विभागांची माहिती व तक्रारी नोंदविण्याकरिता टोल फ्री क्रमांक १८०० १०३० २२२ उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

- **सोशल मिडिया / पुणे महानगरपालिका संकेतस्थळ / राजीव गांधी प्राणी संग्रहालय तिकीट बुकिंग सेवासंगणक प्रणाली:-**
  पुणे मनपाच्या सर्व विभागांची नागरीकाभिमुख माहिती, सेवा सुविधा विविध सोशल मिडिया हॅंडल्स twitter, facebook, instagram, You Tube तसेच पुणे मनपाच्या संकेतस्थळाद्वारे वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येते. पुणे मनपाचे फेसबुकवर ९७,९७५ फॉलोअर्स, ट्विटर हॅंडलवर १,९९,२२१ फॉलोअर्स, इन्स्टाग्रामवर ३०,०४७ फॉलोअर्स आहेत. आतापर्यंत मनपाच्या संकेतस्थळाला ६७,८२,३१५ व्हिजिटर्सनी भेट दिली असून त्यामध्ये २२,३९,९१४ हे युनिक व्हिजिटर्स आहेत. राजीव गांधी प्राणी संग्रहालयास लाखो पर्यटक भेट देत असतात त्यांचेकरिता स्वतंत्र वेबसाईट तयार करण्यात आली असून तिकीट विक्रीसाठी पर्यटकांना सोयीस्कर अशी ऑनलाईन तिकीट बुकिंग प्रणाली देखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

- **Whatsapp Chat BOT सुविधा (क्र: ८८८८२५१००१) :-**
  पुणे महापालिकेशी संबंधित विविध घडामोडींची अद्ययावत माहिती, सेवासुविधा जलदरित्या व सहजपणे नागरीकांना सेवा Whatsapp Chatbot द्वारे अत्यंत सहजपणे विनाविलंब व योग्य प्रतिसाद द्वारे २४x७ मिळणे शक्य झाले आहे. यामध्ये विविध १९ विभागांच्या असून ४ विभागांचे बिल देयके, परवाना व परवानगी विषयक १० प्रकारच्या सेवा, ८ दाखले / ना-हरकत प्रमाणपत्रे, पुणे मनपाच्या ३० योजना व १९ विभागांची माहिती Whatsapp ChatBot सुविधेद्वारे उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच एकूण ९,००,००० (नऊ लाख) मिळकतकरधारकांना आर्थिक वर्ष २०२३-२४ चे मिळकत कर बिल याद्वारे पाठविण्यात आलेले आहे.

- **लोकसेवा हक्क हमी कायदा २०१५ अंतर्गत विकसित सेवा व अंमलबजावणी :-**
  नागरिकांना महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क अधिनियम कायदा २०१५ अंतर्गत येणाऱ्या सेवा ऑनलाईन स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या असून आकाशचिन्ह परवाना विभागाकडील एकूण ०९ सेवा, तसेच विविध प्रकारचे परवाने, उद्यान विभागाकडील वृक्ष कापणी परवानगी व आरोग्य विभागाकडील एकूण ३० सेवा, पाणी पुरवठा विभागाकडील नवीन नळजोडणी इ. सेवांचा समावेश आहे. तसेच अग्निशामन विभागाकडील अग्निशामन ना-हरकत प्रमाणपत्र अशा प्रकारच्या विविध १० सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

- **सेवक वेतन व सेवानिवृत्त वेतन प्रणाली अद्ययावतीकरण :-**
  पुणे महानगरपालिकेतील सेवकांच्या माहितीचे संगणक प्रणालीद्वारे व्यवस्थापन करणे, सेवकांची वेतन बिले अदा करणे व सेवक निवृत्त झाल्यावर सेवानिवृत्त वेतन अदा करण्याची संगणक प्रणाली एकमेकांना जोडून अद्ययावत तंत्रज्ञानावर आधारित तयार करण्यात आली असून सद्यस्थितीत नवीन वेतन संगणक प्रणाली नुसार काम चालू आहे.

- **<u>डिजिटल हस्ताक्षर (e-Signature, Digital Locker System) अंमलबजावणी</u> :-**
  पुणे मनपामार्फत विविध प्रकारचे दाखले, परवानगी प्रमाणपत्र नागरिकांना देण्यात येतात. सदर दाखल्यांवर संबंधित अधिकाऱ्यांच्या डिजिटल स्वाक्षरीची सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. पुणे महानगरपालिकेमार्फत विविध प्रकारची प्रमाणपत्रे जसे विवाह नोंदणी प्रमाणपत्र, जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे इ. Digilocker द्वारे डिजिटल हस्ताक्षर सहित नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

- **<u>Direct Benefit Transfer (DBT)</u> :-**
  थेट लाभ हस्तांतर (DBT) या योजने अंतर्गत पुणे मनपामार्फत ऑनलाईन संगणक प्रणाली विकसित करण्यात आलेली असून या योजनेंतर्गत पुणे मनपा हॉस्टेल, शाळा कर्मचारी तसेच समाजविकास विभागाच्या योजना मागासवर्गीय, अपंग कल्याणकारी योजना, इ. कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

- **<u>नवीन ३४ गावांमध्ये नेटवर्क व्यवस्था करणेबाबत</u> :-**
  नव्याने समाविष्ट झालेल्या ३४ गावांमध्ये पुणे महानगरपालिकेच्या ऑनलाईन संगणक प्रणालीचे कामकाज करणेसाठी तेथे LAN व WAN ची आवश्यकता आहे LAN साठी network Infrastructure उभारणे आवश्यक आहे, व WAN चे कामकाज Local Broadband कनेक्टीव्हिटी द्वारे घेऊन ते पुणे मनपाच्या नेटवर्क इंटरलिंक करणे आवश्यक आहे.

  **<u>AWARD</u> :-**

  १) IEEE Smart Award 2024 (INSTITUTE OF ELECTRICAL AND ELECTRONICS ENGINEERS) अंतर्गत पुणे महानगरपालिकेस 'PMC Care Platform' या प्रकल्पास प्रथम पुरस्कार मिळाला असून थायलंडमधील पटाया येथे दि. २९ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२४ या कालावधी मध्ये पार पडलेल्या समारंभात प्रदान करण्यात आला आहे .

  २) PMC Care App ची Skotch Award स्पर्धेमध्ये सेमी फायनालिस्ट म्हणून निवड झालेली आहे.

**सन २०२५-२६ या वर्षातील प्रस्तावित कामे खालीलप्रमाणे :-**

- **<u>500mbps इंटरनेट लीज लाईन /नेटवर्किंग डीव्हाईसेस् ॲन्ड मेंटेनन्स</u>** :-
  सर्व विभागांमध्ये ऑनलाईन संगणक प्रणालीसाठी इंटरनेटची आवश्यकता असल्याने ५०० mbps internet lease line घेण्यात येणार आहे.

- **<u>Propety Tax Software अद्ययावतीकरण</u>** :-
  पुणे महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकरिता अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन अद्यावत संगणक प्रणाली विकसित करण्याचे कामकाज प्रस्तावित आहे.

- **<u>ई-office अंमलबजावणी (eFile Implementation)</u> :-**
  प्रशाकीय कामकाजात सुसूत्रता यावी, दस्तऐवज सुरक्षित राहावेत व माहिती जलद गतीने प्राप्त होऊन निर्णय प्रक्रिया विनाविलंब सुलभ व्हावी यासाठी सर्व शासकीय विभागांमध्ये ई-ऑफिस प्रणालीचा वापर प्रभावीपणे करणेचे काम सुरु आहे.

- **<u>e-sparrow</u> :-**
  पुणे मनपाच्या अधिकारी / कर्मचारी यांचे कार्यमुल्यमापन अहवाल पदोन्नती प्रक्रिया करताना वेळोवेळी विचारात घेतले जात असल्याने कार्यमुल्यमापन अहवाल लिहिण्यासाठी त्यांचे सुयोग्यपणे जतन करणे कामी e-sparrow संगणक प्रणालीचे कामकाज प्रस्तावित आहे.

- **<u>Backup Solution</u> :-**
  प्रशासकीय कामकाजासाठी विकसित केलेल्या विविध ऑनलाईन संगणक प्रणालींची संगणकीय माहिती सुरक्षेच्या दृष्टीकोनातून जतन करणे गरजेचे व अत्यावश्यक असल्याने सद्यस्थितीत अस्तित्वात असलेला सर्व संगणक प्रणालींच्या डेटा बॅकअप solution चे कामकाज प्रस्तावित आहे.

## (१५) हेरीटेज सेल (भांडवली र.रु. १८.४५ कोटी + महसुली र.रु. ४.६६ कोटी = र.रु. २३.११ कोटी)

**सन २०२४-२५ मधील महत्वाची कामे**

- पुणे शहराचे महत्व व इतिहासाची माहिती पर्यटकांना देण्यासाठी 'हेरिटेज वॉक' हा उपक्रम राबविण्यात आला. एक वर्षासाठी प्रायोगिक तत्वावर राबविण्यात आलेल्या हेरिटेज वॉकमध्ये जुन्या पुण्यातील ऐतिहासिक वास्तूंची माहिती व इतिहास गाईडद्वारे सांगितला जातो. यामुळे नागरिकांना शहराचा ऐतिहासिक वारसाबाबतची माहिती मिळते त्यामुळे या उपक्रमास नागरिकांचा वाढता प्रतिसाद मिळत आहे.

- भिडेवाडा वास्तू मिळकतीची जागा भूसंपादनाद्वारे पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आली असून येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी चालू केलेल्या देशातील पहिल्या मुलींची शाळा इमारत स्मारकाचे बांधकाम सुरु करण्यात आले आहे.

- नानावाडा येथे आद्य सशस्त्र क्रांतीकारक यांच्या जीवन चरित्रावर आधारीत पूर्ण झालेले 'स्वराज्य' म्युझियम नागरिकांसाठी खुले करण्यात आले आहे.

- ऐतिहासिक लालमहाल येथे १६ व्या शतकातील पुणे शहराची प्रतिकृती व श्री छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ माँसाहेब यांची पुणे शहराच्या जडणघडणाबाबतचे योगदान याबाबत सरफेस मॅपिंग टेक्नोलॉजीमध्ये दृक:श्राव्य यंत्रणा उभारणीचे काम करण्यात येत आहे. तसेच पहिल्या मजल्यावर श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची व त्या काळातील शस्त्रास्त्रेच्या प्रतिकृतीचे दालन पूर्ण करण्यात येत आहे.

**सन २०२५-२६चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रकातील संक्षिप्त माहिती**

- ऐतिहासिक भिडेवाडा येथे क्रांतीज्योती सावित्रिबाई फुले यांनी सुरु केलेल्या देशातील पहिली मुलींची शाळा स्मारक इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. इमारतीचे बांधकाम वाडा शैलीमध्ये करण्यात येणार असून या इमारतीमध्ये क्रांतीज्योती सावित्रिबाई फुले, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे जीवनचरित्रावर आधारीत फिल्म, थीमबेस होलोग्राफी व आभासी चित्रफित विकसित करण्यात येणार आहे. तसेच महिलांसाठी कौशल्य विकास केंद्र व स्पर्धांसाठी मार्गदर्शन केंद्र देखील उभारण्यात येणार आहे.

- पुणे शहराचे ऐतिहासिक महत्व असलेल्या लालमहाल, महात्मा फुले मंडई, विश्रामबागवाडा, नानावाडा या वास्तुंच्या जतन संवर्धनासाठी / दुरुस्ती व संवर्धन विषयक कामांसाठी तरतूद प्रस्तावित केलेली आहे.

- पुणे शहरातील ऐतिहासिक वस्तूंचे जतन व संवर्धन करणे, यांचे अभिलेख तयार करणे, स्कॅनिंग करणे प्रस्तावित आहे.

- कोंढवा येथील हेरिटेज पार्कमध्ये पेशवेकालीन बारा बलुतेदार रचना घेऊन बाजारपेठ विकसित करण्यात येणार आहे.

- लालमहाल, विश्रांमबागवाडा, महात्मा फुले मंडई, नानावाडा या ऐतिहासिक वास्तुमध्ये अग्निशमन यंत्रणेसाठी भूमिगत पाण्याची टाकी व अग्निशमन सुविधा पुरविण्याचे काम करण्यात येणार आहे.

- विश्रामबागवाडा या ऐतिहासिक वास्तुमधील पहिल्या मजल्यावरील पेशवे दरबार हॉलचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. पुणे शहरातील ऐतिहासिक वास्तुंच्या प्रतिकृति मॉडेलचे दालन दुसऱ्या मजल्यावर उभारण्यात येणार आहे.

- मामलेदार कचेरी येथील आद्य क्रांतीकारक उमाजी नाईक यांना कैदी बनवून ठेवलेल्या जेल इमारतीचे जतनसंवर्धनाचे काम पूर्ण करण्यात येत आहे.

## (१६) प्राथमिक शिक्षण विभाग (भांडवली र.रु. ८१.१० कोटी + महसुली र.रु. ८२०.६४ कोटी = र.रु. ९०१.९४ कोटी)

**सन २०२४-२५**

- क्रीडा निकेतन शाळा - यावर्षी शालेय जिल्हास्तर क्रीडा स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी प्राविण्य प्राप्त केले आहे. यापैकी जिल्हास्तरावर ९९ विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले आहे. विभाग स्तरावर १९ विद्यार्थी सहभागी झाले तसेच राज्य व राष्ट्रीय स्तरावर प्रत्येकी १ विद्यार्थ्यांनी पुणे मनपाचे प्रतिनिधीत्व केले आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिला जाणारा शिवछत्रपती पुरस्कार क्रीडा निकेतन शाळेच्या विद्यार्थ्यास जाहीर झाला आहे. महानगरपालिकेच्या एकूण ३ क्रीडा निकेतन शाळांवर ५ कोटी तरतूद करण्यात आलेली आहे.
- मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या शासनाच्या उपक्रमा अंतर्गत झालेल्या स्पर्धेमध्ये संपूर्ण राज्यात पुणे महानगरपालिकेच्या २ शाळांनी अनुक्रमे पहिला व तिसरा क्रमांक मिळवला आहे. मनपा शाळा विद्यानिकेतन क्र.१६ भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी प्रशाला, वडगांव बुद्रुक या शाळेचा प्रथम क्रमांक आला असून त्यांना एकवीस लक्ष रुपयांचा धनादेश तर मनपा शाळा विद्यानिकेतन क्र १ श्री छत्रपती शिवाजी महाराज प्रशाला या शाळेचा तृतीय क्रमांक आला असून त्यांना अकरा लक्ष रुपयांचा धनादेश बक्षीस म्हणून मिळाला आहे. या स्पर्धेमध्ये पुणे महानगरपालिकेच्या सर्व शाळा सहभागी होतात. त्यामुळे शालेय भौतिक सुविधांसाठी आर्थिक अंदाज पत्रकात भरीव तरतूद करण्यात आली आहे.
- डीबीटी योजना - सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात विद्यार्थ्यांना विविध शालेय साहित्य पुरविणेकरिता एकूण र.रु. ४१ कोटी रुपयांची डी.बी.टी. योजना राबविण्यात आलेली आहे.

**सन २०२५-२६ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक -**

**शालेय स्वच्छता एकूण १५० शालेय इमारतीतील स्वच्छतागृहांचे यांत्रिकीकरणाने सफाई करणेसाठी र. रु. १४ कोटी तरतूद करण्यात आली आहे.**

- शिष्यवृत्ती परीक्षा - शिष्यवृत्ती परीक्षा अनुषगांने केलेले शैक्षणिक नियोजन यासाठी रक्कम रुपये १ कोटी ५० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे.
- फ्युचिरिस्टिक स्कूल - अभिनव शाळा सन २०२५-२६ मध्येही १५ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत फ्युचिरिस्टिक स्कूल तयार करण्यात येणार आहेत. अभिनव शाळा अंतर्गत ३० विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक software व Hardware असलेले डेस्क lan सिस्टीमसह तसेच प्रोग्रॅम लायसन्स फी व संपूर्ण ई-sylabus तसेच मुख्य पोडीयम wall अशा अत्याधुनिक सुविधांचा यामध्ये अंतर्भाव केलेला आहे. त्यासाठी सन २०२४-२५ मध्ये एकूण र.रु. ७ कोटी उपलब्ध करुन दिले आहेत.
- ई-लर्निंग प्रकल्प - पुणे मनपा संचलित १४६ शाळा इमारतीमधून सर्व माध्यमाच्या एकूण शाळांपैकी २६५ प्राथमिक शाळांमध्ये व नवीन शाळांसाठी ई-लर्निंग प्रकल्प कार्यरत आहे. सदर प्रकल्प पूर्ण झालेला असून देखभाल दुरुस्तीसाठी व उर्वरित वर्गखोल्या ई-लर्निंग संच बसविणे करिता तरतूद सुचविण्यात आलेली आहे.
- डीबीटी योजना - विद्यार्थ्यांकरिता पुढील आर्थिक वर्षातही विद्यार्थांना विविध शालेय साहित्य पुरविणे करीता एकूण र.रु. ४१ कोटीची डीबीटी योजना प्रस्तावित करण्यात आलेली आहे.
- विद्यार्थी शैक्षणिक सहल - सन २५-२६ मध्येही पुणे महानगरपालिकेच्या इयत्ता ५ वी ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना एक दिवसीय शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात येते. यासाठी तरतूद र.रु. २ कोटी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.
- विशेष मुलांची शाळेसाठी विविध उपक्रम राबविण्यासाठी भरीव तरतूद करण्यात आलेली आहे.
- शिक्षण विभाग प्राथमिककडे सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात एकूण ७०० शिक्षकांची पवित्र पोर्टल व अंतर जिल्हा बदली द्वारे नेमणूक करण्यात आली असून त्यांच्या वेतनासाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात वाढीव तरतूद करण्यात आली आहे. तसेच शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतना पोटी शासनाचा हिस्सा म्हणून र.रु. १३९ कोटी जमा झालेले आहेत.
- सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात जि.प.पुणे कडून नव्याने समाविष्ट झालेल्या ६५ शाळांसाठी भौतिक सुविधा व विद्यार्थ्याना शैक्षणिक साहित्य देण्याकरिता DBT (DIRECT BENIFIT TRANSFER) साठी आवश्यक वाढीव तरतूद करणेत आली आहे.
- Sister School - खाजगी शाळेतील शिक्षक आठवड्यातून दोन तास पुणे महानगरपालिकेच्या शाळेत येऊन तासिका / वर्ग घेतील.

**माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग**

**<u>सन २०२४-२५</u>**

- शारदाबाई पवार शिष्यवृत्ती योजना पुणे महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमधील इ. १० वी व इ. १२ वी च्या अनुक्रमे ज्या विद्यार्थ्यांना ८५% व ८०% पेक्षा अधिक गुण मिळालेले आहेत. विद्यार्थ्यांना प्रत्येकी र.रु. ५१,०००/- प्रमाणे इ. १० वी व इ. १२ वी एकूण १५१ विद्यार्थ्यांना र.रु. ७७,०१,०००/- इतका लाभ देण्यात आला आहे.
- मोफत पाठ्यपुस्तके :- पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी व पुणे महानगरपालिका हद्दीतील रात्रशाळेतील शिक्षण घेणाऱ्या इ.९ वी व इ.१० वीच्या विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके बालभारती संस्थेकडून खरेदी करून वितरीत करण्यात आली आहेत.
- मोफत गणवेश :- पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांकडील इ.५ वी ते इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी २ गणवेश मोफत देण्यात येतात. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात १०,६१२ विद्यार्थ्यांना गणवेशाची रक्कम डीबीटी अंतर्गत बँक खात्यावर जमा करण्यात आली आहे.
- इ. १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन व्याख्यानमाला माध्यमिक विभागाकडील इ. १० वीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासाचे तंत्र, परीक्षा पद्धती व करियर निवड बाबत मार्गदर्शनपर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे.

**<u>सन २०२५-२६ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक</u>**

- सन २०२५-२६ मध्ये राबविण्यात आलेल्या मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश, मोफत बसपास सुविधा, मोफत २१ अपेक्षित प्रश्नसंच, शारदाबाई पवार शिष्यवृत्ती योजना, NSQF (National Skill Qualification Framework) योजना, इ.११ वी व इ.१२ वी द्विलक्षी अभ्यासक्रम, इ.१० वीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन व्याख्यानमाला औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, सी.एस. आर अंतर्गत उपक्रम सन २०२५-२६ मध्येही प्रभावीपणे राबविण्यात येतील त्यासाठी अंदाजपत्रकात भरीव तरतूद करण्यात आली आहे.

## (१७) <u>सामान्य प्रशासन विभाग</u>

**<u>सन २०२४-२५ मधील या विभागाच्या ठळक बाबी</u>**

- पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग-१ ते वर्ग-३ संवर्गातील एकूण ३२० पदांची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. 'क्ष' किरण तज्ञ / रेडीओलॉजिस्ट (वर्ग-१) ०८ वैद्यकीय अधिकारी / निवासी वैद्यकीय अधिकारी (वर्ग-२) २०, उप संचालक (प्राणी संग्रहालय) (वर्ग-२) ०१, पशु वैद्यकीय अधिकारी (वर्ग-२) ०२, वाहन निरीक्षक/व्हेईकल इन्स्पेक्टर (वर्ग-३) ०३, औषध निर्माता (वर्ग-३) १५, वरिष्ठ आरोग्य निरीक्षक (वर्ग-३) २०, आरोग्य निरीक्षक (वर्ग-३) ४०, अग्निशमन विमोचन/फायरमन (वर्ग-३) २००, कनिष्ठ अभियंता (विद्युत) (वर्ग-३) १० व पशुधन पर्यवेक्षक (लाईव्ह स्टॉक सुपरवायझर) (वर्ग-३) ०१ अशी रिक्त पदे सरळसेवेने भरण्यात आली आहेत. तसेच वरील नमूद पदांपैकी आरोग्य निरीक्षक (वर्ग-३) या पदाव्यतिरिक्त सर्व पदांच्या प्रतीक्षा यादीतील उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली आहे. आरोग्य निरीक्षक (वर्ग-३) पदाच्या प्रतीक्षा यादीची मुदत संपलेली नसल्याने पुढील प्रक्रिया सुरु आहे.
- तसेच पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) वर्ग-३ संवर्गातील एकूण ११३ पदांची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून SEBC प्रवर्गाच्या आरक्षणाच्या अनुषंगाने अद्ययावत बिंदुनामावली प्राप्त झाल्यानंतर सदर पदाची परीक्षा घेणे प्रस्तावित आहे.
- पुणे महानगरपालिकेकडे सन २०२४-२५ मध्ये आपले सरकार २.० या तक्रार निवारण प्रणालीवर एकूण १६२५ तक्रारी प्राप्त झाल्या. त्यापैकी १५१४ तक्रारी निरस्त करण्यात आलेल्या आहेत.
- पुणे महानगरपालिकेकडे सन २०२४-२५ मध्ये केंद्र शासनाकडील पीजी पोर्टलवर ४३२ तक्रारी प्राप्त झाल्या त्यापैकी ३६९ तक्रारी निरस्त करण्यात आलेल्या आहेत.
- पुणे महानगरपालिकेकडे मुख्यमंत्री सचिवालय कक्षाकडील ९३३ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी ८०३ तक्रारी निरस्त करण्यात आलेल्या आहे.

**<u>सन २०२५-२६ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रकातील संक्षिप्त व महत्वाची प्रस्तावित माहिती</u>.**

- वर्ग -१ ते वर्ग -३ या सवंर्गातील रिक्त पदांपैकी अत्यावश्यक पदे भरण्याबाबत नियोजन करण्यात येत आहे.
- वर्ग -१ ते वर्ग -३ या सवंर्गातील अधिकारी/कर्मचारी यांचेकरिता प्रशिक्षण आराखडा तयार करुन प्रशिक्षण आयोजित करणे.
- पुणे महानगरपालिकेतील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या शैक्षणिक तसेच इतर आवश्यक कागदपत्रांच्या नोंदी संगणकीकृत करणे.

## (१८) प्रशिक्षण प्रबोधिनी पुणे महानगरपालिका

- मिशन कर्मयोगी अंतर्गत कॅपसिटी बिल्डींग कमीशन, नवी दिल्ली यांचेकडून पुणे महानगरपालिकेची निवड करण्यात आली आहे. सन २०२४-२५ या कालावधीसाठी पुणे महानगरपालिकेसाठी अन्युअल कॅपसिटी बिल्डींग प्लान तयार करण्यात आला आहे. यासाठी ६५ प्रकारची प्रशिक्षणे एकूण १५८२६ कर्मचारी यांचेसाठी निर्धारित करण्यात आली होती. एकूण ३६ प्रशिक्षणांच्या माध्यमातून १४४ सत्रांतून १०६०० कर्मचारी यांना प्रशिक्षीत करण्यात आले आहे. नेमून दिलेल्या ६५ प्रशिक्षण विषयांपैकी ४२ प्रशिक्षण विषय पूर्ण केले आहेत.

## (१९) आपत्ती व्यवस्थापन विभाग

**<u>सन २०२४-२५</u>**

- पुणे शहराकरिता नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून पूर व पूरपरिस्थिती दरम्यान उपयोग होणेकरिता ०८ बोटी खरेदी करणेत आली आहेत. तसेच भांडार विभागामार्फत ट्रॉली मांउटेड डी-वॉटरिंग पंप खरेदी करण्यात आले असून त्याचे क्षेत्रीय कार्यालयांना व अग्निशमन दल यांना वितरीत करणेत आले आहे.
- आपत्ती व्यवस्थापन केंद्र, मुख्य इमारत, पुणे महानगरपालिका येथे स्थापन करण्यात आले असून सदर केंद्रामध्ये सेवकांची २४ तास नेमणूक करण्यात आलेली आहे. आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत पुणे मनपाचे विविध विभाग / खाते व सेवक कर्मचारी यांचे करिता जनजागृती प्रशिक्षण, क्षमता व बांधणी, आराखडा तयार करण्याचे काम सुरु आहे.
- आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था (NIDM) यांचे मार्गदर्शक तत्वानुसार पुणे शहराचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.
- आपत्ती व्यवस्थापन केंद्रांतर्गत पुणे महानगरपालिकेच्या महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय, पथ विभाग, मलनिःसारण विभाग, घरपाडी विभाग, विद्युत विभाग, पाणीपुरवठा विभाग, उद्यान विभाग, अग्निशमन विभाग, सुरक्षा विभाग, शिक्षण विभाग, आरोग्य विभांगाकडील सेवकांना आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

**<u>सन २०२५-२६ प्रस्तावित कामे</u>**

- पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये स्वतंत्र आपत्ती व्यवस्थापन कक्ष निर्माण करण्यात येत असून तेथे Emergency Operation Centre (EOC) निर्माण करण्यात येत आहे.
- NDMA यांचे मार्गदर्शक सूचनानुसार Urban Flood Risk Management Programme (UFRMP) अंतर्गत मान्य आराखडा- र.रु. २८६.७० कोटी त्यापैकी र.रु. २५० कोटी हे NDMF कडून व र.रु. ३६.७० कोटी राज्य शासनाकडून निधीची प्राप्ती होणार आहे. सदर निधीतून खालीलप्रमाणे कामे प्रस्तावित आहे.

| | |
|---|---|
| • पुणे महानगरपालिका व महाप्रीत (MAHAPREIT) यांचे संयुक्त विद्यमाने Integrated Command and Control Centre (ICCC) करिता (रेव्हेन्यू शेअर नुसार पुणे महानगरपालिका ४५% व महाप्रीत ५५% भागीदार असणार आहे. म्हणजेच पुणे महानगरपालिका र.रु.५४ कोटी (NDMA कडून प्राप्त निधी व महाप्रीत र.रु.६६ कोटी) | र.रु.१२० कोटी |

| | |
|---|---|
| • मलःनिस्सारण देखभाल व दुरुस्ती विभागाअंतर्गत प्रकल्पात नमूद कामे ड्रेनेज व मलःनिस्सारणची कामे, नाला खोलीकरण व रुंदीकरण, तलाव पुनर्जीवित करणे, वनीकरण, रेन वॉटर हार्वेस्टिंग, प्रशिक्षण व क्षमता बांधणी, नियंत्रण कक्ष इत्यादी | र.रु.२३३.४४ कोटी. |

- पुणे शहराच्या वाढत्या विस्तारानुसार तसेच आपत्कालीन परिस्थितीमध्ये जलदगतीने प्रतिसाद देणेकरिता City Disaster Responce Force (CDRF) स्थापन करणेबाबत कार्यवाही सुरु आहे.
- आपत्ती व्यवस्थापन केंद्रातर्गत पुणे महानगरपालिकेच्या २००० सेवकांना सन २०२५-२६ मध्ये आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण देण्याचे नियोजित आहे.
- पुणे शहराकरीता आवश्यक रेनगेज स्टेशन खरेदी करणे तसेच नदी पात्राच्या बाजूला पूर परिस्थिती मध्ये नागरिकांना सूचित करणेकरिता पब्लिक अॅड्रेस सिस्टीमची उभारणी करणेसाठी शक्यता पडताळून प्रस्ताव तयार करण्यात येणार आहे. या नियोजित प्रकल्पामुळे आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना तातडीने मदत पोहोचवणे शक्य होणार असून, आपत्तीमुळे होणारे संभाव्य नुकसान किमान पातळीवर ठेवणे शक्य होणार आहे.

## (२०) <u>समाज विकास विभाग (र.रु. ९५.६३ कोटी)</u>

**<u>सन २०२४-२५ मधील महत्वाच्या व पूर्णत्वास/सुरु असलेल्या नाविन्यपूर्ण योजना/प्रकल्प</u>.**

पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागामार्फत दारिद्रय रेषेखालील व अल्प उत्पन्न गटातील नागरिकांसाठी खालीलप्रमाणे योजना राबविण्यात येतात.

- केंद्र व राज्य शासनाची दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान योजना दारिद्रय रेषेखालील कुटुंबासाठी सन २०१४ पासून राबविण्यात येत आहे. या योजनां करीता शासनाकडून निधी प्राप्त होतो. या व्यतिरिक्त मनपा अर्थसंकल्पातील बांधील खर्च वजा जाता ५% रक्कम महिला बाल कल्याण, ५% रक्कम मागासवर्गीयांसाठी व ५% रक्कम दिव्यांगांसाठी राखून ठेवली जाते. त्यातून समाज विकास खात्यामार्फत महिला बाल कल्याण योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना, युवक कल्याणकारी योजना, दिव्यांग कल्याणकारी योजना इ. योजना राबविल्या जातात.
- स्वयंरोजगार उपक्रम - व्यवसाय प्रशिक्षण, उद्योजकता विकास प्रशिक्षण, स्वयंरोजगारासाठी अनुदान देण्यात येते.
- केंद्र व राज्य शासनाची दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान योजना अंतर्गत सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणी, क्षमता बांधणी व प्रशिक्षण, कौशल्य प्रशिक्षणाद्वारे स्वयंरोजगार व नोकऱ्यांची उपलब्धता, स्वयंरोजगार कार्यक्रम, फेरीवाल्यांना सहाय्य, शहरी बेघरांना निवारा योजना शासनाच्या निधीतून राबविल्या जातात. तसेच प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयामध्ये नागरिकांसाठी सेवा केंद्र, तसेच बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तू विक्री करीता विक्री केंद्र व दिव्यांगांनी उत्पादित केलेल्या वस्तुंचे विक्री केंद्र यांचा समावेश आहे.
- बचत गटांसाठी योजना - शहर पातळीवर ८५७७ बचत गट कार्यरत असून बचत गट स्थापनेसाठी महिलांना प्रशिक्षण, फिरता निधी, बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंसाठी प्रदर्शन व विक्री करीता अर्थसहाय्य, स्वस्त धान्याची दुकाने मिळणेसाठी शिफारस करणेत येते. तसेच बचत गटांच्या माध्यमातून शालेय पोषण आहार दिला जातो. पुणे मनपा कार्यालयासाठी लागणाऱ्या विविध १८ प्रकारच्या वस्तू व सेवा गटांमार्फत पुरविण्यात येतात.
- महिलांसाठी योजना - विधवा महिलांना अनुदान, महिलांना कुटुंब नियोजनासाठी प्रोत्साहन, स्त्री संसाधन केंद्र (सक्षमा कक्ष), महिला/युवती यांना स्वसंरक्षण प्रशिक्षण, मुलगी दत्तक योजना, पाळणाघर, वस्तीपातळीवरील विविध प्रशिक्षण वर्ग व अनुदान, महिलांसाठी योगासन वर्ग इ. योजना राबविण्यात येतात.
- विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक योजना - इ. १०वी व इ. १२वी मधील विद्यार्थ्यांसाठी खाजगी क्लास अर्थसहाय्य, सीईटी क्लास अर्थसहाय्य, उच्च शिक्षणासाठी अर्थसहाय्य, परदेशात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक अर्थसहाय्य, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकल करीता अर्थसहाय्य, कमवा व शिका योजना, इ. १०वी व इ. १२वी मध्ये ८०% अथवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक अर्थसहाय्य, स्पोकन इंग्लिश वर्ग, अभ्यासिका, ग्रंथालय, घाणभत्ता मिळणाऱ्या मनपा सेवकांच्या मुलांना

अर्थसहाय्य, पुणे महानगरपालिका हद्दीतील कचरा वेचक व बायोगॅस प्रकल्पावर काम करणारे तसेच कचऱ्याच्या संबंधित काम करणाऱ्या सर्व असंघटीत कष्टकरी कामगारांच्या मुलांना शैक्षणिक साहित्यासाठी अर्थसहाय्य, स्पर्धा परिक्षा केंद्र, मनपाच्या माध्यमिक प्रशालेतील मुलांना शैक्षणिक साहित्य इ. उपक्रम राबविले जातात.

- भौतिक सुविधा उपक्रम - मागासवर्गीय नागरिकांसाठी झोपडपट्टीमध्ये वैयक्तिक शौचालय बांधणे, झोपडी दुरुस्ती, वीज कनेक्शन, नळ कनेक्शन इ. करीता अर्थसहाय्य योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतीगृहातील ४०० विद्यार्थ्यांना डीबीटी द्वारे भोजनाचा खर्च दिला जातो.
- सामाजिक उपक्रम - वृद्धांसाठी विरंगुळा केंद्र, व्यसनमुक्तीसाठी अर्थसहाय्य, रस्त्यावरील मुलांसाठी घरटं प्रकल्प, दिवस रात्र निवारा प्रकल्प, बाल विकास केंद्र इ. उपक्रम राबविण्यात येतात.
- सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षापासून पुणे महानगरपालिका अर्थसंकल्पामध्ये जेण्डर बजेटची अंमलबजावणी करण्यात येते.
- समाज विकास विभागाकडील सर्व योजनांचे अर्थसहाय्य डीबीटी द्वारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करणेत येते.
- पुणे महानगरपालिका व स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने पुणे शहरात एकूण १३ ठिकाणी लाईट हाऊस प्रकल्प सुरु आहेत. गोखलेनगर येथे अजून एक लाईट हाऊस सुरु करण्यात येणार आहे.
- पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागामार्फत केंद्र शासन पुरस्कृत "पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (PM-Svanidhi)" योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असून सदर योजने अंतर्गत पथविक्रेत्यांना व्यवसायांकरिता रु.१०,०००/-, रु.२०,०००/-, रु.५०,०००/- कर्ज बँकामार्फत देण्यात येते. तसेच पंतप्रधान स्व-निधीचा लाभ मिळालेल्या कुटुंबातील नागरिकांसाठी शासनाकडील एकूण आठ योजनांचा लाभ मिळणेसाठी फॅमिली प्रोफायलिंग करणेत येत आहे.

**<u>सन २०२५-२६ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रकातील प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना माहिती-</u>**

- बालेवाडी येथील दिव्यांग पार्क, स. नं.३/५, ३/६ बालेवाडी, पुणे येथील वास्तूमध्ये पुणे महानगरपालिका व सामाजिक संस्था यांचा संयुक्त प्रकल्पांतर्गत दिव्यांग थेरपी सेंटर सुरु करणे. तसेच शहराच्या इतर भागात आणखी ४ सेंटर निर्माण करणे.
- समाज विकास विभाग पुरस्कृत बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना कायमस्वरुपी बाजारपेठ मिळणेच्या दृष्टीने पुणे शहरात विक्री केंद्र उभारणे.
- रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने प्रकल्प सुरु करणे.
- दिव्यांग कल्याणकारी योजना लाभार्थी फेस रीडिंग, थम्ब इन्प्रेशन, आयरीज (Eye) ओळख ऑनलाईन हयातीचा दाखला, तृतीयपंथीय कल्याणकारी योजना लाभार्थी फेस रीडिंग, थम्ब इन्प्रेशन, आयरीज (Eye) ओळख ऑनलाईन हयातीचा दाखला, माता रमाई योजना लाभार्थी फेस रीडिंग, थम्ब इन्प्रेशन, आयरीज (Eye) ओळख ऑनलाईन हयातीचा दाखला सॉफ्टवेअर/ॲप विकसित केले असून त्याद्वारे सर्वेक्षण करणे.
- राज्य शासनाच्या दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान लाभार्थीसाठी नगरपरिषद संचालनालय समवेत संयुक्त करारान्वये काम करणाऱ्या कंपनी/संस्थाचे ई कॉमर्स पोर्टल करीता आवश्यक सहकार्य तसेच डिजिटल मार्केटिंग, उद्योजकता प्रशिक्षण इत्यादी कार्यक्रम राबविणे.
- पुणे महानगरपालिका, राज्य शासन व सामाजिक संस्था यांचेद्वारे रोजगार मेळावे आयोजित करणे.
- बेघर, दिव्यांग, तृतीय पंथी नागरिकांचे सर्वेक्षण करणे.
- स्पर्धा परीक्षा अभ्यासासाठी विद्यार्थांकारिता विविध ठिकाणी अभ्यासिका / ग्रंथालय / केंद्र सुरु करण्यासाठी जागेसह आवश्यक पायाभूत सुविधा पुरविणे.
- कौशल्याचे शिक्षणा बरोबरच लघु तसेच मध्यम उद्योगांना, उद्योजकांना उत्तेजन देऊन शहरातील नागरिकांना व्यवसाय तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी औद्योगिक उत्पादनांचे प्रदर्शन आयोजित करणे व त्याद्वारे औद्योगिक क्षेत्रात रोजगार व स्वयंरोजगार, व्यवसायाच्या संधी उपलब्ध करणे.

## (२१) समाज कल्याण विभाग

- पुणे महानगरपालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी वसतिगृहाच्या एका इमारतीस साधारण ५४ वर्ष पूर्ण झाली असून अन्य दोन इमारती साधारण १५ ते ३० वर्षे जुन्या आहेत. यामध्ये केवळ ४०० विद्यार्थ्यांची व्यवस्था होऊ शकते. त्याऐवजी ७०० विद्यार्थी क्षमतेचे आधुनिक सोयीने युक्त वसतिगृहाचा नकाशा वास्तू विशारदाकडून तयार करून घेतला असून याकरीता अंदाजे रक्कम रू. १८.२३ कोटी खर्च अपेक्षित आहे. यासाठी शासनाकडे अर्थसहाय्याचा प्रस्ताव पाठविला आहे व यंदाच्या अर्थसंकल्पात भरीव तरतूद सुचविणेत आली आहे. सध्या राहत असलेल्या विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी भाड्याने इमारत घेणेसाठी र. रु. २.०० कोटी तरतूद देखील चालू वर्षाच्या अंदाजपत्रकात सुचविणेत आलेली आहे.

## (२२) कामगार कल्याण विभाग

**सन २०२४-२५**

- मृत सेवकांच्या वारसांना अर्थसहाय्य **:-** मृत सेवकांच्या ८३ वारसांना र.रु.५२,५५०/- यानुसार एकूण र.रु. ४३,५७,५००/- अर्थसहाय्य प्रदान करण्यात आलेले आहे.
- कामगार कल्याण निधी **:-** कामगार कल्याण निधीचे सभासद असलेल्या मृत सेवकांना ७८ वारसांना र.रु.२२,५००/- यानुसार एकूण र.रु. १७,५५,०००/- वारस अनुदान वितरित करणेत आले.
- दहावी बारावी **:-** दहावी व बारावी मधील अनुक्रमे ८८ व २९ एकूण ११७ महापालिका सेवकांच्या विशेष प्राविण्य मिळविलेल्या पाल्यांचा हॅवर सॅक व पेनड्राईव्ह देऊन गुणगौरव करण्यात आला.
- ध्वजदिन निधी संकलन **:-** सन २०२४-२५ मध्ये मा. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या उदिष्टानुसार मनपा अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून र.रु. २८,८१,८००/- ध्वजदिन संकलित करण्यात आला आहे.
- अपघात विमा योजना **:-** पुणे महानगरपालिका कायम आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी समूह अपघात विमा योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत माहे जुलै, २०२४ पर्यंत एका कर्मचाऱ्यांस र.रु. १० लाख नुकसान भरपाई देण्यात आली आहे.
- सन २०२४ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या ४२३ अधिकारी/कर्मचाऱ्यांचा स्मृतिचिन्ह व शॉल देऊन सन्मान करण्यात आला.

**सन २०२५-२६ दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- कामगार कल्याण निधी :- कामगार कल्याण निधींतर्गत विहित विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येणार आहेत. त्यामध्ये गुणवंत कामगार पुरस्कार, शैक्षणिक कर्ज शिष्यवृत्ती, विविध क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, इत्यादींचा समवेश आहे.
- गुणवंत कामगार पुरस्कार :- अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी गुणवंत कामगार पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.
- महिलांसाठी विविध योजना/सांस्कृतिक कार्यक्रम/प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणेत येणार आहेत.
- पुणे महानगरपालिकेतील महिला अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी महिला दिनानिमित्त विविध सांस्कृतिक, प्रबोधनपर आणि इतर बाबींच्या अनुषंगाने विविध कार्यक्रम व विविध विषयांवर प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणेचे प्रस्तावित आहे.
- माहिती अधिकार कायद्याचे सबलीकरणासाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविणेत येणार आहे.

## (२३) मालमत्ता व व्यवस्थापन विभाग

- मालमत्ता व व्यवस्थापन कार्यालयामार्फत २०२४-२५ या आर्थिक वर्षातील नोव्हेंबर २०२५ अखेर पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकतींच्या भाड्यापोटी र.रु. १३.५६ कोटी महसूल जमा झाला आहे.
- मालमत्ता व व्यवस्थापन कार्यालयातील इंजिनिअरिंग विभागाकडील एफ.एस.आय. फाईल्स, करारनामे, मान्यता व शासकीय पत्रव्यवहारांच्या नस्ती, गणक विभागाकडील भवन, भूमी व सदनिका भाडे रजिस्टर्स, निविदा विषयक नस्तींचे ९०% दस्तऐवज स्कॅनिंग करुन सूचीबद्ध करण्यात आले आहे.
- मालमत्ता व व्यवस्थापन विभागामार्फत मनपाच्या मालकीच्या मिळकतींची अतिक्रमण माहिती असणेकामी व संरक्षण होणेकामी सुमारे २०० मिळकतींवर मनपाच्या नावाचे नामफलक रंगविण्यात / लावण्यात आलेले आहेत.

- सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात थकीत भाडे वसुली, किरकोळ दिवाणी दावे निकाली काढणेसाठी आयोजित केलेल्या लोक अदालतींमध्ये माहे डिसेंबर २०२५ अखेर र. रु. २५,२४,०६५/- इतका महसूल जमा झाला.
- मालमत्ता व व्यवस्थापन विभागामार्फत दिवाळी सणाच्या निमित्ताने तात्पुरत्या स्वरुपात फटका स्टॉलसाठी जागा भाड्याने देण्याकरिता ऑनलाईन लिलाव प्रक्रिया राबविण्यात आली होती, या लिलाव प्रक्रियेत फटाका स्टॉल जागा भाडेपोटी र.रु. ३२,८८,३६४/- इतका महसूल प्राप्त झाला आहे.
- सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात कात्रज - कोंढवा रस्तारुंदीमधील बाधित एकूण क्षेत्र ३८९०१.४८ चौ.मी. इतके ताब्यात घेण्यात आले. उर्वरित क्षेत्र ताब्यात घेणेची प्रक्रिया सुरु आहे.
- नगरोत्थान महाभियानांतर्गत कात्रज कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणाच्या जागेचे भूसंपादन करण्यासाठी दि. १५/०३/२०२४ रोजी शासन निर्णय क्र. नगरो-२०२४/प्र.क्र.१६२/नवि-३३, मंत्रालय, मुंबई-४०००३२, दि.१५/०३/२०२४ अन्वये र.रु. १३९.८४ कोटी वितरीत करण्यास निधी प्राप्त झाला आहे. सदरची रक्कम मालमत्ता व व्यवस्थापन विभागाच्या CI73A106 या अर्थशीर्षकावर जमा आहे.

**<u>सन २०२५ - २६ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रकातील संक्षिप्त व महत्वाची प्रस्तावित प्रकल्प योजना माहिती</u>.**

- पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमधील नव्याने पुणे महानगरपालिकेस हस्तांतर होणाऱ्या मिळकतींवर अतिक्रमण रोखण्यासाठी व मिळकत सुरक्षित राहण्यासाठी मनपाच्या नावाचे बोर्ड रंगविण्यात / लावण्यात येणार आहे.
- मालमत्ता व व्यवस्थापन विभागामार्फत सूचीबद्ध पद्धतीने स्कॅन करण्यात आलेल्या रेकॉर्डची माहिती डिजिटल स्वरुपात त्वरित उपलब्ध होणेकामी डेटा मॅनेजमेंट सिस्टीमनुसार संगणक प्रणाली विकसित करण्यात येणार आहे. तसेच मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडील सर्व जागांची माहिती असलेली सद्यस्थितीतील संगणक प्रणाली अद्ययावत करण्याचे काम सुरु असून त्यामध्ये Online पद्धतीने Payment सुविधा समाविष्ट करण्यात येणार आहे.
- मालमत्ता व व्यवस्थापन कार्यालयामार्फत पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या सर्व मोकळया भूखंडाचे व इमारतीचे GIS सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे.
- विकास योजना आराखड्यातील व आवश्यक विकास कामांसाठी नवीन प्रकल्पांच्या जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया करण्यात येणार आहे.
- भाडे तत्वावर दिलेल्या मोकळया जागा मिळकती इ. चे अस्तित्वातील व नवीन सर्व करारनामे अद्ययावत करणे व नूतनीकरण करणे.
- भाडे तत्वावर दिलेल्या गाळयांचे जास्तीत जास्त वार्षिक मागणीनुसार भाडे वसूल करण्याचे उद्दिष्टे आहे.
- पुणे महापालिकेच्या जागा / मालमत्तेचा किफायतशीर वापर करून (Optimal Utilization of Resources) उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न करण्यात येतील.

# (२४) <u>उप आयुक्त (विशेष) कार्यालय</u>

**<u>सन २०२४-२५</u>**

**केंद्र शासनाकडील अमृत अभियान २.० व १५ वा वित्त आयोग**

- केंद्र शासनाकडील १५ व्या वित्त आयोग अंतर्गत पुणे महानगरपालिकेला सन २०२०-२१ ते सन २०२५-२६ असे एकूण पाच वर्षामध्ये १) Air Quality Improvement साठी सुमारे र.रु. ३१२ कोटी व २) पाणी पुरवठा व व्यवस्थापनात सुधारणा व प्रभावी घनकचरा व्यवस्थापन (SWM व Water) साठी सुमारे र.रु. ४५८ कोटी वितरीत करण्यात आले आहेत.
- Air Quality Improvement या घटकांतर्गत आत्तापर्यत र.रु. १६४.९३ कोटी. तसेच पाणी पुरवठा व व्यवस्थापनात सुधारणा व प्रभावी घनकचरा व्यवस्थापन या घटकासाठी आत्तापर्यत र.रु. २५४.८० कोटी. प्राप्त झाले आहे.
- अमृत-१ अभियानांतर्गत पुणे शहरात तंत्रशुद्ध पद्धतीने पाणीपुरवठा करण्याची योजना (24X7 समान पाणीपुरवठा योजना) अंतर्गत विविध ठिकाणी पाण्याच्या टाक्या बांधणे हा प्रकल्प पूर्णत्वाच्या टप्प्यावर आहे.

- अमृत २.० अंतर्गत पुणे मनपाच्या अस्तित्वातील सध्याच्या STP क्षमतेचे 362 MLD वरुन 451 MLD पर्यंत अपग्रेड, सुधारणा आणि विस्तार करणे, वडगाव बुद्रुक येथे पंपिंग स्टेशनसह 125 MLD रॉ वॉटर पंपिंग स्टेशन, WTP उभारणे या कामाची मान्यता अंतिम टप्प्यात आहे.
- नव्याने समाविष्ट २३ गावांमधील टप्पा १ अंतर्गत १६ गांवामध्ये ड्रेनेज लाईन -(260 किमी) विकसित करणे व मैलापाणी शुद्धीकरण केंद्र (4 STP-141MLD) उभारणे प्रकल्प महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे DPR ची तांत्रिक छाननी प्रक्रिया पूर्ण झाल्यावर मान्यतेस सादर होईल.
- CSR अंतर्गत पुणे शहरातील विद्यार्थ्यांना उद्योग व्यवसायाच्या नवनवीन कल्पना, कौशल्य विकास, उद्योगात कुशल संसाधने उपयोगात आणण्याकरिता तसेच विद्यार्थ्यामध्ये उद्योजकता निर्माण करणे करिता टाटा टेक्नॉलॉजी लिमिटेड या संस्थेमार्फत Centre for Invention, Innovation, Incubation and Training Centre (CIIIT) या प्रशिक्षण केंद्राची निर्मिती करणे.

## (२५) भूसंपादन व व्यवस्थापन विभाग

**सन २०२४-२५**

पुणे महानगरपालिकेस आवश्यक आरक्षित जागा भूसंपादन कायद्यान्वये ताब्यात घेण्याची कार्यवाही या विभागांतर्गत करण्यात येते. या विभागामार्फत सन २०२४-२५ मध्ये झालेले महत्वपूर्ण प्रकल्प खालीलप्रमाणे

- कात्रज कोंढवा ६० मी.डी.पी रस्त्यापैकी ५० मी. रस्त्याची भूसंपादनाची कार्यवाही नविन भूसंपादन कायदा २०१३ अन्वये सुरु करणेत आली आहे.
- कात्रज स.नं.१/२ब येथील कात्रज चौकातील उड्डाणपुलासाठी जागेचे भूसंपादन सुरु केले असून सदर प्रकरणी कलम १९ ची अधिसूचना प्रसिद्ध झालेली असून भूसंपादनाची योजना अंतिम टप्प्यात आहे.
- मौजे कात्रज स.नं.१८/२अ/१० येथील खंडोबा रस्ता कात्रज-कोंढवा मुख्य रस्त्यास जोडणाऱ्या १८ मी. विकास योजना रस्ता २००.०० चौ. मी. क्षेत्राचा अंतिम निवाडा जाहीर झाला असून सदर क्षेत्राचा ताबा दि. ३/१०/२०२४ रोजी घेण्यात आला आहे.
- गणेशखिंड रस्त्यावरील विद्यापीठ चौक ते संचेती हॉस्पिटल दरम्यान ४५ मी.डी.पी रस्त्याची भूसंपादनाची कार्यवाही नविन भूसंपादन कायदा २०१३ अन्वये सुरु करणेत आली आहे.

**सन २०२५-२६ दृष्टीक्षेपात अर्थसंकल्पीय अंदाज**

- या विभागामार्फत नविन भूसंपादन कायदा २०१३ अन्वये एकूण ६५ भूसंपादन प्रकरणांची कार्यवाही या विभागामार्फत सुरु आहे. चालू असलेल्या भूसंपादनासाठी, निवाडा मंजुरीवर प्रलंबित प्रकरणी तसेच निवाडा मंजूर असलेली तथापि नुकसान भरपाई रक्कम प्राप्त नसल्याने निवाडा जाहीर होणेवर प्रलंबित एकूण २५ प्रकरणांसाठी डिसेंबर २०२५ अखेर अंदाजित र.रु. २०९४.९८ कोटी इतकी तरतूद आवश्यक आहे.
- पुणे महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजना आराखड्यामधील विविध आरक्षित जागांचा प्राधान्याने विकास करण्यसाठी आवश्यक असणाऱ्या आर्थिक तरतूदी आतापर्यंत भूसंपादन व व्यवस्थापन या विभागाचे अर्थशिर्षकावर करण्यात येत होत्या. तथापि, यापुढे संबंधित आरक्षण विकसित करणाऱ्या खात्यांनी त्या आरक्षणाच्या जागांचे भूसंपादन करणेसाठी आवश्यक त्या तरतुदी त्या-त्या खात्यांचे अर्थशिर्षकावर करणेत येणार आहे.
- **भूसंपादन व व्यवस्थापन विभागामार्फत चालू असलेले भूसंपादन विषयक महत्वपुर्ण प्रस्ताव.**

  १) सिमला ऑफिस चौक ते पुणे विदयापीठ रस्ता, २) चाफेकर पुतळा चौक ते संचेती हॉस्पिटल (४५ मी.डी.पी. रस्ता), ३) कात्रज कोंढवा ६० मी.डी.पी. रस्त्यापैकी ५० मी. रस्ता, ४) कात्रज स.नं.१/२ब कात्रज चौक, ५) कात्रज जुना स.नं.१७/१/३ पै., नविन स.नं.२०/१३ पै. ८४ मी. रुंदीचा कात्रज - कोंढवा रस्ता (पर्चेस नोटीस), ६) बालेवाडी स.नं.१७ पै. प्ले ग्राऊंडसाठी संपादन (पर्चेस नोटीस), ७) जायका (मैलापाणी प्रक्रिया प्रकल्प) बाणेर स.नं. २२७, ८) पर्वती तळजाई – वनउदयान, ९) वारजे शिवणे नदीकाठचा रस्ता, १०) कात्रज कोंढवा स.नं.५७ पै. गंगाधाम चौक शत्रुंजय मंदीर २४ मी.डी.पी. रस्ता, ११) वारजे जुना जकात नाका ते गणपती माथा दरम्यानचा रस्ता, १२) धनकवडी स.नं.२९ पै. ओटा मार्केट व पोलिस चौकीसाठी (पर्चेस नोटीस).

## (२६) अतिक्रमण/ अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग

**सन २०२४-२५**

**सार्वजनिक रस्ता व पदपथावरील अतिक्रमण निर्मुलन अहवाल खालीलप्रमाणे -**

| महिना | स्टॉल | हातगाडी | पथारी | सिलेंडर | शेड / झोपडया | इतर | व्यावसायिक वाहने |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ एप्रिल २०२४ ते ३१ जानेवारी २०२५ अखेर | २२३ | २८७५ | १४१११ | १३६८ | ४४६० | १४३३३ | ४५३ |

- स्टॉल/हातगाडी, सिएफ़सी परवाना शुल्क पोटी दिनांक ०१.०४.२०२४ ते ३१.०१.२०२५ अखेर र.रु. १४,६३,६४,३४०/- जमा आहे.
- अतिक्रमण साहित्य सोडविण्याचे शुल्क ०१.०४.२०२४ ते ३१.०१.२०२५ अखेर र.रु. १,०५,०५,०००/- जमा आहे.
- इतर परवाना शुल्कापोटी र.रु. १२,०६,६०३/- जमा आहे.
- एकूण अतिक्रमण विभागाकडे ०१.०४.२०२४ ते ३१.०१.२०२५ अखेर र.रु. १५,८०,७५,९४३/- जमा आहे.
- पुणे महानगरपालिकेच्या ॲमेनिटी स्पेस जागेवर बावधन, बाणेर, पाषाण व लोहगाव या ठिकाणी जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने शेतकरी आठवडे बाजार उभारण्याचे काम चालू आहे. (जागतिक बँक अर्थसहाय्य र.रु. २,८०,००,०००/-)

**सन २०२५-२६ करिता आवश्यक कामांसाठी तरतूद.**

१) बाणेर स.नं. ६६/५ या ठिकाणी उपलब्ध अमेनिटी स्पेस डेव्हलप करणे. (४०.०० लक्ष )
२) गुंजन - शास्त्रीनगर चौक, सिंहगड रोड फन टाईम, राजीव गांधी प्राणी संग्रहालय, नांदेड सिटी या चार ठिकाणी फुड प्लाझा विकसित करणे.

महाराष्ट्र शासनाकडील FSSAI या विभागाकडून पुणे शहरातील लोहगाव, नगररोड येथील मंत्री मार्केट येथे फूड झोन निवडण्यात आलेला असून शासनाकडून या कामी र.रु. १,००,००,०००/- अनुदान देण्यात येणार आहे. (FSSAI - Food Safety and Standards Authority of India)

## (२७) मोटार वाहन विभाग

**सन २०२४-२५**

- पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागामार्फत होणाऱ्या रस्त्याच्या कामकाजाकरिता क्षेत्रीय कार्यालयाकडे खड्डे दुरुस्ती करीता खात्याची वाहने व स्वमालकीचे रोलर आहेत. सद्यस्थीतीत १५ क्षेत्रीय कार्यालयाकरिता १० सेन्सर पेव्हर व १९ रोलर उपलब्ध असून शहराचा वाढता विस्तार पाहता उपलब्ध मशिनरी कामी पडत असल्याने नवीन २ नग सेन्सर पेव्हर व ५ नग रोलर खरेदी करण्यात आले आहे.
- पुणे शहरातील पथ दिव्यांची देखभाल दुरुस्तीसाठी वाहनांचे आयुर्मान संपुष्टात आल्याने विद्युत विभागासाठी २ नग हायड्रोलिक प्लॅटफॉर्म (शिडी गाडी) वाहने खरेदी करण्यात आले आहे.
- पुणे महानगरपालिकेच्या उद्यान विभाग, पथ विभाग, घनकचरा व्यवस्थापन, अतिक्रमण विभाग इ. विभागांकडे तसेच विविध क्षेत्रीय कार्यालयाकडे जेसीबी मशीन कार्यरत आहेत. १३ बॅकहो लोडर मशिन्सचे आयुर्मान संपुष्टात आल्याने नवीन ११ नग बॅकहो लोडर खरेदी करण्यात येत आहेत.
- घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी अंतर्गत भरारी पथकासाठी १८ नग जीप खरेदी करण्यात आले आहे.
- पुणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागा करिता असल्याने १९ नग मोठी व ११ नग छोटी युटिलिटी संवर्गातील वाहने खरेदी करण्यात येत आहेत.

- महाराष्ट्र शासनाच्या वाहने निरस्त करण्याच्या धोरणानुसार अग्निशमन दलाकडील एकूण २७ वाहने निर्लेखित करण्यात आली आहेत. नवीन वाहने खरेदी करणे आवश्यक असल्याने अग्निशमन विभागाकरीता अत्याधुनिक वॉटर मीस्ट मिनी अग्निशमन (फायर टेंडर) वाहने, ६ नग अत्याधुनिक मल्टीपर्पज अग्निशमन (फायर टेंडर) वाहने, ५ नग हाय राईज अग्निशमन (फायर टेंडर) वाहने खरेदी करण्यात येत आहे.
- १५ व्या वित्त आयोग अतंर्गत पुणे शहरातील हवा प्रदूषणामध्ये PM 10 व PM 2.5 अशा धुलीकणांचे प्रमाण जास्त असल्याने त्यावर उपाययोजना म्हणून नॅशनल क्लीन एअर प्रोगाम (NCAP) मध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणेसाठी पुणे महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागासाठी १५ व्या वित्तीय आयोग अंतर्गत शहरातील हवा प्रदूषण कमी करण्यासाठी ५ नग Fog Cannon Vehicle Mounted Machine खरेदी करण्यात येत आहे.
- १५ व्या वित्त आयोग अतंर्गत स्वच्छ भारत अभियान अंतर्गत पुणे शहरातील घनकचरा वाहतूक करणे करिता ८१ नग छोटी (CNG) घंटागाडी वाहने खरेदी करण्यात आली आहे. तसेच सेकंडरी वाहतूक करणे करिता अत्याधुनिक ६ नग Walking floor Equipped truck खरेदी करण्यात आले आहे.
- १५ व्या वित्त आयोग अतंर्गत स्वच्छ भारत अभियान अंतर्गत विविध उपक्रमांचा प्रचार व प्रसार करणे, शहरात कचरा वर्गीकरण, कचरा संकलन, सार्वजनिक स्वच्छता इत्यादी बाबत जनजागृती करण्यासाठी IEC VEHICLE खरेदी करण्यात येत आहे.

## (२८) <u>अग्निशमन विभाग</u>

- मध्यवर्ती अग्निशमन केंद्र, भवानी पेठ येथील केंद्राच्या आवारात नविन प्रशासकीय इमारत उभारण्याचे काम सुरु करण्यात आलेले आहे.
- पुणे शहरामध्ये बावधन व खराडी अशा २ ठिकाणी नविन अग्निशमन केंद्र उभारणीचे काम चालू आहे.
- पुणे शहरामध्ये धायरी, महंमदवाडी, बाणेर अशा ३ ठिकाणी नविन अग्निशमन केंद्र उभारणीचे काम पूर्ण झालेले आहे. (चांदणी चौक) चौक NDA अंतर्गत उभारण्यात आलेले अग्निशमन केंद्र कार्यान्वित करण्यात येणार असून मध्यवर्ती अग्निशमन केंद्र येथील इमारतीचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत अग्निशमन सेवेचे मुख्य कार्यालय या केंद्रात हलविण्यात येणार आहे, त्याबाबतची तयारी चालू आहे.
- खास निधीचे अंदाजपत्रकातील तरतुदीमधून अग्निशमन दलाकरिता ०६ नग ॲडव्हान्स मल्टीपर्पज फायर टेंडर वाहने, ०५ नग हायराईज फायर फायटिंग वाहने व ०१ नग मिनी फायर इंजिन वॉटर मिस्टसह वाहन खरेदी करण्याची प्रक्रिया मोटार वाहन विभागामार्फत सुरू आहे.

**दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रकातील संक्षिप्त व महत्वाची प्रस्तावित प्रकल्प योजना माहिती.**

- अग्निशमन विभागाच्या बळकटीकरणासाठी खास निधीचे अंदाजपत्रकातील तरतुदीमधून ०२ नग रेस्क्यू वाहने, ०६ नग फायर फायटिंग ॲन्ड रेस्क्यू वाहन (२४ मीटर उंच शिडीसह) अशी अग्निशमन वाहने खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे. सदर खरेदीसाठी र. रू. ४० कोटींची व या व्यतिरिक्त अग्निशमन दलासाठी उपकरणे/ सहित्य यासाठी किमान र. रू. ७० लाख तरतूद करण्यात आली आहे.
- शहराचा वाढता विकास नव्याने समाविष्ट झालेली गांवे यांचा विचार करून अग्निशमन केंद्रांची संख्या वाढविणे व मनुष्यबळ उपलब्ध करणेचे दृष्टीने प्रयत्न केले जातील .

# दृष्टीक्षेपात अंदाजपत्रक –

## प्रमुख जमा बाबी :-

## (१) स्थानिक संस्था कर -

सन २०२५-२६ करीता मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेले उद्दीष्ट व प्रत्यक्ष प्राप्त व अपेक्षित उत्पन्नाची माहिती :-

- राज्य शासनाने पासून जकातकर बंद करुन स्थानिक संस्था कर (LBT) लागू केलेला असल्याने महसूलात होणारी तूट भरणेकरीता राज्य शासनाकडून मुद्रांक शुल्क अधिभार अनुदान संबंधित महापालिकेस आदा करणेबाबतचे शासन निर्णय प्रसृत केलेले असून त्यानुसार दि. ०१/०४/२०१३ पासून पुणे मनपा मुद्रांक शुल्क अधिभार अनुदान प्राप्त होत आहे.
- केंद्र व राज्य शासनाने दि. ०१/०७/२०१७ पासून वस्तू व सेवा कर (LBT) लागू केलेला असल्याने स्थानिक संस्था कर बंद करण्यात आल्याने राज्य शासनाकडून माहे जुलै २०१७ पासून दरमहा वस्तू व सेवा कर अनुदान पुणे मनपास प्राप्त होत आहे.

(आकडे कोटीमध्ये)

| उत्पन्न तपशील सन २०२४-२५ | मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी दिलेले उद्दीष्ट | दि.०१/०४/२०२४ ते दि. ३०/११/२०२४ अखेर प्रत्यक्ष प्राप्त उत्पन्न | दि. ०१/१२/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५ अखेर अपेक्षित उत्पन्न |
|---|---|---|---|
| वस्तू व सेवा कर अनुदान (दरमहा रु. २०८.४७ कोटी प्रमाणे) | २५०२.०० | १६६५.०२ | ८३३.८८ |
| १% मुद्रांक शुल्क अधिभार अनुदान | ५००.०० | ९७.३० | २९१.८५ |
| इतर जमा (स्थानिक संस्था कर व इतर) | ०.३७ | ०.३२ | ०.०५ |
| एकूण | | १७६२.६४ | ११२५.७८ |
| **एकूण (प्रत्यक्ष प्राप्त व अपेक्षित उत्पन्नासह)** | | **२८८८.४२** | |

**सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक.**

| उत्पन्न तपशील | अंदाजित उत्पन्न (आकडे कोटीमध्ये) | शेरा |
|---|---|---|
| वस्तू व सेवा कर (दरमहा रु. २०८.४७ कोटी प्रमाणे) | २७०१.७७ | (सन २०२४-२५ करीता २०८.४७ कोटीमध्ये ८ टक्के वाढ गृहित धरुन सन २०२५-२६ करीता दरमहा र.रु.२२५.१५ कोटी प्राप्त होतील.) |
| १% मुद्रांक शुल्क अधिभार अनुदान | ५००.०० | |
| इतर जमा (एलबीटीसह) | ०.३२ | |
| **एकूण अपेक्षित उत्पन्न** | ३२०२.०९ | |

स्थानिक संस्था कर कार्यालयाकडून कोणत्याही योजना व प्रकल्प कार्यान्वित नाहीत, तसेच कोणतेही प्रकल्पासंबंधित कामकाज केले जात नाही.

## (२) मिळकत कर -

**सन २०२४-२५**

**अ) मिळकतकर वसुली –**

- मिळकतकरातून सन २०२४-२५ मध्ये दि. ३१/०१/२०२५ अखेर ९,२७,१११ मिळकत धारकांनाकडून र. रु.१९९९.८० कोटी उत्पन्न प्राप्त झाले आहे.
- गेल्या वर्षी सन २०२३-२४ मध्ये याच कालावधीमध्ये ८,९९,८८२ मिळकत धारकांकडून र.रु. १९०१.७१ कोटी जमा झाले आहे.

- सन २०२४-२५ मध्ये कुठलीही अभय योजना नसताना, तसेच ३२ गावांमधील मिळकत क्र वसुलीसाठी शासनाकडून स्थगिती असतना देखील चालू वर्षी गेल्या वर्षीच्या तुलनेत र.रु. ९८.०९ कोटी वसुली अधिक आहे.
- वारंवार थकबाकी भरणेकरिता आवाहन करुन देखील थकबाकी असलेल्या ८३.७२ कोटी रक्कमेच्या १३० मिळकती सील करण्यात आल्या आहेत.
- महापालिका इतिहासात प्रथमच वारंवार नोटीस बजावून देखील थकबाकी न भरणाऱ्या सुमारे २०० बिगर निवासी मिळकतींचा लिलाव करण्यात येत आहे. त्यामधून अंदाजे र.रु.६३ कोटी उत्पन्न प्राप्त होणे अपेक्षित आहे.
- सोसायटी मधील थकबाकी धारकांची यादी सोसायटीतील नोटीस बोर्डवर लावण्यात येत आहे, तसेच सोसायटीच्या नावाने नोटीस बजावण्यात येत आहे.
- थकबाकीदारांच्या मिळकती समोर वाजंत्रीद्वारे सन २०२४-२५ ची र.रु.४० कोटी इतकी वसुली करण्यात आली.

**ब) <u>मिळकतकर आकारणी</u> –**

- सन २०२४-२५ मध्ये दि. ३१.०१.२०२५ अखेर नव्याने ३४,७८८ मिळकतींची नव्याने आकारणी करण्यात आली असून त्यामधून र.रु. १८३.४७ कोटी नव्याने कायमस्वरुपी मागणी निर्माण झाली आहे.
- हॉटेल मध्ये सुरु असलेले अनधिकृत वापर (साईड मार्जिन, रुफ टॉप) वर कारवाई करुन अनधिकृत वापर करीत असलेल्या मिळकतींना कलम २६७-अ नुसार तीन पटीने आकारणी करण्यात येत आहे. ३८५ मिळकतीवर कारवाई करण्यात आली असून साधारण ८.११ कोटी नव्याने मागणी निर्माण करण्यात आली आहे.

**<u>सन २०२५-२६</u>**

- बिगरनिवासी, वापरात बदल झालेल्या व अनधिकृत सुरु असलेल्या बिगरनिवासी मिळकती, अनधिकृत असलेले बिगरनिवासी क्रिडा संकुल, हॉटेल इ. शोधून त्यांची कलम २६७-अ नुसार तीनपटीने आकारणी करण्यात येणार आहे.
- वारंवार नोटीस बजावून थकबाकी न भरणाऱ्या बिगर निवासी मिळकतींचा मोठ्या प्रमाणावर लिलाव प्रक्रिया करण्यात येणार आहे.
- पुणे महानगरपालिका हद्दीतील मिळकतकर आकारणी न झालेल्या मिळकती शोधून आकारणी करण्यात येणार आहे.
- शहरातील मिळकतींचे सर्वेक्षण ड्रोनद्वारे करून आकारणी करण्यात येणार आहे.
- ज्या बांधकामांना भोगवटा प्राप्त झाला आहे अशा मिळकतींची आकारणी करणेसाठी संगणक प्रणली तयार करण्यात येत आहे.

## (३)<u>बांधकाम परवानगी व विकास शुल्क</u> –

**<u>सन २०२४-२५</u>**

- सन २०२४-२५ मध्ये बांधकाम विभागाचे बांधकाम परवानगी व विकास शुल्क मधून र.रु. २४९२.८३ कोटी इतके उत्पन्न गोळा करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. सदरचे उद्दिष्ट मार्च २०२५ अखेर पूर्ण होईल असा अंदाज आहे.

**<u>सन २०२५-२६ उद्दिष्ट र. रु. २९००कोटी</u>**

- महाराष्ट्र शासनाने दि. ०२/१२/२०२० रोजी प्रकाशित केलेल्या (यु डी सी पी आर २०२०) मध्ये दिलेल्या प्रीमियम मध्ये टप्पे निहाय शुल्क भरण्याची मूळ मुदतीस कायमस्वरूपी मुदतवाढ प्राप्त झालेली आहे. त्यामुळे नवीन बांधकाम परवानगीस वेग प्राप्त होऊ शकेल मुळ एफएसआय घेतल्यावर अ‍ॅन्सीलरी एफएसआय अतिरिक्त एफएसआय म्हणून मान्य करण्यात येत असल्याने सर्व स्तरावरील लहान मोठ्या विकसकांना फायदा मिळत आहे व तसेच पुणे महानगरपालिकेच्या उत्पन्नात देखील वाढ होण्यास मदत होत आहे.

- प्रत्यक्ष बाजारातील रियल इस्टेट मध्ये मंदीमुळे डिसेंबर २४ अखेर सुमारे १०% तूट उद्दिष्टांमध्ये दिसून येत असून सन २०२३-२४ मध्ये डिसेंबर २३ अखेर देखील अशीच तूट आली होती. तसेच शहरामधील विशेष प्रकल्प जसे मेट्रो इ. मुळे जमीन विकास शुल्क व बांधकाम विकास शुल्क (LDC व BDC) यामध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ नुसार १००% ने वाढ करण्यात आलेली आहे. सदर वाढीव शुल्क शासनाद्वारे निर्देशित केल्याप्रमाणे सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या व्हर्च्युअल बँक अकाउंट वर रियल टाईम मध्ये जमा करण्यात येत आहे. सबब यापूर्वीचे उत्पन्नात दर्शविलेले बजेट कोड क्र. RI23A121 व RI23A122 बजेट कोड मध्ये बदल करण्यात आलेले असून त्याऐवजी SI25A226A व SI25A226B असे कोड करण्यात आलेले आहे. वरील कारणांमुळे व बाजारातील मंदीमुळे सन २०२५-२६ च्या अपेक्षित उत्पन्नात घट दर्शविण्यात आलेली आहे

## (४) <u>पाणीपट्टी</u> –

**<u>सन २०२४-२५</u>**

- सन २०२४-२५ सालासाठी मा. स्थायी समितीने मान्य केलेल्या अंदाजपत्रकानुसार पाणीपुरवठा विभागासाठी महसुली कामासाठी र.रु. ९५२.८९ कोटी (३५७.८४ सेवकवर्ग व इतर तनुषंगिक सहित) व भांडवली कामासाठी र.रु. ५८४.९६ कोटी असे एकूण र.रु. १४८८.३९ कोटीची तरतुद करण्यात आली होती. या तरतुदीचे अनुषंगाने सन २०२४-२५ सालासाठी पाणीपट्टी पोटी र.रु. १७०.१८ कोटी मिळणेचे उद्दीष्ट ठरवुन दिलेले आहे. त्या अनुषंगाने दिनांक ३१/०१/२०२५ रोजी पर्यंत पाणीपट्टीपोटी र.रु. १०२.४५ कोटी जमा झालेले आहेत.

### सन २०२५-२६ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक (उद्दीष्ट र.रु. २१७.७२ कोटी)

- या अंदाजपत्रकामध्ये समान पाणीपुवठा योजनेसाठी सुमारे र.रु २१५ कोटीची तरतूद करण्यात आली आहे. पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट ११ गावे व २३ गावांमध्ये (Master Plan नुसार) पाणीपुरवठा करण्याच्या योजनेसाठी र.रु. १०० कोटीची तरतुद करण्यात आली आहे. घरगुती व बिगर घरगुती मीटर पाणीपट्टीच्या दरामध्ये वार्षिक ५% दरवाढ मा. मुख्य सभा ठराव क्र.८०९, दिनांक १६/०२/२०१६ अन्वये मान्य करण्यात आलेली आहे.
- घरगुती व बिगर घरगुती मीटर पाणीपट्टीच्या दरामध्ये वार्षिक ५% दरवाढ मा. मुख्य सभा ठराव क्र. ८०९, दिनांक १६/०२/२०१६ अन्वये मान्य करण्यात आलेली आहे.

### <u>वापरानुसार दर आकारणी</u>

| सध्याचे दर | | प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|
| खप कि.लि./महिना | दर (सन २०२४-२५) | खप कि.लि./महिना | दर (सन २०२५-२६) |
| झोपडपट्टी | | | |
| कच्ची झोपडपट्टी | ५१.३३/महिना | कच्ची झोपडपट्टी | ५३.९०/महिना |
| पक्की झोपडपट्टी | ८५.५०/ महिना | पक्की झोपडपट्टी | ८९.७७/ महिना |
| घरगुती पाणी वापर दर | | | |
| ० ते १८.६० | ८.१३ | ० ते १८.६० | ८.५४ |
| १८.६० ते ३०.०० | १३.५९ | १८.६० ते ३०.०० | १४.२७ |
| ३०.०० ते ३७.५ | २७.०४ | ३०.००ते ३७.५ | २८.३९ |
| ३७.५ पेक्षा जास्त | ४०.७६ | ३७.५ पेक्षा जास्त | ४२.७९ |
| बिगर घरगुती पाणी वापर दर | | | |
| ० ते २० | ७०.३२ | ० ते २० | ७३.८३ |
| २० ते ४० | ७२.९८ | २० ते ४० | ७६.६२ |
| ४० ते ६० | ७६.६८ | ४० ते ६० | ८०.५१ |
| ६० पेक्षा जास्त | ८८.३५ | ६० पेक्षा जास्त | ९२.७७ |

## (५) आकाशचिन्ह परवाना

**सन २०२४-२५**

- सन २०२४-२५ मध्ये जाहिरात फलकांचे व नामफलकांचे दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०१/२०२५ अखेर र.रु. २८,६३,७७,७५५/- रुपये एवढे उत्पन्न प्राप्त झाले आहे. परंतु प्रति चौ. फू. र.रु. २२२/- शुल्काबाबत मे. उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकांबाबत अंतिम आदेश प्राप्त होईपर्यंत जाहिरातदारांना तात्पुरते प्रति चौ. फूट र.रु. १११/- प्रमाणे शुल्क भरणेस तात्पुरते मे. न्यायालयाचे आदेश दिले असून त्यानुसार रिट याचिका क्र. १०६८४/२०१८ व १०७१७/२०१८ व इतर याचिकांमध्ये दि.१/१०/२०१८ ते दि.३१/०१/२०२४ या कालावधीचे भरलेले शुल्क र.रु. २८,०६,९२,९७४/- रुपये एवढे उत्पन्न प्राप्त झाले आहे अद्याप याचिका प्रलंबित आहे अंतिम आदेश येणे बाकी.
- सन २०२४-२५ मध्ये दि.०१/०४/२०२४ ते ३१/०१/२०२५ अखेर परमिट परवानाचे र.रु. ३१,९९,३८७/- रुपये एवढे उत्पन्न प्राप्त झालेले आहे.
- सन २०२४-२५ मध्ये पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर परवाना व आकाश चिन्ह विभागाकडील सर्व सेवा ऑनलाइन सुरु करण्यात आलेल्या आहेत.
- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमा अंतर्गत परवाना व आकाशचिन्ह विभागाच्या सर्व सेवा टप्याटप्याने ऑनलाईन करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. त्यानुसार सर्व क्षेत्रीय कार्यालयामार्फत दिवाळी फटाका व बॅनर शुल्काची चलने ऑनलाईन भरण्यात आली.

**सन २०२५-२६**

- सन २०२४-२५ चे जाहिरात फलकांचे दि. ०१/१०/२०१८ पासून र.रु.११८ कोटी जाहिरात शुल्कापोटी उत्पन्न अपेक्षित आहे. तथापि प्रकरण मे. उच्च न्यायालयात असल्याने निर्णय प्रलंबित आहे.
- परवाना व परमीट शुल्क दरवाढी बाबत मा .मुख्यसभा ठ.क्र .६४२ दि.२२/११/२०२१ ने मान्यता मिळाली असून अंदाजे र.रु.१ कोटी उत्पन्न अपेक्षित आहे.
- जाहिरात फलक शुल्क दरवाढी बाबत मा.मुख्य सभा ठ.क्र .३३८ दि .२८/१२/२०२२ ने मान्यता मिळाली असून अंदाजे र.रु. ८५ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे.
- शहरामध्ये अनधिकृत फ्लेक्स/बोर्ड लागू नयेत यासाठी काही ठिकाणे निश्चित करुन नागरिकांना जाहिराती साठी उपलब्ध करुन देणेची कार्यवाही सुरु आहे.

## सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील जमेचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

*(आकडे रुपये कोटीत)*

| जमा बाजू | | |
|---|---|---|
| **अर्थशिर्षक** | **२०२४-२५ साठीचे जमेचे उद्दीष्ट** | **माहे जानेवारी २०२५ अखेर प्रत्यक्ष जमा** |
| सुरवातीची शिल्लक | ०.०२ | - |
| स्थानिक संस्था कर/मुद्रांक शुल्क | ४९५.३७ | १८९.१३ |
| वस्तु आणि सेवा कर (GST) | २५०२.०० | २०८१.९७ |
| मिळकतकर | २५४९.७९ | १६२५.९१ |
| पाणीपट्टी | ४९५.१८ | २७६.६९ |
| बांधकाम परवानगी व विकास शुल्क | २४९२.८३ | १३१२.१३ |
| इतर जमा | ७५८.६४ | ६०६.३२ |
| अमृत व स्मार्ट सिटी अभियान अनुदान | ७५.०० | ०.०० |
| शासकीय अनुदान | १७६२.१७ | ३१३.४२ |
| प्रधानमंत्री आवास योजना | २०.०० | २९.३५ |
| कर्ज/कर्जरोखे | ४५०.०० | ०.०० |
| **एकूण रक्कम रुपये** | ११६०१.०० | ६४३४.९२ |

## (ब) <u>दृष्टीक्षेपात सन २०२५-२६ आर्थिक वर्षासाठी जमाखर्चाचा अंदाज-</u>

**सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या जमाखर्चाचा अंदाज पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.**

**(आकडे रुपये कोटीत)**

| जमा बाजू | | खर्च बाजू | |
|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | ०.०२ | सेवकवर्ग खर्च | ३६४२.०० |
| स्थानिक संस्था कर | ५४५.३२ | वीज खर्च व दुरूस्ती | ४१५.२६ |
| वस्तू आणि सेवा कर (GST) | २७०१.७७ | पाणी खर्च | १७२.६६ |
| मिळकतकर | २८४७.२३ | कर्ज परतफेड, व्याज व घसारा | ८५.७२ |
| विकास शुल्क | २८९९.९९ | औषधे, पेट्रोल / डिझेल | २६६.७७ |
| पाणीपट्टी | ६१८.७२ | देखभाल दुरूस्ती व इतर खर्च | २३४५.१५ |
| शासकीय अनुदान | १६३३.४४ | वॉर्डस्तरीय | ३४.८० |
| इतर जमा | ९७५.५० | क्षेत्रीय कार्यालयाने करावयाची कामे (नॉन प्लॅन) | १३०.९१ |
| कर्ज / कर्जरोखे | ३००.०० | भांडवली विकासाची कामे | ५२३३.३० |
| प्रधानमंत्री आवास योजना | ९६.१० | अमृत व स्मार्ट सिटी अभियान | २९१.५० |
| | | वर्षाअखेरची शिल्लक | ०.०२ |
| **एकूण** | **१२६१८.०९** | **एकूण** | **१२६१८.०९** |

अंदाजपत्रक तयार करताना पुणे नागरिक केंद्रबिंदू मानून व सकारात्मक दृष्टीकोन डोळयासमोर ठेऊन शासनाच्या कल्याणकारी योजना राबविणे व अंदाजपत्रकात नमूद केलेल्या विकास कामांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आपण सर्व बांधील आहोत.

अंदाजपत्रक सादर करताना सर्व माजी सभासद व माजी पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी वर्ग, कामगार संघटना, स्वयंसेवी संस्था व सर्व प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. केंद्रातील व राज्यातील सर्व माननीय मंत्री महोदय, माननीय संसद सदस्य, माननीय राज्यसभा सदस्य, माननीय विधानसभा व माननीय विधान परिषद सदस्य, शासनाच्या विविध महामंडळावरील सदस्य, त्या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो. प्रस्ताविक अर्थसंकल्पास मूर्तरुप देतांनाही सर्व घटकांचे सहकार्य लाभेल, या विश्वासासह मी सन २०२५-२०२६ चे अंदाजपत्रक आज मंगळवार, दिनांक ०४.०३.२०२५ रोजी मा. स्थायी समितीस सादर करीत आहे.

**(डॉ राजेन्द्र भोसले)**
महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका.

दिनांक : ०४/०३/२०२५